
# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | १९९९ |
| वर्ष | : | चौथे |
| अंक | : | ५ - ६ |
| पृष्ठे | : | ८८ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ३२**



विद्या प्रसारक मंडळाचे
नियतकालिक

# दिशा

वर्ष चौथे / अंक ५-६ / नोव्हेंबर-डिसेंबर १९९९

## दीपावली व नववर्ष शुभचिंतन






वर्ष चौथे / अंक ५-६ / नोव्हेंबर-डिसेंबर १९९९

**संपादक**
श्री. अचलकुमार टिल्लू
**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक
**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर
**सहाय्यक मंडळ**
प्रा. संतोष राणे
सौ. भारती जोशी
सौ. मंगला घाटणेकर
सौ. मनाली देवधर
सौ. विशाखा देशपांडे
श्री. संजय वोरकर
सौ. विनोदिनी राणे
सौ. सुलक्षणा पाध्ये
कु. दीपाली भाटकर
कु. सुंगधा चव्हाण

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. अचलकुमार टिल्लू | ३ |
| २) | वृत्तपत्रक्षेत्रांतील स्थित्यंतरे | श्री. चंद्रशेखर वाघ | ५ |
| ३) | लोकमान्य टिळक व शिक्षणक्षेत्र | श्री. श्रीनिवास वेळवी | ८ |
| ४) | प्रकल्प (Projects) या विषयी ग्रंथालयाच्या अपेक्षा | प्रा. प्रदीप कर्णिक | १३ |
| ५) | विसाव्या शतकातील शैक्षणिक वाटचाल | श्री. अचलकुमार टिल्लू | १७ |
| ६) | आनंदयात्री पणशीकर | शब्दांकन :श्री. संजय वोरकर | २२ |
| ७) | निसर्गाचे भीषण तांडव-किल्लारी | श्री. प्रदीप केळकर | २५ |
| ८) | विनाशाच्या उंबरठ्यावर भारतीय वाघ | श्री. संतोष शिंत्रे | ३० |
| ९) | बौद्ध लेण्याची दैन्यावस्था | श्री. मनोज गडनीस | ३३ |
| १०) | "वानप्रस्थ-परार्थाकडून...परमार्थाकडे" | सौ. मंजिरी धर्माधिकारी | ३४ |
| ११) | ब्रह्मविद्या-आध्यात्मिक श्वसनप्रकार व ध्यानाचे दुर्मिळ योगशास्त्र | | ३७ |

| | | |
|---|---|---|
| १२) मी पाहिलेली इटाली (पूर्वार्ध) | डॉ. ग.त्रि. दाभाडे | ४१ |
| १३) परंपरागत असलेल्या जुन्या- "दृक् कला हरवत आहेत" | श्री. व्ही. सित्ररकर | ४६ |
| १४) श्री. नारायण काळे | दीपाली भाटकर | ५३ |
| १५) रायगड हेच सर्वस्व असणारे सुरेश वाडकर. | श्री. यतिन ओक | ५६ |
| १६) गझल गायन आणि मी | श्री. अनिरुद्ध जोशी<br>शब्दांकन : श्री. रवींद्र मांजरेकर | ५८ |
| १७) "व्यक्तिमत्व-विकासाठी कलेची उपासना" | डॉ. अशोक जोशी | ६१ |
| १८) भाऊ पडसलगीकर-राष्ट्रीय बुद्धिबळ खेळाडू शिक्षक व संघटक | मुलाखत | ६४ |
| १९) विधी शास्त्राचे शिक्षण - समस्या व उपाय | प्रा. स्मिता कर्वे | ६७ |
| २०) "प्रिय बाबांस......" | सौ. हर्षदा बोरकर | ६९ |
| २१) परिसर वार्ता | सौ. विशाखा देशपांडे | ७८ |

कार्यालय

विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

दूरध्वनी : ५४२ ६२७०

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिण्ट्स,
नुरीबाबा दर्गा रोड,
ठाणे - ४०० ६०१.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१

सुविचार संकलन :
श्री. चंद्रकान्त शिंगाडे (तंत्रनिकेतन, ग्रंथालय विभाग) यांनी केले आहे.

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी विद्याप्रसारक मंडळ तसेच संपादक सहमत असतीलच असे नाही.

अस्पृश्यता पाळणे हा परमेश्वराविरुद्ध व मानवतेविरुद्ध केलेला गुन्हा आहे. -म.गांधी

# दिवाळी दिवाळी आली
# हासत नाचत खेळत आली

दिवाळी अंकाची निर्मिती आणि त्यात माझा सहभाग. वर्षापूर्वी कोणी भविष्य सांगितले असते तर विश्वास न बसण्यासारखेच. पण ऽ नियती ...आऊ द्या ! ललाटे लिखितम्..... तर, रसिकहो तुमच्या सदिच्छांमुळे हे शक्य झाले. २५ नोव्हें. ९९ या दिवशी भावे राष्ट्रीय व्याख्यानमालेचे औचित्य साधून या 'दिशा' च्या दिवाळी अंकाचे प्रकाशन आयोजिले आहे.

लोकसभेच्या व आपल्याकडे विधानसभेच्या निवडणुकाही नुकत्याच सुखरुप पार पडल्या. पण केंद्रात किंवा महाराष्ट्रात कोणत्याही पक्षाला निर्विवाद बहुमत नाही. दोन्हीकडे चौरंगी, बहुरंगी मामला. कोणतेही शासन असो काबाडकष्ट करणाऱ्या सामान्य माणसाला हवे कायद्याचे राज्य, शुद्ध हवा, अन्न आणि पाणी, देशाची संरक्षण सिद्धता, शिक्षणाचे स्वातंत्र्य व स्वस्त वस्त्र आणि निवारा. आपल्या देशात भ्रष्टाचार, हिंसा, दहशत यामुळे सध्या स्फोटक परिस्थिती आहे. त्यात पाकिस्तानचा ताबा लष्कराकडे. धर्म, जातिभेद यांचा उद्रेक तर प्रथमपासूनच होता व अजूनही आहे. कधी काय घडेल याचा नेम नाही. तेव्हा प्रत्येकाने डोळ्यात तेल घालून आपल्या मातृभूमीच्या संरक्षणासाठी सतर्क रहाणे जरुरीचे आहे. तसेच तिला सुजलाम् सुफलाम् बनविण्यासाठी कष्ट करणे जरुरीचे आहे.

काही दिवसातच आपण नवीन २१व्या शतकाकडे वाटचाल करणार. व त्या शतकातील परवलीचा शब्द आहे 'माहिती तंत्रज्ञान' या अनुषंगानेच आणखी असे सांगता येईल की, अफाट वेगाने बदलणाऱ्या या शतकात सर्व जुन्या संकल्पना मागे पडतील. शाळा, महाविद्यालये, कचेऱ्या सगळे ओस पडतील. सर्व लहान थोर घरीच संगणकावर आपापले व्यवहार करतील. तेव्हा नव्या शतकातील आव्हानांना तोंड देण्यासाठी ज्ञानार्जनाची कास धरणे जरुरीचे आहे. प्रगतिशील आधुनिक विचारांचा प्रवेश आपल्या देशात होण्यासाठी सदैव ज्ञानाचे दरवाजे उघडे ठेवण्याची जरुरी आहे.

'दिशा' दिवाळी अंकाचे वैशिष्ट्य म्हणजे आपल्या छंदाला, व्यवसायाला सर्व जीवन वाहिलेल्या तपस्व्यांच्या वा अंगी असलेल्या एखाद्या कलेला उत्तुंग यश लाभलेल्या अशा यशवंतांच्या 'मुलाखतींचा' अंक. सोबत दिवाळीच्या इतर रंगांसारखे साहित्याचे वेगवेगळे रंगही त्यात आहेत.

विसाव्या शतकातील ही अखेरची दिवाळी ! तेव्हा ती साजरी करताना आपल्या दारी उजळणारा प्रत्येक मंगल दीप हा ज्ञानाचा प्रकाश आपल्या घरात घेऊन येवो.

ही दिवाळी दिशाच्या सभासदांना, लेखकांना, वाचकांना, जाहिरातदाराना, हितचिंतकाना शांततेची, सुख समृद्धीची व भरभराटीची जावो. याच दिशाच्या संपादक मंडळातर्फे शुभेच्छा !

दिवाळीचे चार दिवस, आकाशकंदिल, पताका, रांगोळ्या यांनी नटवून, रंगीबेरंगी दिवे, फुलबाज्या, रोषणाई यांनी उजळून, गोड मिठाईचा आस्वाद घेत, नटून थटून, हसत, खेळत नवीन उगवणाऱ्या ज्ञानरुपी शतकाचे स्वागत करु या.

श्री. प्रभाकर पणशीकर, श्री. भाई गायतोंडे अशा दिग्गजांच्या मुलाखती, प्रा. प्रदीप कर्णिकांचा काळाची गरज ओळखून लिहिलेला लेख, श्री. श्रीनिवास बेळवींचा अभ्यासपूर्ण लेख, प्रिय बाबास ही सौ. हर्षदा बोरकर यांची एकांकिका असे वाचनीय साहित्य या अंकात आम्ही देत आहोत. तसेच विख्यात व्यंगचित्रकार वसंत सरवटे यांनी या अंकासाठी आपली व्यंगचित्रे पाठवली आहेत.

अचलकुमार टिळू
संपादक

# वृत्तपत्रक्षेत्रातील स्थित्यंतरे

श्री. चंद्रशेखर वाघ

*वृत्तपत्रसृष्टी स्वातंत्र्योत्तर काळात पार बदलली. पूर्वी पवित्र मानला जाणारा हा व्यवसाय आज धंदा बनला. या स्थित्यंतराचा मागोवा घेत आहेत ज्येष्ठ पत्रकार श्री. चंद्रशेखर वाघ - संपादक*

''वृर्तमान पत्रे हा धर्म की व्यवसाय'' असा प्रश्न अलिकडच्या काळात वारंवार विचारला जातो. वर्तमानपत्रांचे मूलभूत उद्देश आणि अलिकडच्या काळात-विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळात या क्षेत्रात झालेले परीवर्तन या प्रश्नातून सूचित केले जाते. वृत्तपत्रे आपल्या मूलभूत उद्दिष्टांपासून दूर चाली आहेत जाणवते. हा प्रश्न विचारणाऱ्यांच्या मनातील हेतू स्पष्ट आहे. पूर्वीच्या काळी लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याचे, लोकांचे प्रबोधन करण्याचे एक प्रभावी साधन म्हणून वृत्तपत्रांकडे पाहिले जात असे. स्वातंत्र्य लढ्याच्या काळात तर सामान्य जनांमध्ये स्वातंत्र्य प्राप्तीची आकांक्षा आणि त्यासाठी सर्वस्वाचा त्याग करून लढण्याची ऊर्मी निर्माण करणे हा वर्तमानपत्रांचा प्रमुख उद्देश होता. वर्तमानपत्रांचा इतिहास अभ्यासला तर बहुतेक वृत्तपत्रे हा त्या त्या काळातील लोकनेत्यांनी -आपल्या मतांचा प्रसार करण्यासाठी सुरु केली होती, असे दिसून येईल. मग ते वर्तमान पत्र लोकमान्य टिळकांचा 'केसरी' असो की गोपाळ गणेश आगरकरांचा 'सुधारक' असो किंवा दलित मुक्तीलढ्याचे अध्वर्यु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'प्रबुद्ध भारत' असो. राजकीय किंवा सामाजिक सुधारणांच्या लढ्यात प्रत्यक्ष सहभाग असणाऱ्या लोकनेत्यांची एखादे वृत्तपत्र काढण्याची परंपरा स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत चालू होती. स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वीच्या काळातील वर्तमानपत्रांनी समजामध्ये लोकजागृतीचे फार मोलाचे काम केले आहे. या लोकनेत्यांनी फार मोठी आर्थिक झीज सोसून सुद्धा वर्तमानपत्रे काढली. आणि अनेक संकटांना तोंड देत ती चालवली. या वर्तमानपत्रांचे संपादक हे विचारवंत, लोकाग्रणी व कार्यकर्ते असल्यामुळे लोकामनावर त्यांचा प्रभाव असे. या संदर्भात स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी काळकर्ते शिवराम पंत परांजपे यांच्या संबंधात काढलेले उद्‌गार लक्षात घेतले पाहिजे ? शिवरामपंतांचा (परांजपे यांचा) एकेक शब्द एखाद्या अग्निगोलकांसारखा असे. काळपत्रातील त्यांचे लेखन वाचून आमच्या सारख्या अनेकांना स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण करण्याची प्रेरणा मिळाली! ''सावरकरांसारखा ज्वलज्जहाल क्रांतिकारक ज्यांच्या शब्दांनी निर्माण केला, त्या शि.म. परांजपे यांची लेखणी व त्यांचे 'काळ' हे वर्तमानपत्र किती प्रभावी असेल याची सहज कल्पना येऊ शकते. म्हणूनच 'स्वातंत्र्य प्राप्तीच्या ध्येयाने तरुणांची मने पेटून उठली पाहिजेत '' असे जेव्हा लोकमान्य टिळक आपल्या 'केसरी'तून लिहीत तेव्हा खरोखरच एखादा वणवा पेटावा त्या प्रमाणे गावोगावी स्वातंत्र्यवीर युवकांचे जथे उभे राहात असत. त्या काळात वृत्तपत्रांचा उद्देश -जीवन हेतू-अगदी स्पष्ट होता. ''ज्यांच्याजवळ लोकांना सांगण्यासारखे काही आहे, त्यांनीच वर्तमानपत्र काढावे'' असे लोकमान्य टिळक नेहमी सांगत असत. स्वतः लोकमान्यानी केसरी काढला तो लोकांना काही सांगायचे होते, म्हणूनच. इ.स. १८३० साली केसरी सुरु झाला. मराठीतील पहिले वर्तमानपत्र 'दर्पण' हे बाळशास्त्री जांभेकरांनी त्याही पूर्वी अव्वल इंग्रजी आमदानीत सुरु केले. बाळशास्त्री जांभेकर प्रकांड पंडित

होते. संस्कृत आणि धर्मशास्त्र यांच्या प्रमाणेच इंग्लिश भाषचाही त्यांचा गाढा व्यासंग होता. या आंग्ल भाषेच्या सहाय्याने जांभेकर शास्त्र्यांचा आधुनिक शास्त्रांशी परिचय झाला होता. इंग्रजी भाषेच्या माध्यमातून 'वृत्तपत्र' या आधुनिक जगातील अमोघ अस्त्राची शास्त्र्यांना ओळख झाली होती. इंग्लीश मधील वृत्तपत्रे लोकमनावर व त्याच्या साह्याने तद्देशीय राज्यकर्त्यांवरही प्रभाव कसा टाकू शकतात. हे जांभेकर यांना माहीत होते. दरम्यानच्या काळात भारतामध्येही मुद्रण कलेचा प्रवेश झाला होता. त्यामुळे शास्त्र्यांनाही आपणसुद्धा एखादे वर्तमान पत्र सुरु करण्याची अनिवार इच्छा झाली. ''जागृती निर्माण करण्याच्या कामी इंग्लडमधील वर्तमान पत्रांनी घडविलेला चमत्कार आम्ही अभ्यासला आहे. असेच वर्तमान पत्र आपल्याकडे का असू नये या विचाराने आम्ही हे दर्पण वर्तमानपत्र सुरु करीत आहोत.'' असे बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पणच्या सुरुवातीच्या अंकात 'पत्रकर्त्याचे मनोगत'' व्यक्त केले होते. म्हणजेच लोकमान्य टिळकांनी केसरी सुरु करताना जो हेतू मनाशी धरला होता, तोच हेतू बाळगून दपर्ण हे मराठीतील पहिले वर्तमानपत्रही जन्मास आले होते. या प्रारंभीच्या काळात जी वर्तमान पत्रे सुरु झाली, त्या सर्वांना आपला धर्म कोणता हे स्पष्ट ठाऊक होते. शिवाय वर्तमान पत्र प्रसिद्ध करण्यासाठी फार मोठ्या भांडवलाची गरज त्याकाळी भासत नसे. लोकमान्य टिळकांनी म्हटल्याप्रमाणे लोकांना सांगण्यासारखे असणे, वर्तमानपत्र काढण्यासाठी पुरेसे असणे या संदर्भात विख्यात पंडित आणि ख्यातनाम चरित्रकार डॉ. जॉन्सन यांची एक आठवण येथे द्यावीशी वाटते. लेखक होण्याची हौस असलेले अनेक तरुण तरुणी मार्गदर्शनासाठी डॉ. जॉन्सन यांच्याकडे येत असत. अशीच हौशी महिला मार्गदर्शनासाठी जॉन्सन यांच्याकडे आली. व तिने जॉन्सन यांना विचारले, " What should I have if I want to be an author."

डॉ. जॉन्सन विद्वान होते तसेच मिष्किलही होते. क्षणभर त्या हौशी महिलेकडे पाहून जॉन्सन महाशय म्हणाले, 'Not much only a Pencil and a piece of paper !". यातील विनोद सोडून दिला तर तुम्हाला लेखक म्हणून प्रस्थापित व्हायचे असेल तर, तुमच्याजवळ लिहिण्यासारख काहीतरी असणं आवश्यक आहे, हे स्पष्ट आहे. वर्तमान पत्रांच्या बाबतीतही ते तितकचं खरं आहे. स्वातंत्र्याप्राप्तीपर्यंत वर्तमान पत्रांच्या क्षेत्रात तांत्रिक प्रगती फारशी झालेली नव्हती, आणि मुद्रणकलेचाही फारसा विकास झालेला नव्हता, तो पर्यंत 'लिहिण्यासारखं जवळ काही असणे. एवढ्या भांडवलावर वर्तमानपत्र सुरु करणं शक्य होत असे. प्रण मुद्रण कलेचा विकास होत गेला तस तसा वृत्तपत्रांसाही विकास होत गेल्याचं दिसून येईल. हे केवळ भारतापुरतचं खरं नाही, तर जगातील वृत्तपत्र व्यवसायाचा इतिहास पाहिला तर ही वस्तुस्थिती ध्यानी येऊ शकेल. मुद्रणपत्रातील प्रगतिमुळे हे प्रगत तंत्र स्वीकारणे वृत्तपत्रांनाही अपरिहार्य झाले. परिणामी वृत्तपत्रक्षेत्रात करावयाची गुंतवणूकही वाढली. यंत्रसामग्रीला लागणाऱ्या खर्चाबरोबरच वाचकांच्या वाढत्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी करावा लागणारा भरमसाठ खर्च हिशेबात घेतला की या क्षेत्रात फार मोठ्या भांडवलाची आवश्यकता कशी निर्माण झाली, समजू शकतो. या नव्या परिवर्तनाचा परिणाम असा झाला की, वर्तमान पत्रांना एका संघटित उद्योगाचे स्वरुप प्राप्त झाले. त्या बरोबरच औद्योगिक क्षेत्रातील काही अपप्रवृत्तीही पत्रकारिकेत शिरल्या. या स्थित्यंतरा मुळेच वर्तमान पत्र - धर्म का धंदा ? हा प्रश्न निर्माण झाला. पत्रकारितेमध्ये किंवा वत्तपत्रक्षेत्रामध्ये झालेल्या या स्थित्यतंराने पहिला बळी घेतला असेल तर तो वत्तपत्रांच्या विश्वासार्हतेचा. वृत्तपत्रांनी ही प्रगती म्हणायची की अधोगती? असा प्रश्न अनेकांना पडतो. ते काही का असेना. पण परिणाम वृत्तपत्रक्षेत्राच्या औद्योगिकीकरणाचा आहे हे निश्चित. वृत्तपत्रीय तंत्रात विकास झाला त्यामुळे वृत्तपत्रांचे बहिरंग अधिक सुबक आणि देखणे किंवा आजच्या भाषेत

बोलायचे तर वृत्तपत्रांचे बहिरंग अधिक बहुरंगी आणि बहुढंगी झाले असले तरी केवळ तंत्राच्या आहारी गेल्यामुळे विश्वसनीयता हा जो वृत्तपत्रांचा आत्मा, वृत्तपत्रांचे खरे सामर्थ्य, त्या मंत्राचेच वृत्तपत्रांना विस्मरण होऊ लागले. हे कितीही कटु वाटले तरी वस्तुस्थिती आहे. माझ्या मते या खेदजनक परिवर्तनाचा दोष या क्षेत्राचे औद्योगीककरण करणाऱ्या हित संबंधी लोकांकडे दोष जातो, तेवढाच तो दोष वाचकांकडेही जातो. वाचकांचा दबाव वृत्तपत्रांवर कायम राहिला तर, हे अपरिहार्य पण अप्रिय स्थित्यंतर रोखता येणे शक्य आहे असे मला वाटते. वृत्तपत्रांची विश्वासार्हता विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात किती झपाट्याने उतरणीस लागली याची साक्ष अमेरिकेचे एक माजी अध्यक्ष विड्रो विल्सन यांच्या उद्गारावरून येते. श्री. विल्सन यांनी आपल्या अध्यक्षीय निवडणुकीचा प्रसार करताना वृत्तपत्र स्वातंत्र्याचे जतन करण्याची हमी दिली होती. त्यावेळी ते म्हणाले होते, " If you ask me to offer either Govt. without News paper or a newpaper without a Govt. I will not hesitate to offer the later i.e. a newspaper without Govt." वर्तमानपत्र आणि सरकार यामध्ये वृत्तपत्राला पसंती देणाऱ्या वुड्रो महाशयांवर काही महिन्याच्या आत "I was wrong in believing in News Papers" असे म्हणण्याची पाळी आली. आज अमेरिकन वृत्तपत्रसृष्टीचे हे प्रतिबिंब भारतीय वृत्तपत्र सृष्टीतही पडू लागल्याचे जाणवते. पण सुदैवाने वृत्तपत्रांच्या मूळ मंत्राचे विस्मरण झालेल्या पत्रकारांची संख्या तुलनेने कमी आहे आणि तीच उद्याची आशा आहे. वर्तमानकालीन आगरकर नाहीत, अशी खंत व्यक्त केली जाते. आपल्या मतांसाठी वाटेल ती किंमत मोजायची तयारी टिळक आणि आगरकर यांनी दाखवली म्हणूनच त्यांची नावे कित्येक वर्षांनंतर सुद्धा प्रकाश देत आहेत. पण आज टिळक आगरकर नसले तरी पंजाबातील खलिस्तानवादी अतिरेक्यांविरुद्ध मोहीम चालवल्याबद्दल आपल्या तीन पिढ्यांचा बळी देणाऱ्या 'पंजाब केसरी' च्या संपादकांचे उदाहरण आजही आपल्यासमोर आहे. आणि मला वाटतं 'Silverlining to every cloud' म्हणतात, त्या प्रमाणं हा आशेची सोनेरी किनार आहे.

**श्री. चंद्रशेखर वाघ**

कोपरी, ठाणे ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६०८४.

• • •

With Best Compliments From

**M/s Ceramic Studio**

Fixtures and Fittings
for
a Complete home

3/4 Shiv kanchi,
Gen. Arun Vaidya Marg, Panchpakhadi,
Thane (w) 400 602.

Tel. : 5339645 • Fax : 5332823

सदाचार हाच खरा धर्म आहे. - नारायण गुरु

# लोकमान्य टिळक व शिक्षणक्षेत्र

श्री. श्रीनिवास बळवंत बेळवी

*(लोकमान्य टिळकांचे तत्कालिन राजकारणातील स्थान सर्वांनाच माहित आहे. टिळकांच्या जीवनाचा गाढा अभ्यास करणारे न्या. श्री. श्रीनिवास बेळवी यांनी सदर लेखात टिळकांच्यात असणाऱ्या शिक्षकावर विचार व्यक्त केले आहेत. - संपादक)*

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' असे परकी इंग्रज सरकारला बजावून सांगणारे, गीता रहस्य हा महान ग्रंथ लिहिणारे, प्रकांड पंडित, राष्ट्रकार्यासाठी मंडाले येथे सहा वर्षे खडतर कारावास भोगणारे थोर देशभक्त लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण संपल्यानंतर त्यांच्या आयुष्याला सुरुवात केली, ती एक शिक्षक म्हणूनच. ते स्वतः शाळेत व महाविद्यालयात एक बुद्धिवान विद्यार्थी म्हणून ओळखले जात. धकाधकीच्या राजकारणात भाग घेऊन सुद्धा आयुष्यभर त्यांचा विद्या व्यासंग चालूच होता. त्यांचे वाचन अफाट होते. आयुष्यभर त्यांनी ज्ञानाची उपासना केली.

टिळकांचा जन्म दि. २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी येथे झाला. त्यांचे पाळण्यातील नाव 'केशव' असे ठेवले होते. पण प्रेमाने त्यांना घरात 'बाळ' असे म्हटले जाई. कालांतराने केशव हे नाव मागे पडून बाळ हेच नाव रूढ झाले. वडिल गंगाधरपंत हे रत्नागिरी येथे सरकारी शिक्षण खात्यात नोकरीत होते. वयाच्या पाचव्या वर्षी बाळने रत्नागिरी येथील शाळेत जाण्यास सुरुवात केली. त्यापूर्वीच गंगाधरपंतानी त्यांची संस्कृत व गणित या विषयात खूपच तयारी करुन घेतली होती. टिळक दहा वर्षांचे असताना त्यांचे वडिल गंगाधरपंत हे असिस्टंट डेप्युटी इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स या पदावर बढती मिळून पुणे येथे बदलून गेले व टिळकांचे पुढील शिक्षण पुणे येथे चालू झाले.

१८७६ साली टिळक पुण्याच्या डेक्कन कॉलेजातून मुंबई विद्यापीठाची बी.ए. ची परीक्षा गणित हा विषय घेऊन पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. १८७९ साली एल्.एल्.बी. ची परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाल्यामुळे ते त्या काळात न्यायखात्यात प्रवेश करून अगदी सहज मुन्सफ झाले असते. किंवा त्यांच्या अंगच्या हुशारीमुळे ते एक यशस्वी व नामवंत वकिल झाले असते. त्यांनी मुन्सफीच्या जागेकरिता अर्जही केला होता. पण नंतर त्यांनी बेत बदलला व शिक्षक म्हणून जीवनाला सुरुवात करण्याचे ठरविले.

एकंदर परिस्थितीचा अभ्यास केल्यानंतर टिळकांचे असे मत बनले की ''हल्लीचे शिक्षण एकांगी आहे व ते फक्त सरकारी नोकरीस लागणारे अवश्य गुणच एतद्देशीय लोकांच्या अंगांत आणण्याकरिता योजलेले आहे. आजच्या युनिव्हर्सिट्या या केवळ सरकारी नोकर तयार करण्याचे कारखाने झाले आहेत. वास्तव लोकास धर्म, नीती, शास्त्रीय शोध, धंदेशिक्षण वगैरे राष्ट्राच्या उत्कर्षास अवश्य लागणाऱ्या ज्ञानांचे व कलांचे शिक्षण देणाऱ्या नवीन व राष्ट्रीय अशा शिक्षणाची आता गरज आहे.'' या ध्येयाने प्रेरित होऊन टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर या दोघांनी शिक्षणाच्या क्षेत्रांत एकत्र काम करण्याचे ठरविले. राष्ट्रीय शिक्षण देणारी अशी नवीन इंग्रजी शाळा सुरु करावी अशी योजना होती. त्यांत टिळक व आगरकर यांनी या शाळेत शिक्षक म्हणून शिकविण्याचे मान्य केले. वामन शिवराम आपटे व माधवराव नामजोशी असे दोन सहकारी शिक्षक म्हणून या नव्या सुरु होणाऱ्या शाळेत शिकविणार होते. अशा प्रकारे १ जानेवारी १८८० रोजी पुणे येथे न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना झाली. वामन शिवराम आपटे हे

शाळेचे पहिले मुख्याध्यापक होते. सर्वच शिक्षक समाजसेवा आणि देशातील तरुण पिढीत नव्या जाणिवा निर्माण करणे या ध्येयाने भारलेले होते. त्यांना आकर्षक व सुरक्षित अशी सरकारी नोकरी अगदी सहज मिळू शकत होती. परंतु या विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन या सर्वांनी जाणून बुजून हा खडतर मार्ग पत्करला व शिक्षक म्हणून काम करण्याचे ठरविले. टिळकांच्या जीवनातील ध्येयांचे पर्व चालू झाले.

या ध्येयवादी शिक्षकांच्या संस्थेकडे विद्यार्थी लवकरच आकर्षित होऊ लागले. विद्यार्थ्यांची सुरुवातीची ३५ ही संख्या एका वर्षाने ३३६ वर गेली. डॉ. हंटर या त्यावेळच्या शिक्षण अधिकाऱ्यांच्या मते न्यू इंग्लिश स्कूलचा दर्जा सरकारी हायस्कूलपेक्षा वरचा होता व भारतातील काय पण परदेशांतील शाळांच्या तुलनेत हे स्कूल सरस ठरते.

या शाळेला लोकांचा जो प्रतिसाद मिळाला. त्यामुळे टिळक आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा उत्साह दुणावला. त्याची परिणती म्हणून आणि शिक्षणक्षेत्रातील पुढचे पाऊल म्हणून २४ ऑक्टोबर १८८४ रोजी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. आणि २ जानेवारी १८८५ रोजी सोसायटीच्या विद्यमाने पुणे येथे फर्ग्युसन कॉलेज सुरु झाले. हे कॉलेज सुरु झाल्यामुळे टिळक व आगरकर यांचे उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात काम करण्याचे स्वप्न साकार झाले.

फर्ग्युसन कॉलेज शनिवार पेठेतील गद्रे वाड्यात सुरु झाले. नंतर काही वर्षांनी ते भाम्बुर्ड्याच्या स्वतःच्या भव्य वास्तूत गेले. त्यावेळचे भारताचे व्हॉईसराय लॉर्ड रिपन, मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन आणि अनेक संस्थानिक डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आश्रयदाते झाले होते. आज या सोसायटीच्या शिक्षण संस्था पश्चिम महाराष्ट्रात सर्वत्र पसरलेल्या आहेत.

श्री. गोपाळ गणेश आगरकर हे फर्ग्युसन कॉलेजचे पहिले प्राचार्य होते. टिळक हे गणित हा विषय कॉलेजात शिकवीत असत. हा विषय त्यांचा आवडीचा होता. या विषयात त्यांचा अगदी हातखंडा होता. वर्गात गणित शिकविताना ते रंगून जात असत. ते रोजच्या व्यवहारातील उदाहरणे देऊन गणित हा रुक्ष विषय मनोरंजक करीत असत. विद्यार्थ्यांचे शंकासमाधान करण्याचा त्यांनी कधीही कंटाळा केला नाही. वर्ग संपल्यानंतर घरी जाताना सुद्धा टिळक रस्त्यात विद्यार्थ्यांच्या घोळक्यात आहेत व त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत आहेत असे दृश्य नेहमी दिसत असे.

टिळक हे हाडाचे शिक्षक होते. शिक्षणक्षेत्र हेच त्यांच्या आवडीचे खरे क्षेत्र होते. तेथेच आयुष्यभर काम करण्याची आपली इच्छा होती पण, राजकारणात केवळ अनिच्छेने उतरलो असे टिळक म्हणत असत. याबाबतीत कै. दत्तात्रय बाळकृष्ण कालेलकर (काका कालेलकर) यांनी एक आठवण सांगितली आहे. ती अशी :-

टिळकांशी त्यांचा मित्र बोलता बोलता म्हणाला, 'बळवंतराव, स्वराज्यात तुम्ही कोणते काम पत्कराल ? तुम्ही मुख्य दिवाण व्हाल की, परराष्ट्रमंत्री बनाल ?' टिळकांनी उत्तर दिले, 'नाही हो, स्वराज्य स्थापन झाल्यावर एखाद्या स्वदेशी कॉलेजात गणित विषयाच्या प्रोफेसरचे काम पत्करीन व सार्वजनिक चळवळीतून अंग काढून घेईन. मला राजकारणाचा तिटकारा आहे. 'डिफरेन्शिअल कॅलक्युलस' वर एखादे पुस्तक लिहावे असे मला अजून वाटते. देशाची स्थिती फार वाईट आहे आणि तुमच्यापैकी कोणी काही करीत नाही, म्हणून मला इकडे लक्ष घालावे लागत आहे.''

टिळक व आगरकर यांच्यामध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या कामकाजाच्या बाबतीत मतभेदास सुरुवात झाली. सोसायटीच्या प्रत्येक सभासदास दरमहा पंचाहत्तर रुपये इतके वेतन होते. ते वाढवून देण्यास टिळकांचा विरोध होता. त्याचप्रमाणे सोसायटीच्या सभासदांनी कॉलेजच्या बाहेर अन्य व्यवसाय करून द्रव्यार्जन करणेही टिळकांना

मान्य नव्हते. या दोन मुद्यांवरून एका बाजूला टिळक व दुसऱ्या बाजूला आगरकर व बहुसंख्य सभासद यांच्या मध्ये तीव्र मतभेद झाले. इतके की ते मतभेद मिटणे अशक्यप्राय झाले. तेव्हा अगदी व्यथित अंतःकरणाने टिळकांनी ऑक्टोबर १८९० मध्ये राजीनामा दिला. फेब्रुवारी १८९१ पासून त्यांचा डेक्कन एज्युकेशन सोसायटी व फर्ग्युसन कॉलेजबरोबर असलेला संबंध संपला.

एकट्या टिळकांवर त्यांच्या सर्व कुटुंबाची जबाबदारी होती. म्हणून फर्ग्युसन कॉलेजमधून बाहेर पडल्यानंतर चरितार्थाचे साधन म्हणून एक लॉ क्लास (कायद्याच्या अभ्यासाचा वर्ग) त्यांनी सुरु केला. हा लॉ क्लास ज्यांना हायकोर्ट प्लीडरची परिक्षा देऊन वकिली व्यवसाय करावयाचा आहे अशा भावी वकिलांसाठी होता. हा क्लास चांगला भरभराटीला आला व तो सात वर्षे चालला. टिळक स्वतः इक्वीटी, पुराव्याचा कायदा व हिंदू कायदा असे कठीण विषय शिकवीत असत. हिंदू कायदा हा टिळकांचा खास विषय होता व तो शिकविण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांचे हिंदू कायद्याचे ज्ञान सूक्ष्म आणि विशाल असे होते. हिंदू कायद्याचे विवेचन करणारा एक विस्तृत ग्रंथ लिहावा असे टिळकांनी योजिले होते. त्यासाठी त्यांनी टिपणेही काढली होती. पण टिळकांच्या मागे असलेल्या अनेक व्यापांमुळे त्यांच्या हातून हा ग्रंथ लिहून होऊ शकला नाही.

टिळक स्वतः उत्तम शिक्षक होते. स्वतःच्या मुलांच्या अभ्यासाकडे त्यांचे पूर्ण लक्ष होते. वरचेवर ते मुलांची प्रगती पुस्तके तपासत असत व मुलांना अभ्यास कसा करावा याबाबत मार्गदर्शन करीत असत. टिळकांना सहा वर्षे मंडाले (ब्रह्मदेश) येथे तुरुंगवास भोगावा लागला. त्या काळांत त्यांना त्यांच्या बायकामुलांचा वियोग सहन करावा लागला. डोक्यावर ताईमहाराज खटला व इतर अनेक विवंचना होत्या. त्याच काळात त्यांनी गीतारहस्य हा महान ग्रंथ लिहिला. परंतु मुलांच्या अभ्यासाचा विसर पडू दिला नाही.

टिळकांना मंडालेहून घरी दर महिन्याला एकच पत्र पाठविण्याची परवानगी होती. या पत्राचीही तपासणी होऊन काटाकाट होत असे. टिळकांनी अशा काही पत्रातून शिक्षकाने विद्यार्थ्यांचा अभ्यास कसा घ्यावा व विद्यार्थ्याने कसा करावा याबद्दल मार्गदर्शन केलेले आहे. टिळक लिहितात - तो धडा विद्यार्थ्याने मोठ्याने वाचावा. शिक्षकाने त्यानंतर विद्यार्थ्याला प्रश्न विचारून तो धडा त्याला कितपत समजला आहे ते आजमावून पहावे. धड्याचा जो भाग समजला नसेल तो भाग शिक्षकाने विद्यार्थ्याला समजावून द्यावा. शेवटी शिक्षकाने विद्यार्थ्याला घरी करण्यासाठी अभ्यास नेमून द्यावा. जो अभ्यास विध्यार्थ्याने स्वतः लिहून काढावयाचा आहे. विद्यार्थ्याने धडा स्वतः मोठ्याने वाचणे व त्यानंतर तो समजावून घेऊन लिहून काढणे यावर टिळकांचा कटाक्ष होता. त्याने वाचलेले कायमचे स्मरणांत राहते असे त्यांचे सांगणे म्हणणे असे.

१९२० साली टिळक ज्योतिष संमेलनासाठी सांगलीला गेले होते. तेथे काही शालेय विद्यार्थी त्यांना भेटावयास आले. टिळक विद्यार्थ्यांना भेटण्यास व त्यांचे प्रश्न समजावून घेण्यास नेहमीच उत्सुक असत. ते विद्यार्थी टिळकांना म्हणाले, 'महाराज, आम्हालाही तुमच्या सारखे तुरुंगात जाऊन देशभक्ती करावयाची आहे; तरी आम्हाला मार्गदर्शन करा. त्यावर टिळक म्हणाले, ' तुरुंगात जाणे म्हणजे देशभक्ती नव्हे. तर आपले कर्तव्य योग्य प्रकारे बजावणे हीच खरी देशभक्ती आहे. देशभक्ती ही काही वेगळी गोष्ट नाही. आज विद्यार्थी म्हणून अभ्यास चांगला करणे, गुरुजनांचा व आईवडिलांच्या आज्ञेत राहणे, उत्तम आरोग्य संपादन करणे हे तुमचे कर्तव्य आहे आणि ते चांगल्या प्रकारे पार पाडणे हीच तुम्ही करावयाची देशभक्ती आहे.''

टिळकांचे हे मार्गदर्शन आजही उपयुक्त आहे. टिळकांनी आयुष्यभर ज्ञानाची उपासना केली. त्यांचे वाचन

---

अफाट व अखंड होते. त्यांचा स्वतःचा असा फार मोठा ग्रंथसंग्रह होता. त्यांनी वेदान्त, ज्योतिषशास्त्र, महाभारत, रामायण, कुराण, बायबल, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, तत्वज्ञान, गणितांच्या सर्व शाखा, कायदा, धर्मशास्त्र इत्यादि अनेक विषयांचा सखोल अभ्यास केला होता. त्याची परिणती म्हणून त्यांच्या हातून 'ओरायन', 'आर्क्टीक होम इन दि वेदान्ज' आणि 'गीतारहस्य' हे ग्रंथ लिहून झाले. गीतारहस्य त्यांनी मंडालेच्या तुरुंगात लिहिले. एकट्या मंडालेच्या सहा वर्षांच्या काळांत टिळकांनी जवळजवळ चारशे पुस्तके अभ्यासिली. त्या शिवाय पाली, फ्रेंच, जर्मन भाषांवरही प्रभुत्व मिळविले. संस्कृत भाषेचा त्यांचा व्यासंग तर अगदी पूर्वी पासूनच होता.

असा विद्याव्यासंग टिळकांनी कसा केला ? त्याला कारणे दोन. एक म्हणजे त्यांची अफाट परिश्रम करण्याची तयारी आणि दुसरे कारण म्हणजे त्यांची विलक्षण स्मरणशक्ती.

रविवार दिनांक ७ जुलै १९१८ रोजी मॉन्टेग्यु-चेम्सफर्ड यांचा अहवाल सकाळी केसरी कचेरीत आला. या अहवालाप्रमाणे हिंदुस्थानला मोठ्या प्रमाणात स्वायत्तता मिळेल असा एक तर्क होता. म्हणून टिळक त्या अहवालाची मोठ्या उत्कटतेने वाट पहात होते. केसरी मंगळवारी सकाळी प्रसिद्ध होत असे. रविवारी सकाळी अहवाल घेऊन टिळक जे एकदाही न उठता बसले ते सोमवारी दुपारी बारावाजेपर्यंत. सोमवारी दुपारी बारा वाजता त्यांनी आपल्या लेखनिकाला बोलविले व हा अहवाल निराशजनक आहे असा आशय असलेला ''उजाडले ! पण सूर्य कोठे आहे ?'' हा अग्रलेख केसरीच्या मंगळवारच्या अंकासाठी त्याला सांगितला. आणि त्यानंतरच ते स्नानभोजनासाठी उठले. त्यावेळी टिळकांचे वय बासष्ट होते. त्या वयात जर त्यांनी असे परिश्रम केले होते तर तरुण वयात त्यांनी किती कठोर परिश्रम केले असतील याची कल्पना येते.

टिळकांची स्मरणशक्ती अगदी लोकविलक्षण होती. १७ नोव्हेंबर १८९७ रोजी मुंबई हायकोर्टात न्या. स्ट्रॅची यांनी टिळकांना राजद्रोहाच्या गुन्ह्यासाठी अठरा महिने सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. त्याच दिवशी त्यांची रवानगी मुंबईतील भायखळा कारागृहात करण्यांत आली. (आता तेथे बालसुधारगृह आहे.) त्या काळांत मुंबई हायकोर्टात फौजदारी खटले चालविण्यासाठी न्यायाधीश बरोबर नऊ सदस्यांची एक ज्युरी असे. खटल्याच्या शेवटी दोन्ही बाजूंच्या वकिलांचे युक्तिवाद संपल्यानंतर न्यायाधीश ज्युरीसमोर भाषण करुन ज्युरीला सर्व खटला समजावून देत असे. त्यानंतर आरोपी हा दोषी आहे की निर्दोषी हे ज्यूरीनेच ठरवावयाचे असते. न्यायाधीशाचे ज्यूरीला उद्देशून केलेले भाषण (charge to the Jury) हेच खटल्यातील निकालपत्र असे.

भायखळा कारागृहात गेल्यानंतर दिवसा हायकोर्टात न्या. स्ट्रॅची यांनी ज्युरीसमोर केलेले भाषण केवळ आपल्या स्मरणशक्तीने लक्षात ठेवून प्रिव्ही कौन्सिल (लंडन) ला करावयाचे अपील त्याच रात्री टिळकांनी तयार केले. दुसरे दिवशी ते अपील टिळकांचे बॅरिस्टर प्यु यांना मिळाले. न्या. स्ट्रॅची यांच्या भाषणाची प्रत प्यु यांना मिळाली नव्हती. म्हणून ते अपील तयार करू शकले नव्हते. केवळ भाषण ऐकून फक्त स्मरणशक्तीच्या जोरावर टिळकांनी अपील तयार केले आहे हे त्यांना कळल्यावर ते आश्चर्यचकित झाले. त्यांनी ते अपील वाचले. ते म्हणाले,'या अपीलांत सर्व मुद्दे आलेले आहेत. न्या.स्ट्रॅचींच्या भाषणाची प्रत समोर ठेवून सुद्धा मी असे अपील तयार करू शकलो नसतो. टिळकांनी हे अपील केवळ त्यांच्या स्मरणशक्तीने केले आहे. धन्य त्यांच्या स्मरणशक्तीची आणि त्यांच्या बुद्धिमत्तेची.''

मंडाले येथील तुरुंगात टिळकांनी गीतारहस्य हा जगन्मान्य ग्रंथ लिहिला. परंतु तुरुंगातून सुटका होताना या

ग्रंथाचे हस्तलिखित त्यांना देण्यात आले नाही. सरकारने हे हस्तलिखित जप्त केले आहे अशीही एक बातमी त्यावेळी होती. हस्तलिखित परत करावे म्हणून सरकारला एक अर्ज करावा असे एकाने टिळकांना सुचविले. त्यावर टिळक म्हणाले, 'सरकारने हस्तलिखित जप्त केले असेल, पण माझा मेंदू तर जप्त नाहीना केला ? मी सरकारकडे नाही याचना करणार. मी माझ्या स्मरण शक्तीने हा ग्रंथ पुन्हा लिहून काढीन''

एक ज्ञानोपासक आणि आदर्श शिक्षक म्हणून शिक्षण क्षेत्रात लोकमान्य टिळकांनी केलेले कार्य हे असे अद्वितीय आहे.

**श्रीनिवास बळवंत बेळवी**
निवृत्त मुख्य न्यायाधीश
लघुवाद न्यायालय, मुंबई
दूरध्वनी : ८८७ ९७३८

•••

### प्रार्थना

कशाचा कशाला
नसावा रे अर्थ
सारे हे निरर्थ
वाटू लाग

वेदना उत्सव
वेदनाच ऊर्जा
मनात माझ्या ही
मात्रा असे

तुझ्यात विरावे
कुठी न उरावे
अस्तित्व माझे हे
माझ्यासाठी

**मोहन पाठक**

### वाचकांच्या प्रतिक्रिया

प्रा. मोहन,

तू पाठवलेला 'दिशा' वाचला. अतिशय वैविध्यपूर्ण लेख व 'परिसरवार्ता' आवडले. विद्या प्रसारक मंडळाचा हा उपक्रम लोकांपर्यंत पोहचण्याची गरज आहे. दिशाला अनेक वाचक मिळावेत ही सदिच्छा !

अरुण जोशींचा पर्यावरणासंबंधातील लेख उत्कृष्ट!

श्री. आनंद लिमये, घंटाळी, ठाणे.

•••

### वाचकांच्या प्रतिक्रिया

संपादक, दिशा

विविधता आणि माहिती व विचार हे दिशाचे विशेष खूप भावले. अरुण जोशी, अरुण ठाकूर यांचे लेख खूप आवडले. दिशाची वर्गणी पाठवत आहे. कृपया स्वीकारावी व अंक नियमितपणे पाठवावा.

प्रा. रोहिणी सरपोतदार, वर्तकनगर, ठाणे.

•••

---

दुसऱ्याच्या चुका काढण्याचा खटाटोप करण्यापेक्षा स्वतःचे दोष काढून ते सुधारण्याचा प्रयत्न करणे अधिक चांगले.

# प्रकल्प (Projects) या विषयी ग्रंथालयाच्या अपेक्षा

प्रा. प्रदीप कर्णिक

*(महाविद्यालयीन शिक्षणात प्रकल्प लेखनाला दिवसे नृ दिवस महत्व प्राप्त होत आहे. त्या दृष्टीने प्रा. प्रदीप कर्णिक यांचा हा लेख मार्गदर्शक ठरणारा आहे. - संपादक )*

मुंबई विद्यापीठाने 'प्रकल्प' हा विषय प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षा करिता आवश्यक भाग म्हणून अभ्यासक्रमात त्याचा समावेश केला आहे. ग्रंथालय विद्यापीठाच्या या उपक्रमाचे स्वागत करीत आहे. स्वागत करण्या पाठीमागे ग्रंथालयाचे काही उद्देश आहेत.

१) यामुळे विद्यार्थी वर्ग ग्रंथालयाकडे वळू शकतो.

२) विद्यार्थ्यांपर्यंत अभ्यासक्रमाशी निगडीत पण इतर वाचन साहित्याशी त्यांचा संपर्क वाढू शकतो. त्यामुळे वाचनाची / अभ्यासाची गोडी निर्माण होऊ शकते.

३) विद्यार्थ्यामध्ये लेखन कौशल्याची सवय लागू शकते.

या प्रकल्पाला दहा गुण असल्याने विद्यार्थी गंभीरपणे या विषयाकडे पहात असतात, पण त्यांच्या अनेक अडचणीही ग्रंथालयाच्या लक्षात आल्या आहेत.

त्या अडचणी अशा :

१) विद्यार्थ्यांना नीट मार्गदर्शन होण्याची आवश्यकता जाणवते.

२) विषय आणि प्रकल्पाचे शीर्षक यात त्यांचा गोंधळ उडालेला असतो.

३) या गोंधळामुळे ग्रंथालयात नेमके काय शोधायचे ते त्यांना उमजत नाही.

४) अनेक पुस्तकं दाखवूनही त्यांना नेमके शीर्षक ठरवता येत नाही.

५) या अनेक वा या सारख्या काही कारणांमुळे विद्यार्थ्यांचा आणि ग्रंथालयाचा वेळ वाया जातो.

६) प्रकल्पाचे लेखन कसे करावे हे त्यांना माहीत नसते.

अशा अडचणींवर मात करण्यासाठी ठोस उपाय करण्याची आवश्यकता आहे. असे उपाय प्राध्यापक आणि ग्रंथालय यांच्या संयुक्त चर्चेतून निघू शकतात. ते उपाय करण्यापूर्वी ग्रंथालयालाच काही बाबींची माहिती करून घ्यावी असे वाटते.

ग्रंथालयाचे प्रश्न असे :

१) प्रत्येक वर्षासाठी कोणत्या अभ्यासक्रमात प्रकल्प करायचे आहेत ते ग्रंथालयाला कळत नाही.

२) त्या त्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक प्राध्यापक कोण ते माहीत नसते. त्या विषयासाठी किती विद्यार्थी असणार आहेत ते माहीत नसते.

३) प्रकल्पासाठी विषय निवडण्याची पद्धती मार्गदर्शक प्राध्यापक कशी व कोणती ठरवतात ?

४) ठरवलेले विषय आणि त्या संदर्भात ग्रंथालयात वाचन साहित्य आहे किंवा नाही याचा विषय ठरवण्यापूर्वी शोध न घेतल्याने सुसूत्रता रहात नाही.

५) विद्यार्थ्यांना प्रकल्पासाठी मार्गदर्शनाची आवश्यकता आहे असे सतत विद्यार्थ्यांशी बोलताना ग्रंथालयाला जाणवते. वरील मुद्यांची माहिती ग्रंथालयापाशी असेल तरच ग्रंथालयही मार्गदर्शनात सहभागी होऊ शकेल.

या प्रश्नांवर ग्रंथालयाला पुढील उपाय सुचतात :

१) प्रत्येक मार्गदर्शक प्राध्यापकाने त्यांच्या त्यांच्या अभ्यासक्रमातील विषय नमूद करून, त्यावर कोणत्या पद्धतीचे विषय त्यांनी निवडले आहेत ते कृपया ग्रंथालयाला कळवावे.

२) मार्गदर्शक प्राध्यापकाचे नावही कळवल्यास ग्रंथालयाला त्यांच्याशी संपर्क साधता येईल.

३) निवडलेल्या विषयावर ग्रंथपालांशी चर्चा त्या मार्गदर्शकाने केल्यास ती उपयुक्त ठरू शकते.

४) ग्रंथालय आणि मार्गदर्शक प्राध्यापक यांनी संयुक्तपणे निवडलेल्या विषयांवरील वाचन साहित्याची यादी (सूची) तयार केल्यास, सर्वांचा वेळ वाचेल व विद्यार्थी दिशाहीन होणार नाही.

५) तयार केलेल्या वाचन साहित्याच्या यादीवरून जितके विद्यार्थी असतील तितकी शीर्षके (Title of Projects) तयार करता येऊ शकतात. ग्रंथालय या कार्यात आनंदाने सहभागी होईल. (शीर्षके तयार करण्याची जबाबदारी मार्गदर्शक आणि ग्रंथालयाने स्वीकारायला हवी. विद्यार्थ्यांचा यात फारच गोंधळ उडत असतो.)

६) विद्यार्थ्यांपुढे 'प्रकल्प' विषयाचे व्याख्यान सुरू करण्यापूर्वी ही तयारी (जिला पूर्वतयारी म्हणतात) आहे असे ग्रंथालयाला वाटते. असे झाले तर त्याचा उपयोग उत्तम तर होईलच, पण सर्वांचा वेळ वाचेल. एक दिशा प्राप्त होईल.

यासाठी ग्रंथालयाकडे पुढील आराखड्यात माहिती मार्गदर्शक पाठवू शकतात.

## आराखडा

(१) मार्गदर्शक प्राध्यापकाचे नाव : ____________________

____________________

(२) वर्गवारी :

| प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष |
|---|---|---|
| (F.Y.) | (S.Y.) | (T.Y.) |

(३) पेपरचा क्रमांक:

(४) पेपरचे नाव :

(५) पेपर मधील महत्त्वाचे विषय :

१)

२)

३)

४)

५)

(६) मनात योजलेले प्रकल्पाचे विषय :

१)

२)

३)

४)

५)

(७) विद्यार्थ्यांची संख्या :

(८) प्रकल्प लेखनाची अंदाजे शब्दसंख्या (अपेक्षित) :

(९) प्रकल्प पूर्ण करावयाची कालमर्यादा :

अशा आराखड्यात माहिती ग्रंथालयात जमा झाल्यावर ग्रंथालयाला पुढील शोधाला, चर्चेला, सूची बनवण्याच्या कार्यास चालना देणे सोपे पडेल.

**विषय आणि शीर्षके यातील भेद स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे.**

विषय कोणताही असला तरी तो व्यापक असतो. उदा. Industrial Economy, Insects किंवा बोली भाषा, ऐतिहासिक कादंबरी. असे विषय दिल्याने गोंधळ उडतो. या विषयात विद्यार्थ्याला अचूक शीर्षक काढून देणे सोयिस्कर ठरेल. उदा. 'पाल' हा विषारी प्राणी आहे का ? विंचवाच्या विषावर केलेले संशोधन, 'उपरा' मधील शब्दांचा शोध अशी शीर्षके काढता येतील. यासाठी विद्यार्थ्याने प्रकल्प लेखन कोणत्या स्वरूपात करावे, कशा पद्धतीने करावे तेही ठरवता येऊ शकते.

**प्रकल्प लेखनाच्या पद्धती**

१) निबंध लेखन

२) मुलाखत

३) पुस्तक परीक्षण

४) एखाद्या लेखावर चिकित्सा

५) तौलनिक अभ्यास

६) संकल्पना/संज्ञांचा शोध/चर्चा/चिकित्सा

७) अभ्यासक्रमातील एखाद्या विषयाची सूची

८) संकलन

९) प्रश्न (Problem) चा घेतलेला शोध

१०) पाहणी (सर्व्हे)

११) पुस्तकात विशद केलेली कार्यपद्धती आणि तिचा प्रत्यक्षातील वापर

१२) एखादा प्रश्न (Problem) घेऊन त्याची ५-८ तज्ज्ञांबरोबर केलेली चर्चा

१३) चरित्रात्मक नोंद (शास्त्रज्ञ, लेखक, संशोधक इत्यादी)

१४) ऐतिहासिक आढावा

१५) सांख्यिकी तपशील

१६) स्थळाला भेट व त्याचा वृत्तांत

१७) अनुवाद

प्रत्येक वर्षी या पैकी कोणत्याही चार वा पाच पद्धती निवडल्यास, दरवर्षी नवीन पद्धत घेऊ शकते व कॉपी होण्याचा धोका टाळता येऊ शकतो. इतक्या पद्धतशीरपणे कार्य झाल्यास विद्यार्थ्याला अचूक शीर्षक मिळेल. सूची तयार झालेली असल्याने नेमकी कोणती पुस्तके वापरायची ते समजेल. अचूक वाचन साहित्यापर्यंत त्याला नेण्याचे कार्य इथे पूर्ण होईल. पुढे वाचन करण्याचे काम विद्यार्थ्याला करणे सोपे जाईल.

पण लेखनप्रक्रियेत मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे. यासाठी विद्यार्थ्याने लेखन कसे करावे याचा आराखडाही तयार करणे सोयिस्कर होईल.

**प्रकल्प लेखनाचा आराखडा**

**१) शब्दसंख्येचे (किंवा पानांचे) वाटप :**

प्रास्ताविक/आभार/ऋणनिर्देश अमूक एक विषय का निवडला व्याप्ती/मर्यादा/अभ्यासाचा उपयोग काय अ)मुख्य आशय ब) आशयाचा सारांश क) समारोप ड) संदर्भ ग्रंथांची यादी

२) **रचना** :अ) शीर्षक पान ब) मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र क) विषयाच्या संबंधित छायाचित्र /झेरॉक्स ड) नंतर इतर पाने

३) **टापटीपपणा /सुबकता** : अ) बांधणी ब) कव्हर क) अक्षरलेखन

---

ज्या कल्पनेने पशूचा मनुष्य होतो आणि मनुष्याचा परमेश्वर होतो ती कल्पना म्हणजेच धर्म - स्वामी विवेकानंद

इथे प्रश्न असा निर्माण होऊ शकतो की दहा गुणांसाठी विद्यार्थ्याने इतकी मेहनत घ्यावी काय ? एकाच वर्षी विद्यार्थ्याला एका विषयासाठी किमान दोन प्रकल्प करायचे असतात. तर इतके का करावे ?

याचे उत्तर इतकेच आहे त्याची गुणवत्ता वाढविण्यासाठी. अभ्यासक्रमावर आधारित विषय (शीर्षक) प्रकल्पात असल्याने त्याला त्या विषयाची सखोल माहिती मिळेल व संशोधनाची, लेखनाची, वाचनाची सवय लागेल. दीड दोन पाने कशी तरी खरडून देण्यापेक्षा यात विद्यार्थ्याला नक्कीच आनंद मिळेल.

ग्रंथालयालाही या संदर्भात आखणी करता येऊ शकते. यासाठी एक कार्यपद्धती निर्माण करता येऊ शकते.

**ग्रंथालयाची प्रकल्पासाठी कार्यपद्धती :**

सुसूत्रता आणण्यासाठी ग्रंथालय एक अर्ज तयार करु शकते. प्रकल्पासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्या अर्जात माहिती भरुन दिल्यास सर्वांचेच काम सोपे होईल.

**विद्यार्थ्यांसाठी प्रकल्प अर्जाचा आराखडा**

नाव :

पत्ता:

वर्ग:

रो.नं.:

प्रकल्पाचे शीर्षक :

मार्गदर्शक शिक्षकाचे नाव :

सही

हवी असणारी पुस्तके

| अनु क्र. | शीर्षक | लेखक | वर्गीकरण क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |

विद्यार्थ्यांची सही

अशा अर्जात विद्यार्थ्याने माहिती भरुन दिल्यानंतर ग्रंथालयाला मार्गदर्शन करणे सोपे जाईल. अचूकता येईल. वेळ वाचेल.

ग्रंथालयाच्या दैनंदिन कारभाराप्रमाणे पुस्तके घरी द्यायची की नाही, झेरॉक्ससाठी उपलब्ध करायची की नाही, प्रकल्पासाठी मदत मागायला येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वेळा इत्यादी विषय त्या त्या ग्रंथालयातील नियमांप्रमाणे ठरवता येऊ शकतात.

प्रकल्पाचे मार्गदर्शन कसे असावे तेही ठरवता येऊ शकते.

**प्रकल्पासाठी मार्गदर्शन**

हे मार्गदर्शन दोन प्रकारे करता येईल १) वर्गात २) ग्रंथालयात. वर्गात करावयाच्या मार्गदर्शनाचे काही पैलू आहेत. ते विद्यार्थ्यांसमोर जायला हवेत.

पैलू :

१) प्रकल्पाचे महत्त्व, उद्देश व हेतू

२) प्रकल्प गंभीरपणे केल्याने होणारा फायदा

३) प्रकल्पासाठी अभिप्रेत असणारे विषय

४) विषयामधून शीर्षकापर्यंत कसे जायचे

५) शीर्षकाची निश्चिती/निवड

६) वाचन साहित्याची ओळख

७) लेखन पद्धती/प्रकल्पाच्या आराखड्याची ओळख

वर्गात इतके मार्गदर्शन मिळाल्यावर काही बाबींसाठी ग्रंथालयात मार्गदर्शन मिळण्याची आवश्यकता आहे. हे मार्गदर्शन ग्रंथपाल करू शकतात. ते असे :

ग्रंथपालाचे मार्गदर्शन

१) ग्रंथालयाची ओळख
२) तालिकांचे महत्त्व/वर्गीकरणाची पद्धत
३) कोशवाङ्मयाची ओळख
४) ग्रंथालय पद्धतीची ओळख

अशा प्रकारे मार्गदर्शन लाभल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याशी वाचनाच्या टप्प्यावर, लेखन प्रक्रियेच्या टप्प्यावर चर्चा अभिप्रेत आहे. ती चर्चा विद्यार्थ्यास उपयुक्त ठरू शकते.

'प्रकल्प' तसा दुर्लक्षित विषय आहे. उगाच डोक्यावर आदळलेला विषय आहे असा गैरसमज झाला आहे. त्याकडे गंभीरपणाने पाहिल्यास त्यातून निर्माण होणारी गोष्ट फार महत्त्वाची आहे. ती म्हणजे वाचनाची सवय, ग्रंथालयात येण्याची सवय, अभ्यासक्रमा व्यतिरिक्त असणाऱ्या पुस्तकांशी संपर्क, लेखन कलेचा सराव.

हे सर्व होणार असेल तर प्रकल्पाचे स्वागतच करायला हवे.

प्रा. प्रदीप कर्णिक
'सोनल' वंदना सोसायटी समोर, ठाणे - २
दूरध्वनी : ५४० ४२०६

*(या विषयावर येणाऱ्या आगामी ग्रंथाचा गोषवारा लक्षात घेऊन प्रा. कर्णिक यांनी खास 'दिशा' साठी हा लेख बनविला आहे. - संपादक)*

•••

काही उत्कृष्ट उतारे....

भारतीय संस्कृती वीरतेची पूजक आहे. शौर्याची उपासक आहे. व्यक्ती व समाज ह्यांच्या रक्तांत वीरता प्रगटावी ह्यासाठी दसऱ्याचा उत्सव आहे.

पावसाच्या कृपेने मानव धनधान्यांने समृद्ध झालेला असतो, त्याच्या मनांत आनंद मावत नसतो, नसानसात उत्साहाची कारंजी उसळत असतात अशा वेळी त्याला विजयप्रस्थान करावेसे वाटणे स्वाभाविक आहे. नऊ दिवस जगदंबेची उपासना करुन प्राप्त केलेली शक्तीही शत्रूचा संहार करायला प्रेरक होते.

कुबेराने कौत्साला गुरुदक्षिणेसाठी हव्या असलेल्या चौदा कोटी सुवर्णमोहरांचा पाऊस शमीवृक्षावर पाडला. त्यांतील जास्त मोहरा कौत्सही घ्यायला तयार नव्हता व रघुराजाही वैभव न घेण्यासाठी धरलेला आग्रह भारतीय संस्कृतीतच पहायला मिळेल. जास्त असलेल्या त्या मोहरा लोकांकडून लुटविल्या गेल्या जे वैभव मिळाले आहे ते मी एकटा भोगणार नाही. आपण सर्व मिळून भोगू या. म्हणून शमीच्या पानांचे (सुवर्णरुपी) आदान-प्रदान ! केवढा उदात्त भाव !!

('संस्कृती पूजन' -लेखक-पांडुरंग शास्त्री आठवले)

---

स्वतःची पत्नी, मिळणारे भोजन व धन या तीन गोष्टीत माणसाने समाधानी असावे.

# २०व्या शतकातील शैक्षणिक वाटचाल

श्री. अ. थों. टिळू

*(गेल्या शतकातील शैक्षणिक वाटचालीचा या लेखात धावता आढावा घेतला आहे. - कार्यकारी संपादक)*

१९९९ साल संपत आले आहे, लवकरच सारे जग २१व्या शतकात पदार्पण करणार आहे. २०व्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात संगणकाच्या शोधाद्वारे माहिती व तंत्रज्ञान यात प्रगती झाली आहे. नवे नवे शोध लगले. मानव चंद्रावर पोहोचला, कृत्रिम उपग्रहाद्वारे दळणवळण व शैक्षणिक प्रगती साधली गेली व २१व्या शतकात हेच पुढे जाणार त्यादृष्टीने गेल्या शतकात भारताने शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा विचार करणे अथवा त्याचा आढावा घेणे योग्य ठरेल.

या पुढील ६-७ लेखात या विषयाची माहिती वाचकांना देण्याचा विचार आहे. त्यामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, विद्यापिठीय, तंत्रशिक्षण व स्त्री शिक्षण यांची वाटचाल व स्वातंत्र्योत्तर काळातील आत्तापर्यंतची वाटचाल देण्याचा विचार आहे. तसेच नेमलेले आयोग, त्यांच्या शिफारशी याबाबतीतही माहिती देण्याचा प्रयत्न राहील. या संबंधातील पूर्व प्राथमिक शिक्षणाची वाटचाल कशी झाली या विषयाची माहिती देत आहे.

पूर्व प्राथमिक शिक्षणाची वाटचाल साधारण पणे १९व्या शतकाच्या अखेरीस झाली. त्यावेळी काही युरोपियन धर्मोपदेशकांनी किंडर-गार्टन शाळांची स्थापना केली होती. त्यामुळे सुरुवातीला या शाळामधील शिक्षक परदेशातून पूर्व-प्राथमिक शाळांसाठी आणले गेले. हळूहळू या शिक्षकांसाठी (पूर्व-प्राथमिक) अध्यापक विद्यालयाची स्थापना झाल्यामुळे शिक्षकांना परदेशातून बोलविण्याची गरज भासली नाही.

पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रामधील पहिली संघटित सुरुवात इ.स. १९२० मध्ये महाराष्ट्रात नूतन बाल शिक्षण संघाच्या स्थापनेने झाली. १९३० च्या दरम्यान मादाम मॉंटेसरी यांनी भारताला भेट दिली. त्यांच्या प्रभावामुळे भारतात मॉंटेसरी पद्धतीच्या शाळा सुरु झाल्या व त्या प्रामुख्याने महाराष्ट्र, गुजराथ व मद्रास राज्यात चालू झाल्या. महाराष्ट्रात श्रीमती ताराबाई मोडक, गुजराथमध्ये श्री. गिजुभाई बधेका तर डॉ. ॲनी बेझंट व अरुण डेल यांनी द. भारतात मॉंटेसरी शिक्षण पद्धतीचा प्रचार केला. १९२४ मध्ये बधेका व श्रीमती मोडक यांच्या प्रयत्नाने प्रथम प्राथमिक प्रशिक्षण शाळा निघाली.

इ.स. १९३० मध्ये मा. गांधींनी ''मूलोद्योगी'' शिक्षणाच्या 'तत्त्वाचा'' प्रसार केला. श्रीमती आर्य नायकम व म.गांधींनी स्थापन केलेल्या वेदी आश्रमाने पूर्व प्राथमिक शाळातील मुलांच्या विकासासाठी 'कृतीच्या'' आणि ''श्रमप्रतिष्ठेच्या'' तत्त्वावर आधारीत अशा पूर्व मूलोद्योगी शिक्षणाच्या पद्धतीच्या शाळांची कल्पना पुढे आली. म.गांधींचे शिष्य श्री. जगतराम दवे यांनी या पद्धतीवर खूप संशोधन केले. त्यांच्या वेदीच्या आश्रमात केलेल्या प्रयोगांमुळे गुजराथमध्ये अत्यंत दूरवर पसरलेल्या खेड्यापाड्यात देखील पू.प्राथमिक शिक्षणाचा प्रसार झाला. श्रीमती शांता नानूलकर व नानाभाई भट्ट यांनी पण पूर्व प्राथमिक मूलोद्योगी शाळांचा प्रसार केला. १९४४ साली सार्जंट कमिशनने प्राथमिक शिक्षणाचे महत्व मान्य केले व सरकारने या शिक्षणाला उत्तेजन द्यावे अशी शिफारस केली पण सरकारने हेतुपुरस्सर त्याकडे लक्ष दिले नाही.

---

गुलामाला तो गुलाम असल्याची जाणीव करुन द्या म्हणजे तो बंड करुन उठेल.

**स्वातंत्र्योत्तर काळ :** १९४७ साली देश स्वतंत्र झाल्यावर आजपर्यंत पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारार्थ विशेष केल्या जाणाऱ्या प्रयत्नांमुळे या स्तरावरील शिक्षणाचा थोडाफार विकास झाला. १९४७ साली डॉ. सुलभा पाणंदीकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पूर्व प्राथमिक शिक्षणाबद्दल चार महत्त्वाच्या शिफारशी केल्या.

१) बालशिक्षणासाठी स्वतंत्र बोर्ड असावे.

२) तज्ज्ञ व शासकीय पर्यवेक्षक यांनी शाळांची तपासणी करावी.

३) सरकारने ग्राह्य खर्चाच्या ३३ १/३ टक्के अनुदान द्यावे.

४) प्रशिक्षण केंद्राचा दर्जा प्राथमिक प्रशिक्षण केंद्रासारखा असावा.

५) उच्चस्तरीय सुसूत्रता समिती स्थापन करावी.

१९५३ साली समाजकल्याण मंडळाची स्थापना झाली. या मंडळाकडे पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या विकासाचे काम सोपविण्यात आले.

मंडळाने आखलेले २ कार्यक्रम म्हणजे १) सुरु असलेला कार्यक्रम तसा चालू ठेवणे, २) खाजगी संस्थांना अनुदान देणे. १९५४ मध्ये या मंडळाने स्थापन केलेल्या बालवाड्या हे विकासातील पहिले पाऊल. पहिल्या पंचवार्षिक योजनेत ११५० बालवाड्या निघाल्या व दुसऱ्या योजनेत २८२९ व अशा रितीने त्या वाढत गेल्या. १९६२ मध्ये या मंडळाच्यावतीने बालकल्याणासाठी कार्यक्रम सुरु करण्यात आले. १९६६ साली नेमलेल्या कोठारी आयोग, जो आयोग सर्व स्तरावरील शिक्षणाच्या सम्यक शिक्षणासाठी नेमलेला असा पहिला आयोग होता. त्यांच्या खालील महत्त्वाच्या शिफारशी होत्या.

१) प्रत्येक राज्यात एक बालशिक्षण विकास केंद्र असावे. त्या केंद्राद्वारे बालशिक्षणावर देखरेख केली जावी आणि ज्यांना मार्गदर्शन हवे त्यांना ते मिळावे.

२) शाळांच्या सहकार्याने क्रीडा केंद्रे स्थापन करावी व तेथे खेळांचे साहित्य बालवाङमय क्रिडा शिक्षकांचे प्रशिक्षण वगैरे कामे व्हावीत.

३) ग्रामीण भागात शासनाने शिक्षक प्रशिक्षण केंद्राच्या सहाय्याने आदर्श बालशाळा चालवावी.

४) स्थानिक प्रश्न लक्षात घेऊन बाल शिक्षणाचा अभ्यासक्रम व बाल शिक्षणाच्या कार्यक्रमात लवचिक पणा असावा.

"१९६७ मध्ये बालक आणि माता यांच्या कल्याणासाठी कार्यक्रम सुरु करण्यात आले."

त्यानंतर शाळा सुधार समितीच्या शिफारशी आणि १९८६ चे नवे शैक्षणिक धोरण यांनी बालशिक्षणाला महत्त्व दिले.

१९९२ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाचे भूत पूर्व अध्यक्ष व जेष्ठ वैज्ञानिक प्रा. यशपाल यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मनुष्य बळ विकास मंत्रालयाने एक राष्ट्रीय सल्लागार समिती स्थापन केली आणि त्या समितीला शाळकरी मुलांच्या ओझ्याच्या प्रश्नांचा सर्वांगीण अभ्यास करून ते कसे कमी करता येईल याच्या शिफारशी करण्यास सांगितले. तो अहवाल जुलै, १९९३ मध्ये संबंधित मंत्र्यांकडे सुपूर्द केला गेला व त्यावर संबंधितांशी चर्चा घडवून निश्चित कार्यवाहीसाठी पावले टाकावी अशी शिफारस केली गेली. १९९२ सालीच भारत सरकारने बालकांच्या हक्कांची जी सनद संयुक्त राष्ट्र संघाने मंजूर केली तिला मान्यता व कायदेशीर आधार दिला.

१९९३ मध्ये श्री. द.म. सुखटणकर यांनी पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शिक्षण साक्षरता व अनुदाने यांचा अभ्यास केला.

१५ नोव्हेंबर, १९९४ रोजी महाराष्ट्र बाल शिक्षण परिषदेची स्थापना झाली. प्रा. राम जोशी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या बालशिक्षण समितीचा आधार घेऊन १९९५ रोजी क्षमता धिष्ठित प्राथमिक शिक्षण अभ्यास क्रम अंमलात आला.

**कोठारी आयोगाच्या अहवालातील पूर्व-प्राथमिक शिक्षणाची उद्दिष्टे.**

१) बालकाच्या चांगल्या आरोग्यविषयक सवयी विकसित करणे, पोशाख करण, खाणे, स्वच्छता राखणे इत्यादी कौशल्ये वाढवणे.

२) सामाजिक वृत्तीआणि चालीरीती विकसित करुन बालकाला इतरांचे हक्क व अधिकार याबाबत संवेदनशील बनवणे. त्याला निरामय सहभागास प्रोत्साहित करणे.

३) बालकास स्वतःच्या भावना व संवेदना यांचे योग्य आकलन, आविष्करण आणि नियंत्रण करण्यास मार्गदर्शन करुन त्याची भावनिक परिपक्वता विकसित करणे.

४) सौंदर्यपूर्ण रसग्रहणास उत्तेजन.

५) परिस्थितीबद्दलचे बौद्धिक औत्सुक्य जागृत करुन सभोवतालच्या जगाचे आकलन होण्यास मदत करणे.

६) बालकाला स्व-आविष्करणासाठी भरपूर संधी देऊन स्वातंत्र्य आणि सर्जनशीलता प्रोत्साहित करणे.

७) स्वतःचे विचार आणि भावना योग्य आणि स्पष्ट भाषेत मांडण्याची क्षमता विकसित करणे.

८) बालकाच्या ठिकाणी सदृढ शरीर, पुरेसे स्नायविक संयोजन आणि मूलभूत स्नायविक कौशल्य यांचा विकास करणे.

**भारत सरकारी अभ्यासगटाने सांगितलेली उद्दिष्टे.**

१) रोगांचे आणि मृत्यूचे प्रमाण घटविण्याकरिता, संसर्गजन्य रोगांपासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी ठराविक दिवसांनी वैद्यकीय तपासणी करुन बालकांचे आरोग्य चांगले राखणे.

२) मुलांच्या उपजत शारीरिक आणि मानसिक क्षमतांच्या पूर्ण विकासासाठी संस्कारक्षम वयात सकस आहार उपलब्ध करुन देणे.

३) बालकांच्या सामाजिक आणि भावनिक विकासासाठी योग्य वातावरण निर्मिणे.

४) बालकांच्या ज्ञानग्रहणाची कुवत वाढविण्याच्या उद्देशाने योग्य वातावरणाची निर्मिती करणे.

५) मुलामध्ये योग्य वृत्ती, मूल्ये, आणि वर्तणूक याच्या जोपासनेसाठी सुरक्षित, स्नेहयुक्त वातावरण निर्माण करणे.

६) बालकांच्या गरजा आणि समाजाची त्याबाबतची जबाबदारी याबद्दल लोकमानस जागृत करणे.

**कोठारी आयोग समितीच्या शिफारशी**

ह्या शिफारशी करताना पूर्व प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करता येणार नाही हे आयोगाने मान्य केले होते व हे जमेस धरुनच त्यांनी खालील शिफारशी केल्या.

१) पूर्व प्राथमिक शाळांची स्थापना शिक्षण खात्यातर्फे प्रायोगिक तत्त्वावर असावी.

२) शाळा काढण्यासाठी प्रोत्साहन म्हणून खाजगी संस्थांना अनुदान द्यावे.

३) पुढील २० वर्षात ३ ते ५ वयोगटातील ५०% मुलांना तरी हे शिक्षण मिळावे.

४) १ वर्षाचा पूर्व प्राथमिक शिक्षणवर्ग प्राथमिक शाळांना जोडावा.

५) पूर्व प्राथमिक शिक्षण १ ते ३ वर्षाचे असावे व ते ३ ते ६ वर्षापर्यंत ऐच्छिक असावे.

---

आशा कमळाच्या पाकळीवरील दवबिंदूप्रमाणे असते.

६) राज्य शिक्षण संस्था, शिक्षण खाते व जिल्हा पातळीवरील शिक्षणाधिकारी यांनी सर्व स्तरावरील मुलांना पूर्व प्राथमिकचा लाभ होईल हे बघावे.

७) राज्यातील शिक्षण शास्त्र संस्थेने पूर्व प्राथमिक शिक्षणाची केंद्रे सुरु करावी आणि त्यांनी योग्य अभ्यासक्रम आणि स्वस्त शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.

८) १९८६ पर्यंत ३ ते ५ वयाच्या ५०% मुलांना व ५ ते ६ वयोगटातील ५०% मुलांना शिक्षण संस्थेत प्रवेश द्यावा.

९) नवनवीन प्रयोग करण्याच्या व कमी खर्चाच्या पद्धती शोधण्याच्या संशोधनास पूर्व प्राथमिक शिक्षण क्षेत्रात उत्तेजन द्यावे.

**यशपाल समितीच्या शिफारशी**

१) बाल शाळा उघडणे व त्यांचे नियमित संचालन करण्यासाठी कायदेशीर व प्रशासकीय उपचारांचा अवलंब करणे.

२) शाळांना मान्यता देताना जागा, शिक्षक वर्ग, उपकरणे, खेळ सामुग्री या संबंधातील मापदंड ठरवावे.

३) लहान मुलांना वाचन, लेखन, गणन असे शिक्षणाचे ओझे लादले जात नाही हे पहावे.

४) बालवाडी/अंगणवाडी प्रवेशासाठी मुलाखती आणि चाचणी परीक्षा घेण्यास बंदी.

**या संदर्भात नुकत्याच स्थापन झालेल्या महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेची उद्दिष्टे :**

१) बालशिक्षण घेणाऱ्या बालकांची संख्या वाढविणे.

२) बाल शाळा बाल्याभिमुख आणि दर्जेदार करणे.

३) बाल शिक्षणाबद्दलचे समाजातील औदासीन्य या शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन दूर करणे.

४) बाल शिक्षण क्षेत्रात नियोजन आणि नियम आणणे.

५) सरकारला दीर्घ मुदतीचे बाल शिक्षण धोरण जाहीर करण्याची मागणी करणे.

६) बाल शिक्षण विषयक संशोधन करणे.

याबाबतचा शासनाचा अजून निर्णय झालेला नाही.

(क्रमशः)

श्री. अ. थॉ. टिल्लू

संपादक, 'दिशा'
विद्याप्रसारक मंडळ, नौपाडा,
ठाणे ४०० ६०२.

•••

With Best Compliments from

A

WELL

WISHER

विचार मोठा जादुगार आहे. तो माणसाच्या हृदयात असतो, पण चेहऱ्यावर दिसतो.

# आनंदयात्री पणशीकर

श्री. संजय बोरकर

*(श्री. प्रभाकर पणशीकर ! आजपर्यंतच्या मराठी रंगभूमीवरील महत्वाचे व्यक्तिमत्व श्री. पणशीकरांच्या मुलाखतीवर आधारित शब्दांकन केले आहे श्री. संजय बोरकर यांनी - संपादक)*

१९३१ च्या आधीच्या काळामधे मूकपट निर्माण व्हायला सुरुवात झाली होती. आणि मुकपटाने जोरही धरला होता. प्रेक्षकासांठी मनोरंजनाच आणखी एक दालन खुल झाल होत अभिनया बरोबर वातावरण निर्मिती ही जिवंत करणार. त्यामुळे लोकांच लक्ष नाटकांवरुन मूकपटाकडे पूर्णपणे वळल होत. नाटकांचा प्रेक्षक कमी झाला होता. संगीताची आवड असणारा थोडाफार प्रेक्षक उरला होता. नाटक कंपन्या एका मागोमाग एक बंद पडत होत्या. त्यावेळच्या 'गंधर्व', ललित कला दर्शन, बळवंत आदी मातब्बर कंपन्याही त्या झंझावातात टिकू शकल्या नाहीत. आणि त्यात भर म्हणून की काय १४ मार्च १९३१ रोजी मूकपट बोलू लागला आणि त्याच दिवशी योगायोगाने म्हणा की सुयोग म्हणा मुंबईच्या फणसवाडीत व्यंकटेश मंदिरा जवळ एका जुन्या इमारतीमध्ये 'पणशीकर' नामक शास्त्री कुटुंबात एक मूल जन्माला आलं. त्यात योगायोगाची आणखीन एक भर म्हणजे त्या राहत्या इमारतीचं नाव 'नाटकाचा बंगला' अस होत. त्याकाळी त्या इमारतीमध्ये जुन्या नाटकांच्या तालमी मोठ्या आवाजांत चालायच्या म्हणून लोकानी त्याच नामकरण नाटकाचा बंगला असं केलं. आणि गंमत म्हणजे या बंगल्यात त्यावेळी दोन कलावंत जन्माला आले. प्रभाकर पणशीकर आणि एक सुलोचना कदम म्हणजे नंतरची चव्हाण.

पणशीकर कुटुंबाने जन्मलेल्या मुलाचे नाव 'प्रभाकर' ठेवलं. नाव ठेवताना त्यांना जाणवलही नसेल की हा मुलगा पुढे जाऊन अंधारलेल्या नाट्यसृष्टीचा खऱ्या अर्थाने 'प्रभाकर' ठरणार आहे.



श्री. प्रभाकर पणशीकर

वडील 'निर्णय सागर प्रेस' मधे संस्कृत आणि ज्योतिष पंचांग विभागात कामाला होते. घरात शास्त्री पद्धतीचे सनातनी वातावरण होत. त्यामुळे आपल्या मुलांनी संस्कृत श्लोक वाचावे, वेदांच, स्तोत्रांच पठण कराव, चांगले शिक्षण घ्यावे. जमल्यास स्क्रिशिप घ्यावी. ही आई वडिलांची इच्छा त्यामुळे नाटकातला 'न' सुद्धा कानावर पडला नव्हता. उलट चांगल्या मार्कांनी पास होऊन मध्यमवर्गियाला

शोभेल अशी रेल्वेत, पोस्टात किंवा फारतर डॉक्टर , इंजिनिअर, वकील असा लब्ध प्रतिष्ठित व्यावसाय करावा अशी त्यांची अपेक्षा होती. त्यामुळे 'घरामध्ये' आणि घराबाहेर ही नाटकाला पोषक वातावरण बिलकुल नव्हते. मुंबईतल्या नवीवाडी येथील म्युनिसिपल स्कूल मध्ये शिक्षण चालू असतानाच वयाच्या दहाव्या वर्षी १९४१ साली आईच निधन झाल आणि पुढील आयुष्य वडिलांच्या कडक शिस्तीत गेलं. पुढे मग खेतवाडीच्या युनियन स्कुलमध्ये माध्यमिक शिक्षण सुरू झालं. ह्या शाळेची उत्तम नाटकं करण्याची ख्याती होती. त्याआधी स.गं. मालशे यांसारख्यांनी शाळेची नाटक गाजवली होती. परंतु १९३९ ते १९४५ या काळात दुसरं महायुद्ध सुरू होतं. त्या पाच वर्षात संपूर्ण परिस्थिती युद्धजन्य होती. त्यामुळे शाळेत गॅदरिंगच झाले नव्हते, ना नाटक झाले होते.१९४५ साली नाटकात रस घेणारे श्री. लाड मास्तर वर्गात आले. आणि कोणाकोणाला नाटकात काम करायच रे ? असे विचारले. माझा नाटकाशी काहीही संबध नसताना सहजच म्हणून हात वर केला. नाटक होत प्र.के.अत्रे लिखित 'मी उभा आहे' त्यात प्रमुख नट होते नंतर निर्माते म्हणून प्रसिद्ध झालेले 'नंदू खोटे' म्हणजे 'शुभा' आणि 'विजू' चे वडील शाळा सुटल्यावर मी तालमीत गेलो जराशी चाचपणी केली आणि पदरात एक छोटीशी भूमिका पडली. पण काम जरा बर करत असल्याने काही दिवसांच्या तालमीने त्याच नाटकातील 'श्रीमंत रोकड्या' ची भूमिका मिळाली. वडीलांपासून लपवून चोरून तालमी चालल्या होत्या आणि प्रयोगालाच थोडेच दिवस शिल्लक असताना 'भाई टोळ' ही महत्वाची भूमिका मिळाली. प्रयोग संध्याकाळचा असल्याने काय थाप मारून पडावे हे समजेना. म्हणुन मग प्रयोगा आधी एकदोन दिवस वडिलांना 'शाळेच्या नाटकात प्रमुख भूमिका करणारा मुलगा आजारी पडला आहे आणि मास्तर म्हणालेत की पणशीकर, तूच ही भूमिका चांगली करु शकशील' असे सांगितले. एकदोन दिवसांचा प्रश्न असल्याने वडीलांनी मग परवानगी दिली. प्रयोग छान - झाला अभिनयाच बक्षिस मिळाल. मोठया आनंदात घरी गेल्यावर ते बक्षिस वडीलांच्या हातात ठेवल. वडिलांनी छान म्हणून ते बक्षिस सरळ लपवून ठेवलं. ते बक्षिस पाहून मला पुन्हा पुन्हा अभिनय करण्याची इच्छा होऊ नये या भीतीने. आपल्या मुलाने रंगभूमीवर पुन्हा पाऊल ठेवू नये असच त्यांना वाटत होत. नाटकाची हवा निघून गेल्यावर नाटक विसरुन मी पुन्हा आपल्या मार्गाला लागेन अस वाटल होतं. पण माझ्या मनात दिवसें दिवस ती वाढतच चालली होती. शाळेतल्या सांस्कृतिक वातावरणामुळे तिला छान फुंकर मिळत होती. शाळेतील आमचे काही उत्साही शिक्षक मला नाट्य अभ्यासासाठी योग्य मार्गदर्शन करत होते. त्या वेळी आय.एन.टी. ही संस्था नुकतीच स्थापन झाली होती. त्या संस्थेतर्फे आकाशवाणी वर एक नभोनाट्य सादर केल होत. त्याचे दिग्दर्शक होते के. नारायण. त्यांनी त्या नाटकामध्ये माझ्याच वयाची भूमिका मला दिली. नाटकाच नाव होत 'आई' त्यात माझ्या मोठ्या भावाची भूमिका 'आत्माराम भेंडे' नावाचा एक युवक करीत होता. तो पर्यंत गणितात कमी मार्क पडल्याने ५वीतून ६वीत कसा बसा गेलो होतो. पुढील वर्षी शाळेतल्या स्नेहसंमेलनांत 'साष्टांग नमस्कार' नाटक ठरल. आणि त्यात मला 'रावबहादूर' ही भूमिका मिळाली. त्या भुमिकेसाठी सुद्धा मला अभिनयाचे बक्षिस मिळाले. त्या वेळेचे अध्यक्ष पत्रकार अप्पा पेंडसे एवढे खूप झाले की त्यानी बक्षिसा व्यतिरिक्त आपल्या खिशातून १०रु ची नोट काढून मला स्वत:तर्फे बक्षिस दिले वर नंतर मेकअपरुम मध्ये येऊन मला सांगितलं की मॅट्रीक झाल्यावर तू नाटकात पड. मी तुला काम मिळवून देईन अस आश्वासन देखील दिलं, आणि मॅट्रीकला गणितान मोठा दगा दिला. म्हणजे मी सगळी गणितं सोडवली होती पण ती सगळी चुकली होती. आणि मी मॅट्रीकला नापास झालो. ते गणित मला आजतागायत हुलकवण्या देतयं. त्याचं आणि माझं कधीच जमलं नाही. तो पर्यंत मॅट्रीकच्या ''अपयशाला'' माझ नाटकातील मी वडिलापासून लपवलेले'यश' कारणीभूत आहे हे माझ्या

वडिलांना कळून चुकलं होतं. नंतर मी शाळेच्या माजी विद्यार्थ्यां तर्फे झालेल्या 'लग्नाची बेडी 'या नाटकात काम केलं. त्यातील माझी 'पराग' ची भुमिका खूप गाजली होती. ''ती पाहताच बाला'' या गाण्याला मी वन्समोअर मिळवला होता. असा माझा शालेय जीवनात नाट्य प्रवास सुरु होता. त्या काळातच मुंबई साहित्य संघाने नवीन होतकरू कलाकारासाठीं कला शाखा सुरु केली होती. त्यांच्या तर्फे नाट्य महोत्सवामध्ये ले.शं.प. जोशी लिखित 'विचित्र लीला'' हे नाटक झाल होत. या नाटकाचे दिग्दर्शक होते नटश्रेष्ठ 'केशवराव दाते' आणि त्यांचे सहाय्यक होते 'मामा पेंडसे' यांच्या दिग्दर्शनाखाली 'बचंम्भट' ही विनोदी भूमिका केली. पुढे मग १९५० साली विश्राम बेडेकरांच्या स्वातंत्र्यवीर सावरकर या चित्रपटासाठी मदन मोहन आणि दत्ता भट यांच्या हाताखाली सहाय्यक दिग्दर्शन केले.

त्या पुढे मात्र मला घरच्यांकडून नाट्यक्षेत्रासाठी तीव्र विरोध होऊ लागला. आणि मग शेवटी १९५० साली घरात काही अप्रिय घटना घडल्याने मी घर सोडले. हातात काही नसताना मी हा निर्णय घेतला होता. मला पुढे शिकण्याची इच्छा नव्हती. दुसरी कुठली नोकरी करायची नव्हती. नाट्य व्यवसाय नव्हता आणि नाटकाशिवाय दुसर काहीही करायचं नव्हतं. आणि मग परिणामी अर्ध पोटी कधी तर उपाशी राहून दिवस काढले. मित्रांच्या घराबाहेर पायरीवर तर कधी दुकानांच्या फळीवर झोपत असे. अंगावर फाटके तुटके कपडे असे दारिद्र्यांचे दशावतार झाले होते पण घ्यास एकच 'नाटक'. त्या दिवसांमध्ये मी एका चाळीचे नाटक बसविले होते. आणि योगायोगाने त्या चाळीत 'नाट्यनिकेतन' या त्या काळच्या प्रथित यश संस्थेचे व्यवस्थापक राहत होते. त्यांनी नाट्य निकेतनच्या एका नाटकात एक कलाकार उपलब्ध न झाल्याने गरजेच्या वेळी एक भूमिका देऊ केली. आणि १९५५ च्या १३ मार्चला 'नाट्यनिकेतन' मध्ये माझा प्रवेश झाला. त्याच्या पुढील नाट्यनिकेतनचं नाटक होत. 'भटाला दिली ओसरी' ते लिहिल होत 'मो.ग. रांगणेकर' यांनी आणि दिग्दर्शनही तेच करत होते. त्यातील 'नवकवी' ही प्रमुख महत्त्वाची भूमिका. या भूमिकेने व्यावसायिक नाटकात मला स्थिरस्थावर केलं. आणि रसिक मान्यता दिली. प्रेक्षक अभिनेता' प्रभाकर पणशीकर' ना ओळखू लागले. त्यानंतर मग नाट्यनिकेतन मधून बऱ्याच लहान मोठ्या भूमिका केल्या. पण ती त्यांची जुनी नाटक होती. त्या दरम्यान व्यवस्थापनाची मला आवड निर्माण झाली. आणि त्यातच लक्ष दिल. १९६२ पर्यंत व्यवस्थापन आणि अगदीच गरज पडली तर कोणतीही भूमिका म्हणजे बराचसा व्यवस्थापक आणि किंचितसा नट असाच होतो. पण या व्यवस्थापनात केलेल्या धडपडीचा नंतर उपयोग झाला.

त्यानंतर प्र.के. अत्र्यांच पंचरंगी भूमिका असलेलं नाटक 'तो मी नव्हेच' नाट्यनिकेतन करणार होत. मो.ग. रांगणेकर ते दिग्दर्शित करीत होते.त्यांचं म्हणणं होतं की ती भूमिका मी करावी तर अत्र्यांना ते अजिबात मान्य नव्हत. एवढी मोठ्या ताकदीची भूमिका माझ्या सारख्या नवीन नटाला द्यावला त्यांचा पूर्ण विरोध होता. पण मो.ग. रांगणेकरांच्या हट्टाने ती माझ्या गळ्यात पडली. हो गळ्यातच म्हणायला हवी. कारण अभिनयाचा मला विशेष सोस नव्हता. पहिला प्रयोग खूपच रंगला विशेष म्हणजे अत्र्यांनी खूप भरभरुन कौतुक केल, माझ्या भूमिकेच आणि यांपुढे ती भूमिका मीच करणार म्हणून जाहीर केल आणि पहिल्या प्रयोगा पासूनच प्रेमात पडले. पुढे मग 'अत्रे थिएटर्स ' साठी 'तो मी नव्हेच' रंग भूमीवर आणलं. लखोबा अर्थात मीच करत होतो. त्यावेळी आम्ही रंगमंचावर वेगवेगळे स्थळ बदल दाखविण्यासाठी मराठी रंगभूमीवर प्रथमच फिरता रंगमंच आणला.

नाट्य संपदा स्थापन झाली ८ एप्रिल १९६३ रोजी. पण १९६४- ६५ दोन वर्ष अत्रे थिएटर तर्फे नाटक केली. आणि १९६६ पासून आजपर्यंत 'नाट्य संपदा' तर्फे अनेक नाटकं केली, करतोय. तो मी नव्हेच, बेईमान, अश्रुंची झाली

---

निर्मिती हा माणसाचा विकास आहे तर नाश हा नियतीचा छंद आहे.

फुले, थँक्यु मिस्टर ग्लाड, इथे ओशाळला मृत्यू जिथे गवताला भाले फुटतात अशी बरीच नाटक केली. वेगवेगळ्या भूमिका केल्या. सगळ्याच भुमिका आव्हानात्मक होत्या. लखोबा काय किंवा प्रि. विद्यानंद, औरंगजेब काय प्रत्येक व्यक्तिरेखा एकमेकापेक्षा पूर्ण वेगळ्या होत्या. त्यामुळे माझ्या वर नायक, खलनायक, विनोदी अभिनेता किंवा चरित्र अभिनेता असा शिक्का कधीच बसला नाही. त्यामुळे कुठली ही व्यक्तिरेखा करायची राहिली अस वाटत नाही. आणि खर सांगू का, मी मुळातच अभिनेता नाही. त्यामुळे मिळाल्याचा आनंद नाही किंवा न मिळाल्याचं दुःख नाही. लहानपणी मी स्वतःहून नाटकात काम करण्यासाठी सहजच हात वर केला. तो मी नव्हेचच्या वेळेला मो.ग. च्या हट्टाने लखोबा गळ्यात पडला तर प्रि. विद्यानंद ही 'अश्रुंची झाली फुले' मधील भूमिका आणि औरंगजेब कानेटकरांच्या आग्रहाखातर कराव्या लागल्या. आता पर्यंत 'तो मी नव्हेच' चे २५८५ तर अश्रुंचे १०६० आणि इथे ओशाळला मृत्यूचे ७५० प्रयोग झालेत. अर्थात मी प्रयोग संख्या पहात नाही तर Quality बघतो. तुमचा प्रत्येक प्रयोग प्रायोगिक असला पाहिजे. भूमिकेत काहीतरी शोधल पाहिजे. आणि त्याच्या उलट असंही म्हणेन की प्रत्येक प्रायोगिक नाटक हे व्यावसायिक असायला हवं म्हणजे तेवढीच निर्मिती. मूल्य सफाई , प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण, नाटक हे इथून तिथून सारखंच आहे. आपण त्याला आपापल्या पद्धतीने लेबले लावली एवढंच. तालीम, हॉल ही अभिनेत्याची प्रयोग शाळाच, पण तेव्हा वेळ भरपूर असायचा, कलाकारा पासुन ते बॅकस्टेज आर्टिस्ट पर्यंत सगळ्यांना. आता सगळेच बीझी झालेत त्यामुळे तालमीला वेळच मिळत नाही. या इंस्टंटच्या जमान्यात नाटकंही इंस्टंट झाली आहेत. अभिनेते गुणी नाहीत असं नाही , ते चांगलेच आहेत चटपटीत आहेत पण त्यांच्यावर मेहनत घ्यायला दिग्दर्शकांना वेळ नाही आणि त्यांना द्यायला नटांकडे वेळ नाही. त्यांचा ओढा दूरदर्शन, चित्रपट आदी अभिनयाच्या नवीन माध्यमांकडे आहे. हा सगळा काळाचा महिमा आहे. बाकी काही नाही कुणीही कुणाला नावं ठेवू नये. या सगळ्यांतूनच मराठी नाटक टिकेल की नाही असा अनेक जणांना प्रश्न पडला. पण मी म्हणेन नाटक टिकेल, कारण टिकण्याची गोष्ट केव्हांच संपली आहे. फक्त आता Preservetive म्हणजे एखादी गोष्ट हवाबंद डब्यात टिकण्यासाठी जे वापरतो त्याची गरज आहे.

तरूण पिढीला रंगकर्मींना मी एवढच सांगेन की 'आयुष्यात जे काही कराल त्यात आपल सर्वस्व झोकून करा मग यश मिळो वा न मिळो पण निदान आपण आपल्या आवडीच्या क्षेत्रामध्ये धडपड केल्याचा आनंद तरी तुम्हाला नक्कीच मिळेल. जगणं प्रत्येकाला आहे. पैसा मिळवणही कुणाच्या नशिबातून सुटल नाही. पण केवळ पैसा हेच ध्येय मानू नये. कलावंत कलेतून स्वतःसाठी आनंद निर्माण करतो त्या आनंदाचं वाटप तो करतो. आणि या निर्मितीच्या वाटपाचं काम तो समाधानानं करतो. बस.....

शब्दांकन : संजय बोरकर

सी. ए.के. जोशी इं मि. स्कुल.

नौपाडा, ठाणे ४०० ६०२

• • •

**वाचकांच्या प्रतिक्रिया**

प्रा. मोहनजी,

दोन दिवसांपूर्वी दिशाचा अंक व पत्र मिळाले. आभार! मासिकातील सर्व लेख चांगले आहेत. विशेषतः रविंद्र मांजरेकर व अरविंद दोडे यांचे लेख खूप आवडले. दिशाला शुभेच्छा ! काही जाणकार व्यक्तींना लेख लिहावेत अशी विनंती आहे. ती फलद्रूप झाल्यास लेख पाठवून देईन.

श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक) डोंबिवली

# निसर्गाचे भीषण तांडव - किल्लारी

श्री. प्रदीप केळकर

*(किल्लारी भूकंपाच्या स्मृती चाळविणारे अनुभव या लेखात व्यक्त झाले आहेत. - संपादक)*

गेले दोन-चार दिवस तैवानमधील भीषण भूकंपाच्या बातम्या पेपरमध्ये येत आहेत. तेथील भीषण दृश्य दूरदर्शनवर पहाताना मन कुठेतरी मागे खेचले जात आहे ते आपल्या महाराष्ट्रातील 'लातूर' या भूकंपग्रस्त भागाकडे. कालच अनंत चतुर्दशी होती. पाच वर्षापूर्वी ह्याच दिवशी गणपतीबाप्पाला निरोप देऊन शांतपणे सर्वजण निद्रीस्त झाले असता या भागात भूकंपाने थैमान घातले. प्रचंड वित्तहानी व मनुष्य तसेच मुक्या प्राण्यांची गात्रे थंड झाली. आजही मी याच दिवशी डोळे मिटून दोन मिनिटे स्तब्ध राहून त्या सर्व मृतात्म्यांना व आपल्या भावना व्यक्त करु न शकणाऱ्या प्राण्यांना श्रद्धांजली वाहतो. आज त्या गोष्टीला सहा वर्षे झाली. काहीजण तो प्रसंग विसरलेही असतील पण मी एक सामाजिक बांधिलकीच्या नात्याने गिर्यारोहक म्हणून मदतीसाठी गलो होतो. तो भीषण प्रसंग मी आयुष्यात कधीच विसरणार नाही. आजही त्या प्रसंगाने अंगावर काटा उभा राहतो. या महाराष्ट्राच्या इतिहासातील काळाकुट्ट भीषण तसेच रक्त गोठवणाऱ्या ह्या भूकंपाचा एक मागोवा घेण्याचा प्रयत्न या लेखात मी करीत आहे.

भारतीय उपखंड हा उत्तरेकडे सरकत असून तो लॉरिशीया भूस्तराकडे सरकत आहे. व या दोघांची मध्यरेषा साधारण हिमालयाच्या पट्ट्यात आहे.

१) उत्तरेकडे लॉरिशीया ह्या भूप्रकारात रशिया, चीन, तिबेट हे भाग येतात.

२) दक्षिणेकडे गोडवाना भूप्रकारात अमेरिका, भारत, ऑस्ट्रेलिया व अफ्रिका हे देश येतात.

भूकंपाचे प्रकार - १) डायनॅमिक २) व्हलकॅनो ३) फॉल्टींग.

पहिल्या प्रकारात भूगर्भात घडवलेले स्फेप्ट व दरडी कोसळणे. ह्याला डायनॅमिक भूकंप असे म्हणतात. दुसऱ्या प्रकारात ज्वालामुखीचा उद्रेक होतो. तप्त लाव्हारस भूस्तरावरून वाहतो ह्याला व्हॉलकॅनीक भूकंप असे म्हणतात.

तिसऱ्या प्रकारात भूगर्भातील घडामोडींमुळे भूकंप होतो. ह्यामध्ये भूगर्भातील एखादा स्तर खाली अथवा वर सरकतो किंवा एकमेकांपासून दूर जातो. ह्याला फॉल्टींग भूकंप असे म्हणतात.

हिमालयातील भूकंप हा जमिनीखाली प्रचंड प्रेशर डेव्हलप होऊन (प्रचंड शक्ती साठून त्याचे घडीत रुपांतर होते. व शेवटी त्याचे तुकडे होतात. उदा. उत्तर काशी येथील भूकंपात जमिनीला प्रचंड भेगा व तुकडे पडलेले दिसले.


लातुरचा भूकंप ह्याचा रीर्टन पिरीअड १०० वर्षाचा होता. (भूकंप होण्याचा काळ) तसेच उस्मानाबाद व लातूर ह्या जिल्ह्यांच्या भूकंपाचा केंद्रबिंदूही किल्लारी ह्या गावातच असल्यामुळे भूगर्भ शास्त्रज्ञही गोंधळून गेले होते. भूकंप होण्याआधी काही महिनने साधारणतः १२५ ते १५० सौम्य व मध्यमदर्जाचे धके या भागात बसल्यावर दिल्लीच्या भूगर्भ सर्वेक्षण संस्थेचे मुख्य श्री. दुबे ह्यांनी येथे येऊन पहाणी केली होती. त्यांनी सरकारला चूकीची माहिती दिली असे तेथील स्थानिक गावकऱ्यांचे म्हणणे होते.

शुक्रवार दि. १ ऑक्टोबर रोजी रात्री पावणेअकराच्या सुमारास मुंबईतून "आज दिनांक" च्या

---

आई असंख्य काव्ये जगते पण ती एक सुद्धा कविता लिहू शकत नाही. मातेच्या ह्रदयांत जे गाणे मुकपणाने वाजत असते तेच मुलाच्या ओठावर नाचत राहते - खलिल जिब्रान

गिर्यारोहण पथकातील दुसऱ्या तुकडीत माझा समावेश होता. दिनांकच्या ऑफिसात अनेकजणांची गर्दी होती. आम्ही घाटकोपरच्या अखिल भटवाडी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या रुग्णवाहिकेतून दहा-बारा जणांचे पथक वैद्यकीय मदत घेऊन किल्लारीस रवाना झालो. मदत पथकाला 'दिनांक' चे संपादक श्री कपिल पाटील ह्यांनी निरोप दिला. मुंबई ते लातूर व लातूर ते किल्लारी हा जवळ जवळ १४ ते १६ तासांचा प्रवास, वाटेत असंख्य मदत पथके घेऊन जाणारे ट्रक्स व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून स्वयंसेवी संघटना सेवाभावी संस्था तसेच राजकीय मदत पथक ह्यांच्या रुग्णवाहिका व गाड्या आम्हाला दिसल्या.



फोटो -श्री. प्रदीप केळकर

आम्ही साधारणपणे किल्लारीच्या १० किलोमीटरवर होतो. येथे पोलिसांनी नाकेबंदी केली होती. आमचे विशेष गिर्यारोहण पथकही त्यांनी आत सोडले नाही. एव्हाना ३०० ते ४०० ट्रक्स इथे ताटकळत किल्लारीच्या प्रतिक्षेत उभे होते. कुणीतरी व्ही.आय.पी. आल्यामुळे बंदोबस्त कडक करण्यात आला होता. ते गेल्यावर मात्र संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी आमच्या पथकांची योग्य ती कागदपत्रे दाखवल्यावर आम्हाला आत सोडण्यात आले. आता आम्ही प्रत्यक्ष भूकंपग्रस्त भागात शिरकाव केला होता. सर्वत्र खुणा स्पष्ट दिसत होत्या. आम्ही किल्लारीपासून अगदी २ कि.मी. वर थांबलो. सर्वत्र दुर्गंधी व अत्यंत हृदय हेलावणारे दृष्य दिसत होते. किल्लारीत गेलेल्या पहिल्या मदत पथकास गाठणे हे आमचे प्रमुख लक्ष्य ठरणार होते. कारण त्यानंतरच आमच्या कार्याची दिशा ठरणार होती. मात्र हिमालयातील एखाद्या अत्यंत कठीण शिखरावरही कठीण परिस्थितीतून मार्ग काढणे शक्य झाले असते. इतकी कठीण परिस्थिती किल्लारीच्या गावात पोहचताना आमची झाली. काही शेकड्यांत ट्रक्स, टेंपो उभे होते तर काही हजारात लोक एखाद्या प्रसिद्ध पर्यटन स्थळाला भेट द्यावी तसे क्षतीग्रस्त किल्लारीत जात होते. ह्यामध्ये मेलेल्यांच्या टाळुवरचे लोणी खाणाऱ्यांची भाऊगर्दीही कमी नव्हती. मी स्वतः गिर्यारोहक असल्याने किल्लारीला जाणाऱ्या रस्त्यालगतच्या शेतातून मार्ग काढण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली. अक्षरशः गुडघाभर चिखलातून आम्ही मार्ग काढीत होतो. बघ्यांच्या सागरामुळे रस्त्यावरून चालणे केवळ अशक्यच होते. मध्येच एके ठिकाणी कारखान्याजवळ काही मृतदेहांना अग्नी देण्यात आला होता. ते पाहून आम्ही पुढे निघालो. आमच्या पथकाचा नेता प्रजापती बोधणे हा या गावातलाच. आदल्याच दिवशी तो एक पथक घेऊन किल्लारीत आला होता. सर्वत्र स्मशानकळा पसरलेल्या किल्लारी गावाला लोकांमुळे एखाद्या महासागराचे स्वरुप आले होते. ह्यातून मार्ग काढत मी प्रजापतीच्या घरातील मंडळींना गाठले. त्यांच्या आईला व भावालाही खूप लागले होते. त्यांची आम्ही सर्वांनीच आस्थेने चौकशी केली व नंतर आमच्या आधीच्या ग्रुपचा पत्ता त्यांना मदतीला घेऊन लावला. सर्वत्र मन विषण्ण करणारे अत्यंत विदारक दृश्य दिसत होते. कुणी कुणाचे अश्रु पुसायचे हेच कळत नव्हते. संसार उध्वस्त झाले होते. सर्वत्र मृतदेहांचा खच पडला होता. मग तो माणसांचा असो वा जनावरांचा. उरले । ते फक्त दगडांचे व मातीचे डोंगर आणि उरली सुरली बोटावर मोजता येतील एवढी माणसे. विज्ञान कितीही पुढे गेले, निसर्गावर मात करण्याचा किंवा चंद्रावर जाण्याचा भीम पराक्रम करून

अंधाऱ्या रात्री एकटाच बसून आपल्याच एकांतवासाला सोबत म्हणून गाणारा नाईटिंगेल पक्षी म्हणजेच कवी होय - शेलो

दाखविणाऱ्या माणसाला निसर्गापुढे माणूस किती क्षुद्र आहे व निसर्गाच्या कोपापुढे विज्ञान किती खुजे ठरते हेच जणू निसर्गाने दाखवून दिले. त्यानंतर आम्ही सर्वजण एकत्र आलो मी प्रजापतीजवळ त्यांच्या घरातल्यांची चौकशी केली.

ता. ३ ऑक्टोबर मी स्वत: एक दोघांना घेऊन किल्लारी गावातील मैदानातील छावण्यांमध्ये असलेल्या लोकांवर प्राथमिक उपचार केले. त्यांची जेवणाची व्यवस्था केली. ज्यांना मोठ्या जखमा झाल्या होत्या त्यांना सरकारी डॉक्टरांकडे नेऊन उपचार करवले. तसेच गावातील चौकात दूध वाटपाची गाडी उभी होती. कोणीही येऊन ५-६ पिशव्या घेऊन जात होती. त्यात बघे मंडळीही मागे नव्हती. भूकंप होऊन दोन-तीन दिवस लोटले होते तरी त्या छावणीतल्या लहान मुलांना लेकरांना साधे पाणी किंवा दूधही मिळाले नव्हते. मी त्या टँकरच्या प्रमुखाला माझी तेथील कार्याची जबाबदारी पटवून दिली व दुधाची गाडी सरळ छावणीत नेली. सर्वांना दूध वाटप केले. काही लहान मुलांना आम्ही नेलेली बिस्किटे व फळे दिली. आमची दर रात्री मिटींग व्हायची त्यात चर्चा करुन कार्याची दिशा ठरवायची.



फोटो -श्री. प्रदीप केळकर

दिनांक ४ ऑक्टोबर रोजी आपले पंतप्रधान ह्या भागाला भेट देणार होते. त्यामुळे प्रचंड बंदोबस्त व खबरदारी घेतली होती. त्यामुळे दुपारपर्यंत सर्व यंत्रणा ठप्प झाली होती. पंतप्रधान गेल्यावर मी परत माझ्या सहकार्यांना घेऊन गावातील शिवाजी चौकात गेलो. एका वाड्यातील जखमी गाईला उचलून बाजूला केले. व डॉक्टरांकडून इंजेक्शन दिले. त्यानंतर तीन गुरांचे दहन केले तसेच अन्य तीन जखमी जनावरांवर उपचार केले. काही ठिकाणी गुरांचे सांगाडे तर काही ठिकाणी फुगुन पडलेली व किडे पडलेली गुरे ह्यामुळे दुर्गंधीचे साम्राज्य सर्वत्र पसरलेले होते. ह्या सर्वातून मार्ग काढून ढिगाऱ्यातून जनावरे बाजूला करुन तसेच लाकडे आणून रचावी लागायची. व नंतर त्यांचा अत्यंविधी करावा लागायचा. तिथून मार्ग शोधत आणखी एका घरात शिरलो. एक कुत्रा आत भुंकत होता. तेव्हा मी, माझा सहकारी स्वप्नील याला काहीतरी आहे असे सांगून आत शिरलो. प्रसंग तसा दुर्धर होता. एक लाकडी वासा व त्यावर पेललेला दगडाचा डोलारा ह्याखाली एक छानसे छोटे वासरु शांत बसले होते. त्याला पोटाशी धरुन बाहेर काढले व पाणी पाजले. एक मोठी गाय, तिलाही बाहेर काढले. वासराच्या जखमी आईला पाणी पाजून वासराला तिच्यापाशी परत सोडले. काही मुक्या प्राण्यांचा जीव वाचवल्याचे समाधान आम्हा सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होते. माणसे भावना प्रकट करू शकतात, परंतु मुक्या जनावरांचे काय ?

दिनांक ५ ऑक्टोबर रोजी मी व माझे सहकारी विजय माने, स्वप्नील, दत्ताराम कदम, गांगुर्डे ह्यांना घेऊन किल्लारीवाडी येथे गेलो. सर्वत्र दुर्गंधी, क्षतीग्रस्तांचे डोळ्यातले आटलेले अश्रू व सर्वत्र जनावरांच्या व प्रेताच्या दहनाच्या खुणा. मी गेल्यावर प्रथम गावातील लोकांची चौकशी केली. मनुष्य व वित्तहानीला सीमाच नव्हती. त्यानंतर गावातील एका गावकऱ्याला गावातील मृत गुरांच्याबद्दल माहिती विचारली. एक बोकड व तीन मोठी जनावरे किंवा मृत व्यक्ती गाडल्या गेल्या आहेत का ? ते विचारले असता एका बाईने सांगितले की ह्या बाजूच्या ढिगाऱ्याखाली कदाचित एक मुलगी असल्याचा संभव

निसर्गावर प्रेम केल्याशिवाय तुमच्या साहित्यास भव्यता व्यापकता, ताजेपणा व मधुरपणा येणार नाही.

आहे. कारण तिच्या आईवडिलांना दवाखान्यात पोहचवले आहे. मी थोडासा विचार करुन हातात फावडे घेतले व तो काळ ठरलेला दगडांचा व मातीचा डोंगर उकरायला सुरुवात केली. दहा पंधरा मिनिटांनी मला एक लहान थांगडी मातीत दिली. त्याबरोबर मी माझ्या सहकाऱ्यांना मुलगी नक्कीच आहे असे सांगितले व तिच्या झोपण्याची दिशाही ठरवली. हळुहळु खोदतच राहिलो. थोड्यावेळाने छपराचा वासा मिळाला. तोही बाहेर काढला. माझे सहकारीही मदत करतच होते. थोड्यावेळाने पलंगाची दांडी माझ्या फावड्याला लागली. हे सर्व उकरताना त्या देहाला चुकुनही फावडे कुदळ लागणार नाही ह्याने भान ठेवणे हे ही तितकेच महत्वाचे होते. सरते शेवटी तिचा कुशीवर झोपलेला मृतदेह अत्यंत कठीण परिस्थितून बाहेर काढला. तिचे नाव होते सुवर्णा प्रकाश बिराजदार, वय वर्षे ८ अशी ओळख पटली. तिच्या मृतदेहाला चिता रचून अग्नी दिला. ह्या सर्व कामात जालनाच्या एक एस.आर.पी. तुकडीचे प्रमुख श्री. ठाकूर व त्यांच्या जवानांनीही मदत केली.

दि. ६ ऑक्टोबर, रोजी मी व सहकाऱ्यांनी किल्लारीतील स्थानिक गावकऱ्यांचे घरातील उरले सुरले सामान बाहेत काढायला मदत केली. त्यातील एक एस बी फताटे ह्यांच्या घरांतील सर्व सामान बांधून बाहेर काढले. श्री. फताटे यांनी मला विनवणी केली, ''साहेब, एक जरा पितळी हंडा बाहेर काढाल का ? त्यावर मी लगेच होय म्हटले. व ते मला एका अडगळीच्या खोलीत घेऊन गेले. सर्वत्र काळोख वरुन कुठच्याही क्षणी पडेल असा दगडांचा डोलारा, कदाचित ते स्वयंपाकघर होते. परंतु तो हंडा काढताना कदाचित मीच भूकंपग्रस्त झालो असतो. मी त्या हंड्यातील पाणी बाहेर काढले व नंतर तो हंडा उकरुन काढण्यासाठी जिवापाड मेहनत केली. शेवटी कुदळीनी थोडासा भाग फोडला व तो प्रचंड पुरातन हंडा उचलून बाहेर काढला. त्या माणसांनी त्याच्या घरच्यांना मी अत्यंत जिवावर उदार होऊन काढलेल्या हंड्याचे कौतुक सांगितले. एखाद्या माणसाचा जीव वाचवल्यागत आनंद त्या फताटे यांना मी तो पाण्याने अर्धा भरलेला हंडा काढून त्यांच्या हातात दिल्यावर झाला.

संध्याकाळी मी पुन्हा किल्लारीतील छावणीत जाऊन सर्व भूकंपग्रस्तांची जेवणाची व औषधपाण्याची तसेच इतर सर्व गरजांची पूर्ण चौकशी केली. प्राथमिक औषधोपचार सहकाऱ्यांच्या मदतीने केले.

अशा या सधन किल्लारी गावच्या तसेच आजुबाजूच्या गावातील लोकांच्या पुनर्वसनाचा मुख्य प्रश्न आता मार्गी लागला आहे. त्यांच्या आरोग्याचा प्रश्न, तसेच त्यांना मिळणारी आर्थिक मदत वारसदारास मिळणे. त्यांना त्यांचे अथवा नवीन उद्योग उभारून देणे. शैक्षणिक मदत, बालवाड्या व शाळा उभारणे. विद्यार्थ्यांना पुस्तके व वह्या देणे. तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसाठी लागणारी मदत, तसेच लोकांचे संसार उभा करण्यास लागणाऱ्या प्राथमिक वस्तू सर्वंकश विकास शासनाने कमिट्या नेमून लवकरात लवकरात लवकर मार्गी लावण्याचा प्रयत्न केला.

असा हा लातूरमधील हृदय हेलावणाऱ्या तसेच लक्षाधीशाला भिक्षाधिश बनवणाऱ्या या प्रलयकारी भूकंपाबद्दल एवढेच म्हणावेसे वाटते.

*उष:काल होता होता काळरात्र झाली ।*

*अरे पुन्हा आयुष्यांच्या पेटवा मशाली ॥*

**श्री. प्रदीप केळकर**

जीवनछाया, राम मारुती रोड,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

•••

---

जो विद्यार्थी शिक्षकाची निंदा करतो, तो कितीही बुद्धीमान असला तरी निरुपयोगी आहे. जो विद्यार्थी शिक्षकाचा आदर करतो, तो थोडयाश्या ज्ञानानेही स्वत:चा उद्धार करतो. -म.गांधी

# विनाशाच्या उंबरठ्यावर भारतीय वाघ

श्री. संतोष प्र. शिंत्रे, पुणे

*वाघ- एक देखणं जनावर. आज दुर्मिळ प्रणालींच्या यादीत हे नाव आहे. यामागे कारणं फार आहेत, धोरणं कशी असायला हवीत याचा वेध या लेखात घेतला आहे - संपादक*

विलक्षण रुबाबदार अशा मार्जारकुळातील (Cat Family) चार सभासद एके काळी भारतात गुण्यागोविंदाने नांदत होते. सिंह, चित्ता, बिबळ्या आणि वाघ. चित्ता तर केव्हाच नामशेष झाला. सिंहदेखील गीरमध्ये बंदिस्त आहे, पण इतर भारतातून हद्दपार झालाच आहे. 'भारतीय वाघ' ह्या आपल्या राष्ट्रीय प्राण्यावरही हीच वेळ येऊ घातली आहे. या विनाशाची चाहूल १९७० च्या सुमारासच लागली होती. मा. इंदिरा गांधी, यांच्या प्रेरणेने प्रोजेक्ट टायगर सुरू झाला, त्याला प्रथमतः यशही मिळाले. तरीही आज प्रचंड दुरावस्थेत असलेले प्रोजेक्ट टायगर, पूर्ण नामशेष होऊ घातलेल्या वाघाला वाचवू शकेल, असं वाटत नाही. अगदी सरकारी पातळीवरही प्रोजेक्ट टायगरच्या संचालकांनी विषण्णपणे ह्याची कबुली १९९६-९७ मधेच दिली आहे. हा प्रकल्प सुरु होता १६०० पर्यंत रोडावलेली भारतीय वाघांची संख्या, जवळपास ४००० पर्यंत पहिल्या काही वर्षात वाढलेली होती. पण आजमितीला, ती २००० पेक्षाही खाली आली आहे. रोज कमीतकमी एका वाघाची हत्या होतेच आहे. आणि एखादी प्रजात, वाचवण्यासाठी किमान एक हजार ही संख्या आवश्यक असते. याचाच अर्थ वेळ आता फार कमी उरला आहे.

वाघांच्या ह्या दुरावस्थेला काही निश्चित कारणं आहेत. वाघ का वाचला पाहिजे हेही समजून घेण्याची आवश्यकता आहे, आणि मग त्यावरच्या संभाव्य उपायांचही विवेचन करता येईल.

जगातच राहिलेल्या एकूण ३००० व्याघ्रसंख्येपैकी, दोन तृतीयांश वाघ भारतात आहेत. तसंच राष्ट्रीय प्राणी, आपल्या सांस्कृतिक अस्मितेचा भाग, वाघाचं सौंदर्य हे सगळं जरी घटकाभर बाजूला ठेवलं तरी निदान आर्थिक कारणही डोळ्याआड करता येत नाही. वाघाच्या परिसरातून (habitat) आज आपण मनुष्यपयोगी जवळपास ४०,००० ते ५०,००० कोटींच्या विविधि उत्पादनं काढतो. ह्यात बांबू, खनिज, लाकूड ह्या सगळ्याचाच समावेश आहे. काही प्रमाणात व्याघ्रपरिसरातून मनुष्य कोळसाही मिळवतो. त्या सगळ्याची ही सरळसोट, बाजारभावाची किंमत आहे. पर्यावरणीय किंमत (environmental cost) ह्यात समाविष्ट नाही. वाघ आणि त्याचा परिसर वाचणं महत्त्वाच आहे कारण हे सगळे मूलस्रोत तिथूनच आपण मिळवतो आहोत. वाघांच्या अवयवांच्या चोरट्या व्यापारात काश्मिरी अतिरेक्यांचा सहभागही आता उघड झाला आहे. त्यांच ते एक पैसे मिळवण्याचं महत्त्वाचं साधन झालं आहे (संदर्भ : टाईम्स ऑफ इंडिया २८मे९८) म्हणजे कुठल्याही दृष्टीकोनांतून पाहिलं तरी आता हा राष्ट्रीय प्रश्न झाला आहे हे नक्कीच.

वाघ नष्ट होण्यामागची कारणं पहायला गेलं, तर फार मोठी गुंतागुंत डोळ्यासमोर येते. व्याघ्रपरिसरावरील माणसांचं आक्रमण, आपल्याच घटनात्मक आणि न्यायव्यवस्थेतल्या अपुऱ्या तरतुदी, आणि ह्या प्रश्नाला लाभलेलं आंतरराष्ट्रीय परिमाण इतकी ही गुंतागुंत आहे. राजकारण्यांना तर हा प्रश्नच कळलेला नाही, त्यामुळे तो

सोडविण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती त्यांच्यात निर्माण झालेली नाही. लोकमताचा दबाव आणूनच कदाचित हे काम होईल. व्याघ्रपरिसर (Tiger haabitat) नष्ट होत आहे. याचं एक कारण गेल्या काही वर्षांत आपल्या लोकसंख्येत ३०० कोटींहून जास्त वाढ झाली, आणि गुरांच्या संख्येत १०० कोटींहून अधिक वाढ झाली. माणसांचं औद्योगिक आणि गुरांचं नेहमीच्या अशा चरण्यामधेही तितकीच वाढ होऊन त्या परिसरावरचा ताण प्रचंड वाढला. ज्याला कायद्यात वनसंबंधित नसणारे उद्योग (Non forest activities) म्हणतात. त्यात बेसुमार वाढ भारतीय जंगल परिसरात झाली आहे. 'टायगर स्टेट' म्हणून जाहीर झालेल्या उत्तरप्रदेशमधे, व्याघ्र परिसरात व जंगलात एकूण १०९४२ लाकूड कापणाऱ्या मिल्स त्या परिसराची नित्यनियमाने तुळतुळीत हजामत करत असतात. विशेष म्हणजे त्यांतल्या फक्त ४२४१ वैध (licensed) आहेत. बाकी सगळ्या बेकायदा आहेत. कुद्रेमुख आयर्न ओअर कंपनी, सिंध फेझ २ हायड्रोइलेक्ट्रीक प्रोजेक्ट, ह्या कंपन्या तर व्याघ्र परिसरातच जणू ठाण मांडून बसल्या आहेत. पंचमढीनजिकच्या नोरादेही अभयारण्यातल्या ४० हेक्टर जागेवरचं आरक्षण उठवून तेथे उद्योगांना परवानगी दिली जात आहे. बेबंद वृक्षतोड तर आहेच. भारताची शान समजल्या जाणाऱ्या कान्हा किसली अभयारण्यात ४०,००० हून जास्त झाडं पाडली तरी गेली किंवा 'साल बोअरर' नावाच्या रोगाने पीडित होऊन मेली. १९९७ साली सुप्रिम कोर्टाने अतिशय स्तुत्य निर्णय घेऊन सर्व वनांमधल्या सर्व नॉन फॉरेस्ट ॲक्टिव्हिटीवर बंदी घातली खरी, पण ती प्रत्यक्षात उतरली आहे असं वाटत नाही. शिकारीवर बंदी आणली तरी आजही मुळशी इतक्या जवळ भागात किंवा राधानगरी, भुदरगड परिसरात आणि एकूणच महाराष्ट्रात छुपे हौशी शिकारी, चाप ओढण्यात धन्यता आणि शौर्य मानून शिकार करतात, याची खात्रीलायक माहिती आहे. त्यांमुळेच पश्चिम घाटावरचा वाघ पूर्ण नष्ट झाला. वीरप्पनचं नाव आपण सगळे ऐकून आहोतच. पण त्यामानाने प्रकाशझोतात नसणाऱ्या त्याचाच एक गुरु आपल्याकडे आहे. त्यांच घराणंच खानदानी वन्यजीव तस्कर आहे. 'संसार चंद' नावाचा हा लखनौचा स्मगलर मराठी वाचकांपर्यंत अद्याप तितकासा पोहोचलेला नाही. २१ मे १९९३ रोजी त्याच्याबरोबरच मोहम्मद याकूब आणि पेमा फिनले यांना अटक करताना टाकलेल्या धाडीत वाघांची आठ कातडी, २८७ किलो वाघाचं हाड, ४३ बिबळ्यांच्या कातडी, हे जप्त एकावेळी केलं गेलं. मे १९९७ ला अखेर ह्या केसची सुनावणीही झाली, पण त्या तारखेला हा जप्त केलेला माल हजर करता आला नाही, म्हणून पुढची तारीखही मिळाली. ९३ पासून संसारचंद ह्या ना त्या कारणाने तुरुंगाबाहेर जामीनावर तर आहेच पण त्या केसमधल्या अनेक अधिकाऱ्यांच्या अचानक बदल्यादेखील झाल्या आहेत. यानिमित्तान वन्यजीव विषयक गुन्ह्यांबाबत कायद्यातल्या कित्येक त्रुटीही समोर येतात. हे कित्येक गुन्हे अदखलपात्र (non cognitable) आहेत, जामीनपात्र आहेत, अशा ह्या काही त्रुटी. पण सर्वात मोठी चूक म्हणजे जम्मू व काश्मीरमध्ये आपले वन्यजीव विषयक कायदे लागू नाहीत, आणि त्यांच्या सरकारनेही कुठले कायदे केलेले नाहीत, ही आहे. त्यामुळे कुठेही वाघ मारला आणि काश्मीर सरकारच्या कृपाछत्राखाली एकदा गेल की तस्करीला आंतरराष्ट्रीय रान मोकळ झालंच.

वर उल्लेखलेली संसारचंदवरची धाड, भारतीय वन्यप्राणी तस्करीतील सर्वात मोठी होती. अगदी मागच्या महिन्यात वाघ नाही पण बिबळ्यांची हत्या करणारा हा गुन्हेगार कात्रज सिंहगड भागातच पोलिसांच्या दक्षतेमुळे चतुर्भुज झाला होता. पण हे सगळे वाघाचे अवयव जातात कुठे? सर्वसामान्य तुम्ही आम्ही भारतीय लोक तर ते वापरत नाही. ते सीमेपलीकडे नेपाळ व तिबेटमधून चीनला पोचतात. तिथे त्यापासून औषध तयार होतात, आणि मग पार नेदरलँड पासून, न्यूयॉर्कपर्यंत त्यांच वितरण ही होत.

---

आई या शब्दात सर्व काव्य सुरू होते व संपतेही.

चिनी जपानी वैद्यकांतल्या मूर्ख समजुतींमुळे, भारत मात्र आपला एक शानदार प्राणी गमावून बसतो आहे. 'चायनीज मटेरिया मेडिका' ह्या 'महान' ग्रंथात त्यातल्या बऱ्याचशा समजुती वाचायला मिळातात. त्यातही मुख्य म्हणजे वाघाच्या अवयवांचं सूप प्याल्यामुळे, हाडांच्या गोळ्या खाल्यामुळे आणि रक्त प्यायल्यामुळे 'पौरुष' वाढतं ही एक. तैवानमधे कित्येक हॉटेल्समधे हे सूप बाराशे अमेरिकन डॉलर्स, इतक्या माफक किंमतीला सर्रास मिळतं. (वाघाची चोरटी शिकार करणारा भारतीय मात्र फक्त रुपये पाचशेचा धनी असतो.) चीनमध्ये ही औषधांसाठी वाघाचे अवयव पुरवणारी एक सुसूत्र यंत्रणा आहे. त्यात 'एकमेकांसाह्य करूं' - ह्या तत्वानुसार देवाणघेवाण पद्धत म्हणजेच 'बार्टर' पद्धत सर्रास वापरली जाते. त्यात शस्त्रास्त्र, ड्रग्ज तर आहेच, पण काश्मिरी अतिरेक्यांना त्यातही एक वेगळं विनिमयांच साधन उपलब्ध आहे. तिबेटमधे 'cheeru' हे एक सुंदर हरीण मारून त्याची कातडी काढली जाते. वाघाचे अवयव भारतातून येतात आणि जम्मू तिबेट सीमेवर, नेपाळच्या रॉक्सोल सीमेवर, पिठोरगडच्या नजीकच्या भागातून अशी हरणाच्या कातड्याची देवाण घेवाण पार पाडते. तिथून तिबेटमार्गे वाघाचे अवयव चीनला पोहचतात. ह्या व्यवहारात आता काश्मिरी अतिरेक्यांचा मुबलक सहभाग आहे. आणि आता राहता राहिला ह्या सगळ्याकडे बघण्याचा राजकारणी मंडळींचा दृष्टीकोन. 'इंडियन बोर्ड ऑफ वाईल्ड लाईफ' चे, तत्कालीन भारतीय पंतप्रधान पदसिद्ध अध्यक्ष असतात. मधे १३ वर्षं, ह्या बोर्डाची एकही बैठक झाली नाही. १९९७ च्या पूर्वार्धात श्री. देवेगौडा ह्यांच्या कारकीर्दीत एक बैठक विशेषतः व्याघ्रप्रश्नावर अखेर झाली. ते आणि इंद्रजित गुप्ता, गृहमंत्री यांनी प्रत्यक्ष कृतीला थोडी सुरुवात ही केली. पण तोपर्यंत ते सरकार पडलं. गुजराल साहेबांच्या कारकीर्दीत त्यांनी पर्यावरण मंत्रालयाचे अधिकार काढून घेणे, राष्ट्रीय जंगल विषयक धोरण बदलून ते कागद उद्योगाला अधिक 'मैत्रीपूर्ण' करणे, असे अनेक व्याघ्रविरोधी निर्णय घेतले. श्रीमती मनेका गांधींच्या खटपटीने, लोकसभेत २२ राज्यांमधल्या २४ पक्षांच्या खासदारांनी त्याना एकमुखान "SAVE TIGER ACT NOW!" हे अपीलही पाठवलं. ३२० खासदारांच्या त्यावर सह्या होत्या. त्यात सर्वश्री चंद्रशेखर, अटलजी या आजीमाजी पंतप्रधानाबरोबरच नितिशकुमार, जॉर्ज फर्नांडीस, कांशीराम, चित्त बसू, सतीश प्रधान, शरद पवार अशा नेत्यांच्या समावेश होता. वाघ वाचविण्यासाठी काही निश्चित उपाय ह्या आवाहनात सुचवले होते. पण कागदी पाठींबा आणि शुभेच्छा, ह्या व्यतिरिक्त गुजराल साहेबांनी त्यावर काहीही केलं नाही. ३२० खासदारांची एकमुखी पाठिंबा, म्हणजे खरतरं भारतीय वाघाला, सत्तारूढ पक्षापेक्षाही अधिक बुहमत लोकसभेत आहे. पण फक्त भावनिक आवाहन पुरतं ! त्याचं कायद्यात रुपांतर होईल, तो खरा सुदिन म्हणायचा.

श्री. संतोष प्र. शिंत्रे,

समाधान अपार्टमेंट,
प्रभात रस्ता, गल्ली नं. ९
३९/२८ एरंडवणे, पुणे.

• • •


# बौद्ध लेण्याची दैन्यावस्था

श्री. मनाज शं. गडनीस

*(लेण्यांबाबतची उदासीन दृष्टी लेण्यांच्या दुर्दशेस कारणीभूत ठरत आहे. या छोट्या लेखात या विषयाकडे लक्ष वेधले आहे. - संपादक )*

जगात शांतता, सौख्य नांदावे ह्यासाठी बौद्ध भिक्षुकांनी स्वतःचे आयुष्य साधना करण्यात घालवले. व त्यासाठी ते अनेक देशांत फिरले. रानावनांत, डोंगरात फिरले व त्यासाठी त्यांनी आपल्या सर्व स्वार्थाचा, भौतिकसुखाचा त्याग केला.

आपल्या साधनेसाठी त्यांनी मुख्यतः जनसामान्यांच्या वस्त्यांपासून दूर डोंगरात आश्रय घेतला. व डोंगरातील शिळा फोडून येथे राहण्यास उपयुक्त अशा 'गुहा' बनवल्या. त्या गुहांमध्ये त्यांनी त्याकाळातील सामाजिक जीवन मुर्तिरुपाने दगडांमध्ये कोरलेले आढळते. अशा लेण्या देशात-विदेशात अनेक ठिकाणी आढळतात. अशाच प्रकारची इ.स. पूर्व २२०० वर्षांपूर्वीची एक 'बौद्धलेणी' 'कर्जत' पासून २०कि.मी. अंतरावर आपले अखेरचे श्वास घेत आहे.



बौद्धलेणी

'कर्जत' जवळील 'कोंदीवडा' गावापासून डोंगरात अर्ध्यातासाच्या अंतरावर ही बौद्धलेणी व त्यांमागील एक स्तूप एका मोठ्या भूतकाळाची आठवण करुन देत उभा आहे.

'हिरवे हिरवे गार गालिचे'

हरित तृणांच्या मखमालीचे'

अशा मखमली निसर्गाने वेढलेल्या वनदेवतेच्या कुशीत ही लेणी आहे. आजूबाजूला सतत वाहणारे पाण्याचे धबधबे मन मोहून टाकतात. जणू काही ध्यानस्थ बसलेल्या बुध्दाला साक्षात वरुण राजाच अभिषेक करत आहे.

ह्या लेण्यांबरोबरच तेथे सुमारे आठ फूट व्यासाचा एक स्तूपही आहे. हा स्तूप दगडी खांबाने उभारलेल्या मंडपात आहे. बाजूलाच दुसरी गुहा असून ती दोन भागांत विभाजित आहे. त्यांतील पुढील बाजूस प्रार्थना कक्ष असून मागील भागात विश्रांतीसाठी दगडी बाक, चुलीसाठी जागा आहे. व त्याच्या पुढे स्नानासाठी एक छोटासा तलाव आहे. लेण्यांमधील सर्व भिंतीवर वेगवेगळ्या प्रकारची (हौद) चित्रे कोरलेली आहेत. आज त्यांतील बहुतेक चित्रे भग्न झालेली आढळतात.

'यद् दुस्तरं यद् दुरापं या दुर्गं यच्च दुष्कृतम् ।

सर्वं तु तपसा साध्यं तपो हि दुरतिक्रमम् ॥'

म्हणजे तरुन जाण्यास कठिण, मिळण्यास कठीण, जाणण्यास कठीण व करण्यास कठीण अशी जी जी वस्तु

जगामध्ये आहे, ती ती सर्व तपाने साध्य होते. तपाचे सामर्थ्य अमोघ आहे.

अगदी हाच संदेश ती भग्नावस्थेत बुद्धाची चित्रे अजूनही देत आहे. व तपाची महती पटवून देत आहेत. तसेच बुद्धाने जगाला दिलेल्या माणुसकीच्या संदेशाची आठवण करुन देत आहेत.

पुरातत्त्वखात्याने आपल्या नियोजनाखाली ही वास्तू असल्याचा फलक लाविला होता. पण तो फलकही आज चोरीला गेला आहे. त्यांचबरोबर स्तूपाच्या भोवतालचे दगडी खांबही तोडून नेल्याचे निदर्शनास येते. इतर ऐतिहासिक स्थानांप्रमाणे येथे ही काही 'महाभागांनी' ही वास्तूम्हणजे आपली 'वडिलोपार्जित संपत्ती' असल्याप्रमाणे स्वतःची नावे लिहिली आहेत.

आज ही लेणी तर एक 'पिकनिक स्पॉट' च बनलेली असून, येथे सर्रास दारुच्या फुटक्या बाटल्या, प्लॅस्टिकच्या पिशव्या, कचरा सापडतो. खरोखर हे दृश्य पाहून मनाला खेद वाटतो. ज्या भिक्षुकांनी शांततेसाठी सर्व भौतिकसुखांचा त्याग करून हा स्तूप व लेण्या उभारल्या तेथेच कलियुगांतील मानवांनी 'पार्ट्या' करुन नंगानाच चालविला आहे.

आज त्या लेण्यांची अवस्था बघून असे वाटते की हजारोवर्षाच्या इतिहासाची साक्ष देणारा हा ऐतिहासिक नजराणा अजून १०० वर्ष तरी आपले अस्तित्व टिकवू शकेल का ?

मनोज शं. गडनीस
'गोकुळ अर्पा.' कर्वे रोड,
विष्णूनगर, डोंबिवली (पश्चिम)

•••

## अंधारव्याप्त

तर असा हा संग्रह
अशा या
कविता
संग्रहाचंही बारसं करायचं
हे ठरवल्यावर
अंधार ठिपका मनातला गडद झाला
क्षितिजावरचा सूर्य
गुडघ्यात मान घालून रडू लागला
"चुकलेल्या गणितांचं पुस्तक
अजूनही लिहितोस का .....?"
असं म्हणत क्षितिजावरचा सूर्य मावळला
मनाच्या डोहातला अंधार
अधिकच अंधारला.....
अधिकच अंधारला....... !

मोहन पाठक

# ''वानप्रस्थ-परार्थाकडून......परमार्थाकडे''

सौ. मंजिरी सु. धर्माधिकारी

*(वानप्रस्थाश्रम ही जीवनातील चार आश्रमांतील एक अवस्था. या अवस्थेतील जीवन कसे असावे, दृष्टिकोन कसा असावा याबद्दलचे विचार या लेखात व्यक्त झाले आहेत. - संपादक )*

आयुष्यभर सामाजिक व सांसारिक जबाबदाऱ्या पार पाडून वानप्रस्थाश्रमात प्रवेश करेपर्यंत माणूस शारीरिक व मानसिक दृष्टीने पार थकून गेलेला असतो. त्याला लाभलेल्या उर्वरित आयुष्याची नौका पार करण्याकरिता त्याने कोणती काळजी घ्यावी म्हणजे त्याच्या पुढील जीवनांत सुलभता येईल या विषयी काही विचार मंथन करण्याच्या दृष्टीने हा लेख लिहिण्याचा प्रयास आहे.

वानप्रस्थाश्रमात प्रवेश केलेल्या व्यक्तींनी आयुष्यभर अनेक कडू-गोड अनुभव घेतलेले असतात. त्यांचे पूर्वायुष्य त्यांच्या इतके अंगवळणी पडलेले असते की खरं म्हणजे या व्यक्ती आपल्यापूर्वायुष्यातील बदल करण्यास मनापासून तयार नसतात. व त्यामुळेच त्या दुःखी होतात आणि आपल्या कुटुंबाला त्रासदायक ठरतात. म्हणून अशा व्यक्तींनी जीवनावर असे प्रेम करावयास शिकावे की जे कमी-जास्त करता येत नाही. जे आपल्या सर्वांमध्ये एकमेवाद्वितीय आहे, ज्यामुळे आपण सर्व एक आहोत याचा अनुभव येतो. प्रत्येकाच्या आवडी-निवडी, इच्छा-आकांक्षा, कृतकर्मांचे संस्कार वेगळे असतात. परंतु माणसांमाणसांत, प्राणीमात्रांत जे एक जीवनसत्व, सत्य, चैतन्य भरून राहिलेले आहे ते एकच आहे. त्यावर प्रेम करावे.

आपण आपला पुढील संसार उदासीनपणे करावा अशी शिकवण आपल्याला पूर्वजांकडून मिळालेली आहे. त्यांचा अर्थ समजून घ्यावा. उदासीन म्हणजे मरगळलेल्या स्थितीत असा नसून वरच्या पायरीवर बसून उदात्त मनोवृत्तीने करावा असे आहे. (उदासीन = उत् + आसीन =वरच्या पायरीवर बसणे.) या शिकवणीचा स्वीकार करावा. तसेच कमलपत्राप्रमाणे अलिप्त रहावे-म्हणजेच संसारात राहून संसाराला आपल्या मनांत थारा देऊ नये. (उदा. होडी पाण्यात असावी पण होडीत पाणी असू नये.) तसेच सांसारिक इच्छा-आकांक्षा यात मनाला न गुंतवता वास्तवाची जाण ठेवून स्वतःला देवाविषयीच्या, सत्यस्वपाविषयीच्या- सद्‌विचारांनी भारावून टाकावे. असे सात्विक वृत्तीने भारावलेले मन संसारातील आनंदाचा व ऐश्वर्याचा उपभोग घेऊनही त्याचा साजेसा मनोवृत्तीमुळे कमलपत्राप्रमाणे आलिप्त राहू शकते. व अशा व्यक्तीला कोणत्याही प्रकारचा त्रास न होता -आलेल्या परिस्थितीला तोंड देणे शक्य होते.

वृद्धापकाळात एकाकीपणा व रिकामपण यामुळे माणूस त्रस्त होतो. अशा वेळी त्याला विरंगुळा म्हणून कोणाचा तरी 'सहवास' लाभावा किंवा कोणत्यातरी 'उद्योगात' मन रमवावे असे वाटणे साहजिक आहे. मला येथे आवर्जून असे सांगावेसे वाटते की प्रत्येक व्यक्ती या पायरीपर्यंत कधीना कधी येणारच असते. म्हणून प्रत्येक व्यक्तीने निवृत्तीपूर्वीच योग्य प्रकारे, विचारपूर्वक प्रत्येक बाबतीत नियोजन करावे. हे करताना इतरांचा सल्ला घ्यावा परंतु कोणाचेही अनुकरण करु नये. आपल्या आवडीनुसार तसेच आपल्या आर्थिक, मानसिक व बौद्धिक क्षमतेचा अंदाज घेऊन जर कांही छंद, कला जोपासल्या तर निवृत्तीनंतर पुढे काय ? असा प्रश्नच त्यांच्या पुढे उभा राहणार नाही. त्यांनी चांगले आचार-विचार असणाऱ्या माणसांची संगत धरावी. असे म्हटलेलेच आहे की The man is known by the company he keeps. त्यामुळे ही सत्संगती दोन्ही बाजूने एकमेकांना लाभदायक व

---

तुमच्या जवळ धैर्य व चिकाटी असेल तर तुमच्या सर्व इच्छा सफल होतील - म.गांधी

आनंददायी ठरेल.

कांही जण जीवनात सुख व आनंद मिळविण्याकरितां उन्मादकता व बेहोशीकडे झुकतात. व आपल्याला त्यातून आनंद मिळतो असे दुसऱ्यांना सांगत सुटतात. परंतु त्यांना त्यातूनही खराखुरा आनंद मिळू शकत नाही कारण तो जीवनातील वास्तवता काही काळ विसरून त्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष करण्याचा मार्ग आहे. वास्तवापासून काही काळ दूर गेल्याने वास्तवता नष्ट होत नाही. यासाठी वास्तवतेचे भान असणे व त्याला खंबीर मनाने सामोरे जाणे हेच योग्य आहे. या करिता जीवनात कोणतेतरी ध्येय असणे आवश्यक आहे. व मनही सात्विक हवे. म्हणजे मनातील सात्विकतेचे चांदणे आपला ध्येय पूर्तीचा मार्ग प्रकाशित करेल व आपण आपल्या जीवनयात्रेच्या अंतिम मुक्कामापर्यंत नक्की पोहोचू. रसिकता ही आपल्यात जोपर्यंत रस आहे वासना आहे तोपर्यंत असते. परंतु सात्विकता ही नष्ट न होणारी व आपला जीवनमार्ग उजळ करणारी आहे. म्हणून अशा लोकांनी मी पण ज्याचे सहजपणे

*फळ फळाने गळले हो ।*

*जीवन त्यांना कळले हो ॥*

अशी स्वतःची ओळख इतरांना करुन द्यावी.

या लोकांना मुक्तीचा विचार करणे व्यर्थ आहे. कारण मुक्तीचा विचार ही एक भ्रामक कल्पना वृद्धांनी आपल्या मनात ठेवलेली आहे. मुक्तीचा विचार हा स्वतंत्रपणे करताच येत नाही. मुक्तीचा विचार हा बंधसापेक्ष आहे. परिस्थिती नुसार बंधन जाचक झाले, असह्य झाले की त्या बंधनातून मुक्तीचा विचार आपोआप स्फुरतो.

दुःखरुप जीवनात आपल्याला सुख हे विरंगुळा आहे असे वाटते. सुखात विविधता व कमतरता आहे. परंतु सुख दुःखापलीकडे आनंद हा त्याचा आधार आहे. आपले सत्यस्वरुप आहे. आनंदात परिपूर्णता व एकरुपता आहे. सुख म्हणजे आनंद नव्हे. सुख-दुःख ही माणसाच्या आयुष्यात प्रकाशानंतर अंधार-पुन्हा प्रकाश याप्रमाणे सतत येत असतात. वाढत्या वयानुसार माणसाच्या बुद्धीचा-विचारशक्तीचा विकास होणे आवश्यक आहे. तसेच दुसऱ्यांकडून मानमान्यता मिळण्यावर अवलंबून न रहाता स्वतःच्या वागण्यावर नियंत्रण ठेवून आत्मपरीक्षण करण्याची सवय लावून घ्यावी. कोणतीही अपेक्षा न ठेवता कार्य करीत रहावे. अपेक्षा मनांत ठेवली की दुःख हे त्याबरोबर आलेच. आपले विचार, बोलणं, व वागणं यात सुसंगती ठेवावी. कौतुक व स्तुती कुणाला प्रिय नसते ? पण वाढत्या वयानुसार या गोष्टींची मानसिक गरज कमी होणे हे व्यक्तिमत्त्व विकासाचे लक्षण समजले जाते. तेव्हा पुढील आयुष्यात अशा व्यक्तींना सुखाचे आकर्षण व दुःखाचे ओझे वाटता कामा नये तो त्यांच्या दैनंदिन जीवनातील दिनक्रमातील एक भाग आहे असे त्यांनी समजावे. त्याला वेगळे अनन्य साधारण महत्त्व देऊ नये.

काही वृद्ध व्यक्तींना ठराविक वयानंतर संसाराचा कंटाळा येतो. परंतु आपला संसार जर कर्तव्यपूर्तीने, निरपेक्षबुद्धीने, जागरुकतेने केला तर ठराविक काळानंतर त्याचा कंटाळा येणे हो स्वाभाविक व योग्यच आहे. त्यात काहीही वावगं नाही, तो खरा कंटाळा नसून मनाच्या उन्नत व उदात्तपणाचे लक्षण आहे. या दृष्टीने ''तुका म्हणे मला अवघ्याचा कंटाळा'' । तू एक गोपाला'' ॥ हे संत वचन बोलके ठरते.

आपल्या जीवनाचा आपण कसा विनियोग करतो यावर आपले आयुष्य सरस की नीरस हे अवलंबून आहे. आपल्याला आपल्या स्वरुपाविषयी अज्ञान असल्यामुळे आपण भौतिक सुखालाच आनंद समजतो. व आनंदी आहोत असे भासवतो. परंतु आपण आपले सत्य-स्वरुप जाणून घेतले तर आपल्या असे लक्षात येईल की तो आनंद बाहेर नसून आपल्या आतमध्ये आहे, अंतर्यामी आहे, हा अंतर्यामीचा आनंद मिळविण्याकरिता वृत्ती स्थिर हव्यात. मन शांत हवे. मन शांत असेल तरच बुद्धी काम करु शकते.

आपल्या मानवी देहाला ब्रह्मदेवाने विवेचक बुद्धीसारखे अनमोल रत्न बहाल केले आहे. त्याला पारखून त्याला पैलू पाडून त्यातून चमक / तेज निर्माण करण्याचे काम आपल्या हाती आहे. प्रत्यकाकडील सुख दुःख लहान मोठी असू शकतात. पैसा कमी-जास्त असतो. परंतु या चैतन्याचा, सत्यतत्त्वाचा शोध घेऊन मिळालेला जो आनंद आहे त्याची प्रत एकच आहे. तो सर्व व्यक्तींना सारखाच मिळतो. त्यात गरीब-श्रीमंत असा भेद नसतो. असा आनंद मिळविण्याचा प्रयत्न करावा.

आयुष्य दुसऱ्याच्या सेवेत, ध्येयासाठी खर्च झाले तर खऱ्या जीवनाची व त्यात प्रकट झालेल्या जीवनतत्त्वाची ओळख होईल व जीवनातला आनंद व त्यातून मजेत रहाण्यांची वृत्ती निर्माण होईल. असे आयुष्य सरस, सार्थकी व अर्थपूर्ण होय. या उलट स्वतःचाच नेहमी विचार करणे. मला विविध सुखे कशी मिळतील व त्यांनी मी सुखी कसा होईन हा विचार दुसऱ्यांच्या दुःखाकडे डोळेझाक करायला लावून इतर सुखी माणसांबद्दल मत्सर, द्वेष निर्माण करणारा आहे. मनाची अस्वस्थता वाढवणारा आहे. अशा अस्वस्थ मनाला सुख कसे मिळणार? अशी मानसिकता व हा हीनस्वार्थच माणसाचे जीवन नीरस करुन टाकतो.

आपल्याला दुःख नको असेल तर प्रथम दुसऱ्याचे दुःखध कमी करण्याचा प्रयत्न करावा. दुसऱ्यांच्या सुखासाठी झटण्यात खऱ्या सुखाची प्राप्ती आहे. हा परार्थच आपल्याला परमार्थाकडे -निजस्वार्थाकडे- आनंदमय जीवनाकडे नेतो.

''परार्था प्राणही द्यावे, जगाला प्रेम अर्पावे'' हा सानेगुरुजींचा जीवनमार्ग (सत्य-धर्म-विचार) या दृष्टीने मार्गदर्शक ठरतो.

(या लेखासाठी श्री. शं.र. पराडेकर यांचे मार्गदर्शन लाभलेले आहे.)

सौ. मंजिरी सु. धर्माधिकारी
३४, गिरीराज सोसायटी, स्टेट बँकेजवळ, नौपाडा, ठाणे.
दूरध्वनी : ५४२ ३९५१

•••



अबाधित आरोग्याची गुरुकिल्ली

# ब्रह्मविद्या

## आध्यात्मिक श्वसनप्रकार व ध्यानाचे दुर्मिळ योगशास्त्र

*(ब्रह्मविद्येच्या अभ्यासाची आज नितांत गरज आहे. सदर लेखात या अभ्यास वर्गाचा परिचय करून देण्यात आला आहे. - संपादक )*

आज जगात अनेक धर्म व पंथ आहेत. परंतु ब्रह्मविद्या हा काही तसा एखादा धर्म किंवा या अभ्यासक्रमाद्वारे एखादा पंथ निर्माण करण्याचा उद्देशही नाही. सर्व धर्मामध्ये एक तत्व आवर्जून सांगितले आहे, ते म्हणजे **प्रत्येक मनुष्यामध्ये दैवी अंश आहे, ब्रह्मविद्या ही आपल्यामधील दैवी अंश फुलविण्याची एक पद्धत, एक वाट किंवा मार्ग आहे.**

मानवी आयुष्यात अल्पजीवित्व, आजारपण, वृद्धत्व, गरिबी, अपयश या गोष्टी अटळ आहेत असे वाटणे ही फार मोठी चूक आहे. हा आपला भ्रम आहे. तुमच्यामध्ये, माझ्यामध्ये जो दैवी अंश आहे, जी दैवी शक्ती आहे त्या शक्तीला अशक्य असे काहीच नाही. या शक्तीच्या साहाय्याने तुम्हाला आपल्या जीवनातील सर्व उणीवा भरून काढता येतील. या अभ्यासक्रमामध्ये ज्या पद्धती दिलेल्या आहेत, त्यांच्या मदतीने तुम्हाला तुमच्यामधील दैवी अंश ओळखण्यास व त्याचे स्वरुप जाणण्यास साहाय्य होईल. तसेच तुमच्यातील या दैवी शक्तीचा रोजच्या जीवनात कसा वापर करायचा हे देखील लक्षात येईल.

वरील सर्व विधाने तुम्हाला अतिशय अद्भुत वाटण्याची शक्यता आहे, परंतु जोपर्यंत तुम्ही या पद्धतींचा अभ्यास करुन त्यांचा स्वतःच्या जीवनात उपयोग करत नाही, तोपर्यंत तुम्हाला या विधानांची सत्यता पटणार नाही व त्याबद्दल दृढ विश्वास देखील होणार नाही.

या सर्व सृष्टीमध्ये सर्व प्राण्यांमध्ये, सर्व मानवांमध्ये एक दैवी शक्ती, एक दैवी अंश आहे या विधानाला बहुतेक फारच थोडे लोक विरोध करतील. परंतु ही शक्ती काय आहे व तिचा वापर कुठे व कसा करावा हे जाणणारे लोक फारच थोडे सापडतील. तरी देखील मानवामधील हे दिव्यत्व ओळखण्याच्या व ह्या दैवी शक्तींचा वापर करण्याच्या पद्धती जनमानसापासून दूर हिमालयात विशेषतः तिबेट प्रांतात राहणाऱ्या ज्ञानी पुरुषांनी गेली हजारो वर्षे ज्ञात आहेत. अखंड गुरु शिष्य परंपरेने या पद्धती आज आपल्यामार्फत या अभ्यासक्रमाच्या रुपाने आल्या आहेत.

आजसुद्धा या पद्धती मानवी जीवन सुधारण्यास, अधिक विकसित करण्यास अत्यंत उपयुक्त आहेत. त्यांचा उपयोग आपल्याला उत्तम प्रकृति, प्रबळ मनःशक्ती संपादन करण्यासाठी तसेच व्यावहारिक जीवनातील अडचणी सोडविण्यासाठी अत्यंत बिनचूकपणे करता येते.

ही दैवी शक्ती तुम्हाला उत्तम स्वास्थ्य, यश, धैर्य, समता, शांती आणि आनंद प्राप्त करण्यास साहाय्य करील. वरील सर्व सहज शक्य आहे, परंतु त्यासाठी ह्या पद्धतींचा अभ्यास करण्याचे व त्यातील तत्त्वे व नियम आपल्या आयुष्यात उतरविण्याचे कष्ट तुम्ही घेतले पाहिजेत.

---

दिवसा मनापासून कष्ट केले तर रात्री सुखाची झोप लागते. कोणतीही वेळ शुभ किंवा अशुभ नसते. माणुस कर्तृत्वाने वेळेला महत्व प्राप्त करुन देतो.

**शारीरिक आरोग्य व मानसिक स्वास्थ्य हा सुखी जीवनाचा पाया आहे.** आजार, वार्धक्य, चिंता, भय, काळजी, नैराश्य, दारिद्र् आणि तणाव अशा प्रतिकूल परिस्थितीत जखडून रहावेसे कुणालाच वाटत नाही म्हणूनच तुमचे मन अशा स्थितीतून मुक्त होण्याची वाट नेहमी शोधत असते.

तुम्ही आजवरच्या आपल्या जीवनात ह्या दिव्य अंशाचा अनुभव घेण्यासाठी काही केले आहे कां ? **ब्रह्मविद्येचे अभ्यासक्रम, श्रेष्ठ ज्ञानी पुरुषांनी शेकडो वर्षे केलेल्या संशोधनाचे सार आहे** आणि तुमच्यामधील ह्या दिव्य अंशाची, परमात्म्याची, ह्या भगवंताची तुम्हाला ओळख करून देणे, हेच ब्रह्मविद्येचे श्रेष्ठ उद्दिष्ट आहे.

आपल्या जीवनास कारणीभूत असणाऱ्या ह्या दोन्ही गोष्टी, म्हणजेच आपला ''श्वास'' आणि आपला ''विचार'' आपण जन्मापासून वापरत आहोत, परंतु कोणीही या कशा वापराव्या ते आपल्याला शिकवलेले नाही. नेमके हेच आपण या अभ्यासक्रमात शिकणार आहोत.

ब्रह्मविद्येच्या अभ्यासक्रमाचे दोन विभाग आहेत.

१) सकाळी करावयाचे प्राणायाम व इतर शास्त्रशुद्ध आध्यात्मिक श्वसनप्रकार.

२) रात्री करावयाचे किंवा आपल्या सोयीनुसार पहाटे करावयाचे ध्यानाचे प्रकार.

**आपला श्वास हेच आपले जीवन आहे.** जोपर्यंत श्वास आहे तोपर्यंत जीवन आहे. याप्रकारे आपले जीवन पूर्णतः श्वसनावर अवलंबून आहे. श्वासामार्फत जीवनावश्यक प्राणवायू व प्राणशक्ती आपल्या शरीरात घेतली जाते. प्राणवायुने रक्त शुद्ध होते व प्राणशक्तीने मज्जासंस्थेचे कार्य चालते. बहुतेक सर्व रोग व आजार पुरेसा प्राणवायु व प्राणशक्ती शरीरात न आल्यामुळे उद्भवतात.

या प्रकारे शरीराचे आरोग्य योग्य श्वसनावरच पूर्णतः अवलंबून आहे. **आपण जरी जन्मल्यापासून श्वास घेत असलो तरी आपण योग्य प्रकारे श्वसन करतोच असे नाही. योग्य श्वसन हे शिकूनच साध्य होते.** या आध्यात्मिक श्वसनप्रकारांच्या सरावातून नेमके हेच साधले जाते. नियमित सरावाने शरीरास योग्य श्वसनाची सवय होते व हळूहळू फुफ्फुसांची क्षमता वाढल्यामुळे अधिक प्राणवायु व प्राणशक्ती शरीरात येते व हे शरीर यंत्र अधिक कार्यक्षम व निरोगी होते.

''ध्यानाच्या'' बाबतीतही हेच म्हणता येईल. ज्याप्रमाणे योग्य श्वसनाने शरीर शुद्ध होते, त्याचप्रमाणे योग्य ध्यानाने मन शुद्ध होते. **शुद्ध मनाचा मनुष्य नेहमी आनंदी, उत्साही, परोपकारी व आरोग्यसंपन्न होतो.**

या अभ्यासवर्गात शिकविले जाणारे सर्व आध्यात्मिक श्वसनप्रकार अतिशय सोपे असून ते करण्यास साधारण एक तास लागतो. अर्थातच पहिल्या दिवसापासून इतका वेळ लागणार नाही. शरीराची क्षमता हळूहळू २५ आठवड्यात वाढवत नेली पाहिजे. ध्यानाच्या ज्या सोप्या पद्धती या वर्गात शिकविल्या जातील, त्यांचा सराव करण्यास साधारण ४५ मिनिटे लागतील. ह्या आध्यात्मिक श्वसनप्रकार व ध्यानाच्या तंत्राचा फायदा अनेकांनी घेतला आहे व बऱ्याच जणांनी अस्थमा, सांधेदुखी, रक्त दाब, हृदयविकार, मानसिक दौर्बल्य, निराशा, निद्रानाश, निरुत्साह अशा अनेक विकारांवर मात केली आहे. तर मग ब्रह्मविद्येच्या ह्या प्राचीन योगशास्त्राचा व तत्वज्ञानाचा लाभ का घेत नाही ?

पत्रद्वारा अभ्यास :

मुंबई बाहेरील साधकांसाठी वरील सर्व अभ्यासक्रम पत्रद्वारा करण्याची सोय उपलब्ध आहे. पत्रद्वारा अभ्यासात दर आठवड्याला एक ह्याप्रमाणे अभ्यासक्रमाच्या

पुस्तिका टपालाने पाठविल्या जातात. ह्या पुस्तिकेत साधनेचा तसेच तत्त्वज्ञानाचा भाग सविस्तर व सोप्या पद्धतीने दिला आहे. ह्या पुस्तिका वाचून त्याप्रमाणे बिनचूक सराव करता येतो. काही शंका असल्यास पत्रद्वारा अशा शंकांचे निरसन करण्यात येते. पत्रद्वारा अभ्यासासाठी लेखाच्या शेवटी संपर्क साधण्यासाठी पत्ता दिला आहे.

सुमारे १२०० वर्षांपूर्वी भारतातील नालंदा हे फार प्रसिद्ध विद्यापीठ होते. नाना देशींचे व प्रांतांचे तत्त्वज्ञानी, वैज्ञानिक व अभ्यासू विद्यार्थी इथे शिक्षणासाठी येत असत. या नालंदा विद्यालयात ''तत्त्वज्ञान व योग'' यांचा विभाग होता. श्रेष्ठ गुरु व तांत्रिक, गुरु पद्मसंभव या विभागाचे प्रमुख होते. त्यांच्या दिव्य दृष्टीला भविष्यकाळात होणारा नालंदा विद्यालयाचा नाश दिसत होता, त्यामुळे व तिबेटच्या राजाच्या विनंतीमुळे ते आपल्या निवडक शिष्यांसह तिबेटमध्ये गेले. या ठिकाणी त्यांनी आपला आश्रम स्थापन केला. पुढील शतकानुशतके गुरु पद्मसंभवांची ही पवित्र गूढ विद्या निवडक विद्यार्थ्यांना व साधकांना शिकवली जात होती.

१९व्या शतकाच्या अखेरीस एक इंग्रज गृहस्थ तिबेटमधे जाऊन ही दुर्मिळ विद्या शिकून आले. ह्या गृहस्थांचे नाव ''गुरु डिंग ले मी'' होते व त्यांनी ह्या प्राचीन विद्येचा जगभर प्रसार केला.

''ब्रह्मविद्या साधक संघ'' ही एक धर्मार्थ संस्था असून, ''चॅरिटेबल कमिशनरकडे'' संस्थेची नोंदणी केलेली आहे. ह्या प्राचीन व दुर्मिळ योगशास्त्राचा प्रसार करणे हेच संघाचे मुख्य कार्य आहे. देणग्यातून मिळालेल्या रकमेचा विनियोग ह्याच उदात्त हेतूसाठी केला जातो. **संघाचे सर्व कार्यकर्ते व शिक्षक संस्थेचे कार्य विनामूल्य व सेवाभावाने करतात.**

•••



''उठ ! उठ ! अरे आशुतोष पोहायच्या क्लासला उशीर नाही होता कामा ! नाहीतर नंतरचा कराटेचाहि क्लास, दुपारचा ड्रॉइंगचा क्लास.... अरे सगळंच वेळापत्रक विस्कटेल बघ.....''

शिक्षण हे केवळ नोकरीचे साधन नाही, तर स्त्री पुरुषांना उत्तम नागरिक बनवण्याचे ते साधन आहे. आणि म्हणूनच शिक्षण सुधारणेचा विचार 'तळा' पासूनच व्हायला पाहिजे. उत्तमातल्या उत्तमाचे संवर्धन म्हणजे शिक्षण होय.

# मी पाहिलेली इटाली (पूर्वार्ध)

डॉ. ग.त्रिं. दाभाडे

*(विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ग.त्रिं. दाभाडे यांनी केलेल्या इटालीच्या अभ्यास दौऱ्याचे प्रवासवर्णन या लेखात वाचावयास मिळेल. हा त्यांच्या लेखाचा पूर्वार्ध आहे. - संपादक)*

इटाली हे नाव घेतले की लिओनार्दो डी व्हींचीची अजरामर झालेली 'मोनालिसा, कलाकृती, जगातील ख्रिश्चन धर्माचे प्रधान पीठ-व्हॅटीकन, चे सॅनपॅट्रो (सेंट पीटर्स) चर्च, जगांतील सात आश्चर्यांपैकी एक असलेले-पीसा येथील कलता मनोरा, तसेच शेक्सपीयरने ज्यावरून 'मर्चंट ऑफ व्हेनिस' ही कादंबरी लिहीली ते महत्त्वाचे व्यापारी केंद्र व सुंदर पर्यटन केंद्र असलेले ऐतिहासिक शहर-व्हेनिस. त्याच प्रमाणे इटालीचे वाङ्मय समृद्ध करणारे डांटे सारखे महाकवी, क्रोचे सारखे सौंदर्यशास्त्राचे थोर अभ्यासक नजरेसमोर चटकन उभे राहतात. एवढेच काय तर आपल्या प्रसिद्ध कादंबरीने "वीमेन ऑफ रोम" ने २०व्या शतकांत ज्याने प्रचंड खळबळ उडवून सर्व जगाचे लक्ष वेधून घेतले तो अल्बर्टो मोराव्हीया किंवा झोपडपट्ट्यांतील मानवी जीवनावरील दारिद्र्यावर आधारीत "गॉडफादर" या महान कादंबरीने व त्यावरील आधारीत चित्रपटाने सर्वांना परीचित झालेला व नुकताच दिवंगत झालेला महान कादंबरीकार मारिओ पुझो हे पण नजरेआड करता येत नाही. असा देश की ज्याचा भू भाग युरोप खंडाच्या दक्षिणेस बूट घातलेल्या मानवी पायासारखा भूमध्य सागरात शिरलेला आहे. तो देश म्हणजे दुसरा तिसरा कोणताही देश नूसन तो "इटाली" हा आहे. उत्तरेस आल्प्स पर्वतांच्या पायथ्यापासून सुरु झालेला इटालीचा भू भाग पुढे दक्षिणेस भूमध्य सागरात ज्वालामुखी असलेल्या सिसीली बेटापर्यंत पसरलेला आहे.

महान सांस्कृतिक ठेवा लाभलेल्या व प्राचीन ऐतिहासिक परंपरा असलेल्या अशा या इटाली देशात पेरुज्या (PERUGIA) या शहरी ६व्या आंतरराष्ट्रीय एरोबायॉलॉजीक कॉंग्रेसचे जागतिक अधिवेशन ३१ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर १९९८ या काळांत भरले होते. तेथे शेवाळासंबंधी (मॉसेस) केलेल्या संशोधनाचा शोध प्रबंध सादर करण्यासाठी उपस्थित राहण्याचे निमंत्रण मला आले होते. त्यासाठी महाराष्ट्र सरकारने व इतरांनी केलेल्या सर्वप्रकारच्या मदतीने हा इटालीचा अभ्यासदौरा करण्याचा योग मला लाभला. पेरुज्या हे मध्यम लोकवस्ती असलेले शहर रोम या राजधानीच्या शहरापासून २०७ किलोमीटर अंतरावर आहे. ३० ऑगस्ट १९९८ ला सकाळी ३.३० च्या अलीटालीयाच्या विमानाने जे मुंबईहून उड्डाण केले ते पुढे एकदम सकाळी ११ वाजता रोमच्या फ्युमीसीनी (FUMICINI) विमानतळावर उतरले. वाटेत विमान फक्त कुवैतला सकाळी ६ वाजता थांबले होते. या विमानतळावर कस्टमचे सर्व सोपस्कार झाल्यावर विमानतळाजवळच असलेल्या तीन निरनिराळ्या एस्केलेटरच्या मदतीने विमानतळाजवळ पण वर असलेल्या रेल्वे स्टेशनवर म्हणजे एअर पोर्ट रेल्वे स्टेशनवर पोहचलो. तेथे २० डॉलर देऊन एअरपोर्ट ते पेरुज्या व्हाया रोम टर्मीनस (म्हणजे रोम येथील रेल्वेचे मुख्य केंद्र जसे आपल्याकडे व्हीक्टोरीया टर्मीनस आहे, तसे) थेट तिकीट काढले. एअरपोर्ट स्टेशनहून निघालेली गाडी अर्ध्या तासांत रोमा टर्मीनी येथे आली. नंतर रोमा टर्मीनीहून पेरुज्या येथे जाणाऱ्या ट्रेनमध्ये बसलो. हा प्रवास साधारणतः अडीच तासाचा होता. या ट्रेनमध्ये

पुरुष व स्त्रीयासाठी मिळून एकच वर्ग असून प्रत्येक कोचमध्ये आरामशीर, ऐसपैस बसता येईल अशा सुखकारक प्रकारच्या खुर्च्या बसविलेल्या होत्या. ट्रेन सुरु झाली की मुख्य दरवाजे आपोआप बंद होत नि ट्रेन थांबली की दरवाजे आपोआप उघडले जात. सर्वच कोच वातानुकुलीत (Electornically) होते. त्यामुळे थकवा असा काही जाणवला नाही. त्याचप्रमाणे गाडीतील डब्यांत शिरताना अथवा उतरताना कुठे अति धावपळ दिसली नाही की कुणाची कुणाला धक्काबक्की जाणवली नाही . कारण येथील समाजात रुजविलेली जी शिस्त आहे, तसेच नागरिकांच्या हक्काबरोबर काही बंधने असतात त्याची जाणीव प्रत्येक नागरीका मध्ये रुजविलेली गेल्यामुळे तसेच प्रत्येकास आपल्या देशाबद्दल असलेला जो सार्थ अभिमान वाटतो, त्यामुळे सर्वच ठिकाणी सामाजिक जीवन शांत पण शिस्तबद्द दिसले आहे.

मुंबईच्या व्हिक्टोरीया टर्मिनस प्रमाणे असणारे रोमचे रोमा टर्मीनी (Roma Termini) हे इटालीच्या सर्व महत्त्वाच्या भूभागाला रेल्वेने जोडलेले आहे. येथून इटालीच्या महत्त्वाच्या भागात जाण्यासाठी जवळपास तीस प्लॅटफॉर्म्स बांधलेले आहे. प्रत्येक प्लॅटफॉर्मवर मोठ्या विद्युत फलकावर सहजरित्या वाचता येईल अशा ठळक अक्षरांतले (इंग्रजी व इटालीच्या भाषेत) वेळापत्रक लावलेले असते. त्यामुळे माझ्यासारख्या नवख्या प्रवाशास सुद्धा फारशी अडचण आली नाही. प्लॅटफॉर्म्स जसे ऐसपैस होते तसे खूप लांबचवडे, अतिशय स्वच्छ, अशा गुळगुळीत फरश्या लावून केलेले होते. कचरा, धूळ लगेच निघून जावी म्हणून ठराविक कालावधीने स्वयंचलीत अशा ऑटोरीक्षासारख्या तीन चाकी वाहनाद्वारे स्वच्छता राखली जाते. हा केरकचरा, धूळ निर्मूलन करणाऱ्या तीन चाकी वाहनाचा चालक मात्र हा स्मार्ट असून सुटाबूटात अशा चांगल्या गणवेषांत राहून त्या वाहनाद्वारे थोड्यावेळांत जास्तीत जास्त काम करुन घेत असतो. या रोमा टर्मीनींत (मुख्य रेल्वे केंद्रात) ठराविक अंतरावर सेल्फ सर्व्हीस पद्धतीवर चालणारी अनेक अलपान केंद्रे जशी विपुल होती तशीच सार्वजनिक ठिकाणी अतिआवश्यक असणाऱ्या सुखसोयी (विश्रांती गृहे, स्वच्छता गृहे) पण होती. रेल्वेच्या वाहतूकीवरील असणारा असह्य ताण कमी करण्यासाठी व रस्त्यावरील वाहनांवर नियंत्रण करण्यासाठी रोमा टर्मीनी पासून भुयारी रेल्वेची (METRO किंवा TUBE RAILWAY )म्हणजे मेट्रो अथवा ट्यूब रेल्वेची पण वाहतूक अत्यंत शिस्तबद्ध रित्या चालू आहे. रोमा टर्मीनींहून पेरुज्या साठी असलेल्या ट्रेनमध्ये एक्झीक्युटव्ह चेअर असतात तशा खुर्च्या सर्व डब्यांत चार रांगात लावलेल्या असल्यामुळे मनमोकळे तर बसता येतेच पण त्याशिवाय प्रत्येकांस बंद अशा पारदर्शक खिडकीतून बाहेरील निसर्ग सौंदर्याची लयलुट मनसोक्त करता येते. ट्रेन चालू असताना शासन नियंत्रित एजंटामार्फत येणाऱ्या ट्रॉलीमधून चहा, कॉफी, शीतपेये, अथवा परदेशी चलनाचे विनिमय इ. व्यवहार केला जातो. या अडीच तासाच्या प्रवासांत शारीरिक थकवा असा जाणवला नाही. कारण हवामान जसे आल्हादायक होते तसेच ट्रेन प्रवास करताना निसर्गाच्या रमणीय दर्शनाने नेत्रसुख पण मिळत होते. ट्रेनमधून बघताना लहान मेठे डोंगर जसे पळत असल्याचा भास होत होता तसेच हिरवी गार गव्हाची, मक्याची शेते भरभर नजरेतून सुटत होती. त्याचबरोबर बीच, ओक, पॉपलर, विलो, पाईन, खाली रुंद व वर टोकांशी निमुळती होणाऱ्या ब्राह्मी पँगोडा सारखी रचना असणारे ज्युनीपर वृक्ष हे जणु काही ट्रेनसारखा महाराक्षस पाहून पळत असल्याचा भास पण होत होता.

शेवटी रोमा टर्मीनींहून निघालेली ही ट्रेन पेरुज्या स्टेशनवर संध्याकाळी ४.३० वाजता पोहचली. पेरुज्या स्टेशनमधून उतरुन ४ किलोमीटर अंतरावर असलेल्या उंब्रीया एरोबार्गोलांजी कॉंग्रेसच्या कार्यालयात जाण्यासाठी टॅक्सी केली नि कार्यालयांत पोहचलो. ह्या ४ किलोमीटर करीता टॅक्सी भाडे १८ डॉलर म्हणजे सुमारे १६००रु एवढे

झाले. पेरुज्या हे ३-४ लाखाच्या लोकवस्तीचे शहर इटालीच्या मध्यवर्ती (UMBRIA) अशा शेतीप्रधान प्रदेशातील महत्त्वाचे शहर आहे. येथील भागांत मका, गहू, सूर्यफूल, ऑलीव्ह व द्राक्षाची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. या शहरांतील इमारती भव्य असून त्याचे दरवाजे अती मोठे जसे आपल्याकडे पूर्वी म्हणजे ८०-९० वर्षापूर्वीच्या काळांतील वाड्यांना होते तसे मोठे होते. येथील इमारतींना जणू काही किल्ल्याच्या प्रवेश द्वारास असतो तसा दरवाजा आहे असे वाटले. सर्व मुख्य प्रवेश दरवाजे बंद होते. तेव्हा प्रश्न पडला की एरोबार्यालॉजीचे मुख्य कार्यालय आहे, तेथील संबंधितांना भेटायचे कसे ? सोबत असलेल्या टॅक्सी ड्रायव्हरने खुणावून सांगितले की दरवाज्याच्या बाजुस जी एक चौकोनी पट्टी आहे त्यांत तुमच्या माणसाचे नाव वाचा नी त्याच्या बाजुस असलेले बटण दाबा. त्याप्रमाणे केले असता, बाजूस बारीक छिद्रे असलेल्या पट्टीतून आवाज आला की, कोण आहे ? कोठून आलांत ? लगेच अस्मादिकांनी त्या छिद्रे असलेल्या पट्टीसमोर बोलून समर्पक उत्तर दिल्याबरोबर क्षणार्धात त्या इमारतीच्या प्रवेशद्वाराचा तो भला मोठा दरवाजा (जसा काही पुण्याच्या शनवारवाड्याच्या दिल्ली दरवाजासारखा) उघडला गेला नि आंत जाऊन दुसऱ्या मजल्यावर एरोबार्यालॉजीच्या कार्यालयांत जाऊन संबंधितांची भेट घेतली. ज्या हॉटेलात आमची राहण्याची व्यवस्था केली त्या हॉटेल सीन (SIGNA)मध्ये आम्हास संस्था चालकांनी पोहचवून देण्याची व्यवस्था केली. या हॉटेलच्या खोलीचे प्रतिदिनी भाडे होते ८५ डॉलर. त्याप्रमाणे खोली वातानुकुलित व सुशोभित व सेल्फकंटेंट तर होती शिवाय त्यांत दूरदर्शन, दूरध्वनीची पण व्यवस्था होती. ३० ऑगस्ट ९८ च्या रात्री विश्रांती घेतल्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे ३१ ऑगस्ट ९८ रोजी पेरुज्या विद्यापीठाच्या दीक्षांत दालनांत संध्याकाळी ६व्या आंतरराष्ट्रीय एरोबार्यालॉजीच्या जागतिक कॉन्फरन्सच्या उद्घाटन सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी निघालो. इटालीतील राहणीमान सर्व दृष्टीने उंचावलेले असल्यामुळे ३-४ किलोमीटरचे भाडे सुमारे १८ डॉलर (१५०० ते १६०० रुपये) परवडणारे नव्हते. म्हणून हॉटेल सीना पासून समारंभ स्थळी अस्मादिकांनी पायी जाण्याचे ठरविले. हॉटेल सीना ज्या रस्त्यावर होते त्याचे नाव होते कोर्सा केव्हूर (COURSA CAVOUR) राहण्याचे हॉटेल ते समारंभाचे स्थळ (पेरुज्या विद्यापीठ) ह्यामधील अंतर होते ३ किलोमीटरचे. सोबत पेरुज्या शहराचा नकाशा असल्याने व आजूबाजूच्या लोकांनी मार्गदर्शन केल्याने समारंभस्थळी ३०-३५ मिनीटांत पायी पोहचलो. कोर्सा केव्हूर हा साधारण दीड किलोमीटरचा रस्ता संपल्यावर दुसरा एक मोठा चौक असलेला रस्ता लागतो. हा रस्ता म्हणजे कोर्सा व्हेनुची (COURSA VENUCHI) हा होय. कोर्सा व्हेनूची रस्ता बजा मोठा चौक प्रशस्त व ऐसपैस असल्याने मोठमोठे डिपार्टमेंटल स्टोअर्स, सिनेमा थिएटर्स, रेस्टारंट व ज्वेलर्सची दुकाने लक्ष वेधून घेतात. त्याचप्रमाणे रस्त्याने जाताना लागणारी प्राचीन पण भव्य चर्चेस, इतर मोठ मोठ्या बिल्डींगज् या सर्वांवर इटालीयन वास्तू रचनेचा ठसा उमटलेला आहे असे दिसते. कोर्सा व्हेनूची जिथे संपतो तिथे एक मोठे, ४००-५०० वर्षापूर्वीचे प्राचीन चर्च आहे. त्याच्यामागील भागाकडून जो रस्ता आहे तो पेरुज्या विद्यापीठापर्यंत जातो. पेरुज्या विद्यापीठाच्या दर्शनी भागांत एक मोठी, प्राचीन पण भव्य अशी इमारत आहे तीवर गॉथिक वास्तूरचनेचा प्रभाव जाणवतो. तेथे जवळच एक मोठे उंच नि वर निमुळते होत जाणारे टॉवर (मनोरा) बांधला आहे. त्यामुळे पेरुज्या विद्यापीठाच्या मुख्य बिल्डींगची भव्यता प्रकर्षाने डोळ्यांत भरते.

समारंभ स्थळी पोहचल्यावर नोंदणी, विचारपूस, इ. सोपस्कार तेथील परिचित व्यक्तींच्या (प्रोफेसर फ्रेम्बॉली, इ.) भेटी झाल्यावर उद्घाटन समारंभ जेथे होणार होता त्या दीक्षांत सभागृहात पोहचलो. हे सभागृह हे अति मोठे, ऐसपैस होते, सर्व वातानुकुलीत सुख सोयींनी बांधलेले होते.

---

क्रांतीला एकच नैवेद्य लागतो तो म्हणजे देशभक्ताचे रक्त.

सुमारे एक हजाराच्यावर लोक अतिशय आरामांत बसतील अशा बेताने खुर्च्यांची मांडणी नीट नेटकी केलेली होती. उद्घाटन सोहळा अतिशय साधा पण गांभीर्याच्या वातावरणांत पार पडला. ह्या सोहळ्यांत भपका, डामडौल किंवा हारतुऱ्यांची उधळपट्टी असे कांहीही नव्हते. स्टेजवर एका मोठ्या टेबला भोवती ठेवलेल्या ८-१० खुर्च्यांवर आंतरराष्ट्रीय एरोबायॉलॉजीक संस्थेचे आजी, माजी अध्यक्ष, संस्थेचे ५-७ पदाधिकारी बसलेले होते. येथे उद्घाटनास राजकीय सत्ताधिकाऱ्यास बोलविण्याची पद्धत नव्हती. संयोजक प्रो. फ्रेर्वाली यानी स्वागतपर प्रास्ताविक व अहवालवाचन केल्यावर या वर्षीच्या अध्यक्षांचे विचार मांडल्यावर आभार प्रदर्शन होऊन हा सोहळा दीडतासांत संपला. १ सप्टेंबर ते ५ सप्टेंबर १९९८ या पाच दिवस चाललेल्या निरनिराळ्या चर्चासत्रांत जगांतील सुमारे ४०० शास्त्रज्ञांनी आपापल्या अभ्यास क्षेत्रांत केलेल्या कार्यासंबंधीचे शोध निबंध वाचन करून त्यावर साधक बाधक अशी समीक्षात्मक चर्चा करून हे ६ दिवस चटकन निघून गेले हे समजलेपण नाही. ५ सप्टेंबर ९८ रोजी कॉन्फरन्सचे सूप वाजले. त्याचदिवशी पेरुज्या विद्यापीठाच्या वनस्पती शास्त्र विभागाच्या उद्यानास भेट देण्याचा कार्यक्रम पार पडला. या प्राचीन उद्यानांत ४०० वर्षापासून दुर्मिळ अशा वनस्पती जतन करून ठेवण्यांत आल्यामुळे अभ्यासकाची एक चांगलीच सोय करून ठेवलेली आहे.

याच ५ सप्टेंबर १९९८ रोजी आयोजकातर्फे 'VERATUR. व्हेराटूर या पर्यटक संस्थेने फ्लोरेंस, पादुआ, व्हेनिस व रोम येथील निरनिराळ्या शैक्षणिक, ऐतिहासिक तसेच प्रेक्षणीय स्थळांचा अभ्यास दौरा आयोजित केला गेला. सर्व प्रथम 'फ्लोरेंस ला आम्ही भेट दिली. पेरुज्या ते फ्लोरेंस हे अंतर बसने ४ तासाचे होते. वाटेत मार्गावर पेरुज्या पासून ३० कि.मी. अंतरावर ऐतिहासिक असे छोटेखानी शहर-असीसी हे लागले. तेथील एक तासाच्या धावत्या भेटीत ऐतिहासिक कॅथेड्रेल्स, चर्चेसना भेटी दिल्या गेल्या. तेसच असीसीच्या मेयर तर्फे स्वागतसमारंभ व चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला गेला. तदनंतर आमची VERATUR कंपनीची बस फ्लोरेंस (FLORENCE) येथे रात्री ८.३० वाजता पोहचली. रात्री फ्लोरेंसच्या हॉटेलांत मुक्कामाची सोय केली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वा. फ्लोरेंसच्या शैक्षणिक व ऐतिहासिक अशा धार्मिक वास्तु बघण्याचा कार्यक्रम आयोजित केला गेला.

फ्लोरेंस, हे मध्य इटालीतील अल्पाईन पर्वताच्या पायथ्यालगत वसलेले इतिहास प्रसिद्ध आकर्षक पर्यटन स्थळ म्हणून जसे आहे तसे ते तस्कनी प्रांताची राजधानी म्हणूनही प्रसिद्ध आहे. रोमच्या वायव्येस २३२ कि.मी. अंतरावर अर्नो नदीच्या दोन्ही काठावर वसलेल्या शहरास फार मोठा शैक्षणिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. येथील प्रसिद्ध विद्यापीठ १४व्या शतकात स्थापन केलेले एक मोठे जागतिक संस्कृतीचे केंद्र बनलेले आहे. युरोपातील प्रबोधनाच्या काळांत (इ.स. १४०० ते १७९५) हे शहर शिल्पकला, चित्रकला, भित्तीलेप, स्थापत्य इ. गोष्टीमध्ये वैभवाच्या शिखरावर होते. येथे महाकवी डांटे (1302. DANTE) सारखे वाङमयोपासक होऊन गेले. तसे लिओनार्दो दि व्हिंची, मायकेल अँजेलो, गिबर्ती, रॅफेएल, दोनातेला या सारखे महान प्रतिभावंत शिल्पी तसेच चित्रकार किंवा बोकाचीचा, गॅलिलीओ या सारखे जग हादरून टाकणारे शास्त्रज्ञ होऊन गेले. तसेच ज्याच्या नावावरून अमेरिका खंडास नाव दिले तो 'अमेरिगो वेसपुकी' या सारखा महान शास्त्रज्ञाचे वास्तव्य या शहरातच होते.महाकवी दान्ते (डांटे-१३०२)ह्याने प्रबोधन काळांत पोपचे समर्थन केल्याने त्यास याच फ्लोरेंसमधून तडीपार केले गेले. या शहरातील 'पियाझा देले डूमो' या कॅथेड्रेलच्या आंतील सुंदर मोहक भित्तीलेप चित्रे मायकेल अँजेलो, गिबर्ती यांनी काढली ती पाहून तर डोळ्याचे पारणे फिटले होते. गिबर्ती हा जसा हाडाचा चित्रकार होता तसाच तो

स्थापत्य शास्त्रांत पारंगत असा शिल्पी पण होता. इ.स. १३३४ मध्ये त्याने बनविलेले 'CAMPARILE', नावाचे २९२ फूट उंच असे टॉवर सारखे ब्रॉंझ धातुचे बनविलेले घंटाघर तर फारच प्रेक्षणीय आहे. तसेच या घंटाघरास गिबर्ती व पोझानो या नक्षीकारानी कलाकुसरीने नटविलेले दरवाजे घडविलेले आहे. याशिवाय लोरेन्झो मेदीची (१४६९-९२) या गर्भश्रीमंत पण दानशूरच्या उदार आश्रयाने फ्लोरेंस शहरांत विद्या, कला, स्थापत्य इ. यांचा विकास होऊन फ्लोरेन्स या सांस्कृतिक वैभवात चांगलीच मोलाची भर पडली. येथील गॉथिक शैलीतून बांधकाम केलेले 'कॅथड्रील ऑफ सांता मारिया देले फ्योरे' ला भेट दिली असता असे सांगण्यात आले की त्यावरील सुंदर असा घुमट हा नवव्या शतकांतील ब्रूनेलेस्की या शिल्पकाराने घडविला होता. या इमारतीजवळच्या जॉतो या स्थापत्य विशारदाने बांधलेला घुमट आहे. त्यांतील कलाकुसरीनी घडविलेले दरवाजे असलेले 'जलसंस्कार', हे दालन मात्र गिबर्ती व पिसानो ह्यांनी घडविल्याचे समजले. फ्लोरेंस मध्ये आणखी पाहिलेले ठिकाण म्हणजे, 'पॅलॅझ्झो देल सिनोरा' या नावाचे नगरभवन (TOWNHALL). या नगरभवनात व्हाझारीने चितारलेली भित्तीलेप चित्रे व जवळच्या पडवीत असलेला चेल्लीनीचा पुतळा (इ.स. १५३३) हे पर्यटकांचे लक्ष वेधून घेतात. आपल्या महाराष्ट्राच्या दृष्टीने फ्लोरेंसची आठवण येते. मात्र कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराजाच्यामुळे (१८६६-७०) ! त्याला कारण म्हणजे येथे अर्नोनदीच्या काठावर असलेले महाराजांचे एक छोटे पण सुंदर असे बांधलेले स्मारक ! ह्या ठिकाणी भेट दिल्यावर साऱ्या गतकाळाच्या ऐतिहासिक घटना नजरेसमोर उभ्या राहतात, नि वाटते की या स्मारकाच्या रूपाने का होईना शिवरायांचा एक तरी वंशज युरोप खंडात आपली स्मृती जागवित बसला आहे. नाना कलांचा असा समृद्ध खजिना असलेल्या महान सांस्कृतिक व शैक्षणिक वारसा लाभलेल्या शहरांत कलाकुसरींच्या वस्तूंचा व्यापार पण फार मोठ्या प्रमाणावर चालतो. त्यामध्ये सोने, चांदी, हिरेजडीत तसेच चामड्यावरील कलाकुसरींच्या वस्तू फार मोठ्या प्रमाणांत उत्पादित केल्या जातात. इतर अशा अनेक कारणांमुळे फ्लोरेंस हे शहर पर्यटक केंद्र म्हणून अनेक शतकापासून सुप्रसिद्ध आहे.

डॉ. ग.त्रिं. दाभाडे
वनस्पती शाखा प्रमुख,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे
दूरध्वनी : ६३३ ६५०७

•••

With Best Compliments From

A
WELL
WISHER

## परंपरागत असलेल्या जुन्या-
# "दृक् कला हरवत आहेत"

लेखक, चित्रकार-व्ही . सिन्नरकर

*दूरदर्शन, संगणकासारख्या माध्यमांच्या पसाऱ्यात जुन्या दृक्कला हरवत आहेत, हे निरिक्षण नोंदले आहे कला क्षेत्रातील एका कलाकारानं त्यामुळेच अंतमुर्ख करणारा हा लेख - संपादक*

सुप्रसिद्ध चित्रकार, कलासमीक्षक व महाराष्ट्र राज्याचे माजी कलासंचलनालय प्रमुख (डायरेक्टर ऑफ आर्ट) व आमचे परममित्र श्री. बाबूरावजी सडवेलकर यांनी कलांच्याबाबत कला अकादमीबाबत व दृक्कलांच्या नाशवंत होणाऱ्या कलेबाबत वृत्तपत्रांतून आजवर खूपच लेखन तळमळीने केले आहे. कलेच्याबाबत, कलावंतांच्याबाबत हरवत चाललेल्या कलेचा इतिहास व परंपराबद्दल वेळोवेळी त्यांनी समाज जागृतीचे काम करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे वरील विषयावरील लेख वाचतांना कोणताही चित्रकलेवर प्रेम करणारा, कलेच्या इतिहासाची जपणूक व्हावी असे मानणारा जो रसिक कलोपासक असेल तो नक्कीच हळहळला असेल. आणि दुर्दैवाने आज महाराष्ट्रात तरी या कलेच्या जपणूकीबाबत पूर्ण अनास्था आहे.

बॉम्बे स्कूलच्या कालखंडात ब्रिटिशांच्या राजवटीत म्हणजे पेशवाई अस्तानंतरच्या काळात महाराष्ट्रात अनेकविध चित्रकार, शिल्पकार निर्माण झाले. खेड्यापाड्यातूनही लोककला जपणारे रसिक व कलावंत होते. राजे राजवाड्या इतकेच रसिक धनिकही कलावंतांना आश्रय देवून होते. सुबत्ता, रसिकता व भव्य मोठ्या वास्तू या मुळे अनेकानी कलावंताना जवळ केलेले होते. त्यावेळी जी चित्रकला सर्वत्र सांभाळली गेली. अनेक शैली जतन केल्या गेल्या. त्यामुळे त्या त्या काळाचा, कलेचा इतिहास आपोआपच जतन केला गेला. त्या त्या कालमानाचे प्रतिबिंब त्यावेळच्या सर्व कलाकृतीतून दिसून येते. ब्रिटिश राजवटीतही त्यांच्या कलाप्रेमामुळे त्यांनीही निरनिराळ्या प्रांतातील ही जुनी चित्रे परदेशी नेली. तशीच ती महाराष्ट्रातूनही नेली गेली. ती परत आणण्याचे आपण आता विसरु या. त्यावेळी छपाई पुस्तकांचा प्रसार नव्हता अशा काळी गांवोगांवी चित्रकार, शिल्पकार यांनीच तेव्हाच्या इतिहासाची सचित्र जपणूक केली होती, आजही त्याचा उपयोग होतो. आपल्या वैभवशाली कलायुगाचा समग्र इतिहास आज उपलब्ध नाही याचे कारण आपल्या राज्यकर्त्यांची चित्रकलेबाबत अनास्था. लोकांनाही कलेचे योग्य शिक्षण न मिळाल्याने कलेचे कळावे तसे महत्व कळलेले नाही. आपल्या अभ्यासक्रमात कुठेच कलेचा म्हणावा तसा इतिहास शिकवतच नाहीत. त्यांचे ज्ञानही नाही. त्यावेळच्या समाज जीवनाचाही इतिहास कुणीच शिकविला नाही. त्यामुळे गेल्या कित्येक पिढ्यांमध्ये म्हणावी तशी जुन्या परंपरागत, चित्रकलेबद्दल आवड,

अभ्यास करण्याची वृत्ती, राहिली नाही. जे सध्या रुढ आहे त्याचाच फक्त अभ्यास तरुण मंडळी करतांना दिसतात.

श्री. सडवेलकर म्हणतात त्याप्रमाणे कालक्रमवार मिळेल असा कला-संग्रहही मिळत नाही. व त्यामुळे कलावंतांची माहितीही उपलब्ध होत नाही. कलेचा इतिहास परदेशात अनेक शतकांचा व्यवस्थित मिळू शकतो. पण भारतात व महाराष्ट्रात तर मिळणे फारच कठीण. गेल्या जवळ जवळ दोनशे वर्षात महाराष्ट्रात रसिक धनिकांनी राजांनी कलेला हातभार लावला. राजवाडे, त्यांचे मोठे वाडे, यातून कला जतन ही केली. परंतु भिंतीवर व इतरत्र चित्रकलेने सजावट करण्यापलीकडे, त्याबाबत समग्र माहिती मात्र ठेवावी असे कुणालाही त्यावेळी सुचलेले दिसत नाही. मात्र अलिकडील काळात रसिक धनिक टाटा, बिर्ला यांनी मात्र "मार्ग" (MARG) व इतर त्रैमासिकाच्या मोठ्या संग्रहातून या कलाबाबत खूपच संशोधन वेळोवेळी केलेले दिसून येते. टाटा कंपनीच्या डायऱ्यांचाही यात महत्वाचा वाटा आहे. पूर्वी टाईम्स ऑफ इंडियाची वार्षिकेही अशीच अभ्यासपूर्ण असत. त्यातही महाराष्ट्रातील कलेबाबत खूपच संग्रहणीय माहिती मिळते. बॉम्बे आर्ट सोसायटीने सुरुवातीच्या काळात प्रदर्शनांचे जे कॅटलॉग प्रसिद्ध केले १९४० पर्यंत तेही या दृष्टीने कलेच्या दृक् कलेच्याबाबत बरेच सांगून गेले. आता जे घडले नाही, त्याची खंत न करता अद्यापही काय करण्याजोगे आहे व करता येईल याचाच मी या लेखात प्रामुख्याने विचार मांडीत आहे. "विचारी मना तूच शोधूनी पाहे." या वृत्तीने सर्व रसिक वाचकांनी, संस्थानी जर कांही खरोखरीच हालचाल केली तर अद्यापही खूपसे कांही या दृक्कलेच्याबाबत संग्रहीत करता येऊ शकेल. त्यात नव्या जुन्या परंपराही याव्यात.

महाराष्ट्र सरकारने गेल्या ३० वर्षात चित्रकलेबाबत फक्त चित्रकला शिकवण्यापलिकडे, प्रदर्शने भरवून ठराविक मंडळींना बक्षिसे वाटण्यापलीकडे काही केलेले नाही. जी काही शिक्षकांची व प्रदर्शनाची अवस्था आहे तीच केविलवाणी आहे. परंतु अगदीच नसण्यापेक्षा थोडीफार सोय आहे याच्या वरच हल्लीचे कला शिक्षण घेणारे व देणारे अल्पसंतुष्ट व खूष झालेले दिसतात. कांहीं मूठभर मंडळींना व त्यांच्या चित्रांना दरवर्षी बक्षिसे वाटली की कलेचे व शिक्षणाचे सार्थक झाले, असे मानणारे देणारे व घेणारे. समाजातही चित्रकलेबाबत उदासीनताच आहे. ओरिजनल पेंटिंग विकत घेवून घरात लावण्याचे दिवस आता संपलेत. कारण जागेची अडचण, आर्थिक अडचण व कमी झालेली रसिकता. शिवाय थोड्या पैशात जगभरची छापील पेंटिंग मिळतात, तीच फॅशनच्या नावाखाली घेवून घरोघरी लावण्याची आजची प्रवृत्ती. मग जुन्या कलेबाबत काहीच बोलायला नको. इतर प्रातांत विशेषत: बंगाल, तामीळनाडू, आंध्र, कर्नाटक, केरळ, राजस्थान, गुजरात व इत्यादि प्रातांत मात्र आजही तेथील धनिक राज्यकर्ते त्यांच्या जुन्या सर्व परंपरा मात्र अभिमानाने टिकवून धरतांना दिसून येतात. महाराष्ट्राचे राज्यकर्ते फक्त साखर, द्राक्षे, बीयर यांचे कारखाने यामुळे पैशाच्या व निवडणूकीच्या हिशोबातच गुंतलेले. महाराष्ट्रात बीयर बार, पंचतारांकित हॉटेल्स व मळेवाले गांवोगांवी त्यांच्या पैशातून निघालेली हॉटेल्स, बार, सभागृहे, नाट्यगृहे ज्यातून पैसा खूप मिळतो, परंतु कोणत्याही गावांत एखादी आर्ट गॅलरी, कला संग्रहालय

असावे हे कुणालाच वाटत नाही.

वाचनालये, ग्रंथालयेही जिथे दूरदर्शन प्रभावामुळे ओस पडताहेत तिथे जुने काहीं जतन करुन ठेवण्यास कोण जागा देणार हो ? आता तुम्ही म्हणाल अहो, '' रहायला जागा नाही, खिशात जरुर तेवढा संसारालाच पुरणारा पैसा नाही, ही जीवघेणी महागाई. मग संग्रह वगैरेसाठी आम्ही कुठून जागा, वेळ व पैसा देणार ? कसला संग्रह करणार ? रसिक वाचकहो ! जेथे इच्छा आहे तिथे मार्गही आहेत. आज महाराष्ट्रात गांवोगांवी अनेक नगरपालिकांच्या लाखो रु. खर्चून इमारती बांधल्या जात आहेत यात इमारत फंड व नगरपित्यांचे खायचे फंड मिळून भरमसाठ मोठ्या रकमेचे बजेट केले जाते. होवू दे. मी म्हणतो त्या वेळीच जर त्या त्या गावच्या नगरपालिकेने त्याच इमारतीत एखादे संग्रहालय होईल इतकी जागा राखून ठेवावी. निदान त्या गांवातील जुने वाडे पाडले जातात, रस्तारुंदीत व मोडकळीस आल्यामुळेही. त्या वाड्यातील जुन्या दुर्मिळ पोथ्या व इतर लाकडी कोरीव काम इत्यादी माहिती, जी त्या गावच्या जुन्या कला परंपतरा सांगत असते त्या वस्तू तरी त्या नगरपालिकेने जतन कराव्यात. अनेक गरीब लोकांकडे जुने कांही कलेबद्दलचे साहित्य पडून आहे. खराब होते आहे. पण दुर्मिळ व उपयुक्त आहे. अशा कलाकृती नगरपालिकेने विकत घ्याव्यात. आमदार, नगरपिते, मंत्री दौरे पार्ट्या निवडणूका यावर लाखो रुपयांचा चुराडा करणाऱ्या या नेते मंडळींनी गावासाठी तरी छोटे संग्रहालय ठेवायला हवे. ज्यामुळे त्या गावाच्या शेकडो वर्षांच्या परंपरा दृक्‌कला तिथे ठेवता येतील. आज गांवोगांवी अनेक ऐतिहासिक वास्तू, मंदिरे पडीक आहेत. यातील सर्व जुन्या चित्रांचे मूर्तींचे जतन व्हायला हवे. अशा वास्तू घरमालक जेव्हां पाडतात तेव्हां त्यांनीही जुने कांही उपयुक्त ते सारे नगरसंग्रहालयात द्यावे हा झाला नगरपालिकेसाठी प्रस्ताव.

आज जिल्हा परिषदेच्याही प्रचंड वास्तू सरकार बांधुन ठेवते आहे. ज्यांची अवस्था ते ऑफिस आहे कां गोडाऊन इतकी दरिद्री असते. याही वास्तूत जिल्हा कलासंग्रहालय करता जागा का देवू नये. जिल्हा परिषदेच्या कक्षेत जी तालुक्यांची गांवे येतात त्या गावांतूनही अनेक दुर्मिळ लोककला चित्रकला, शिल्पे, मंदिरे परंपरेने दिसून येतात. त्यांचे महत्त्व त्या खेडवळ मंडळींना कळावे तसे कळत नाही. ते कामही व्हायला हवे. हल्ली अशा दुर्मिळ वस्तू चोरुन नेल्या जातात अगर विकल्या जातात. तसेच अनेक शिक्षणसंस्था प्रचंड शाळा इमारती, कॉलेजच्या प्रचंड इमारती सर्वत्र उभारत आहेत. शिक्षण संस्थांनी संस्कृति व इतिहास ही जपायला हवा, परंतु या गोष्टींकडे संपूर्ण दुर्लक्ष होते. आज पन्नाससाठ लाखांच्या, कोटींच्या इमारती या संस्था उभारतात. त्या संस्थेत काम करणारे अध्यापक, कलाप्रेमी विद्यार्थी यांनी मिळून ते मिळवायला हवेत. प्रत्येक शाळा, कॉलेज इमारतीत एक संग्रहालय कां बांधले जावू नये. याहीमुळे निदान त्या त्या ठिकाणी तरी ही दृक्‌कला जी अद्याप उपलब्ध आहे ती तरी टिकविता येईल. आता या संस्थांचे संचालक माझ्या या विधानाकडे द्यावे तसे लक्ष देतीलच असे नाही. कारण चित्रकला व इतर कलेची प्रत्येक गोष्ट सरकार करील म्हणून वाट पहाण्यापेक्षा ठिकठिकाणच्या रसिक व धनिकांनी व नागरिकांनी जर हे कार्य सुरु केले तर आजही दुर्मिळ होत चाललेला

---

सततच्या यशामुळे जीवनाची एकच बाजू कळते, दुसरी बाजू कळण्यासाठी अपयश हवेच.

दृकृकलांचा इतिहास संशोधनास भरघोस यश मिळू शकेल. चित्रकला विषय घेवून पी.एच्.डी. होता यावे. निदान यापुढे कलोपासना इतिहासप्रेम यांच्यासाठी आजच्या पिढीने हे सारे शोधून जतन करायला नको कां ?

याबाबतचे कांही व्यथित करणारे अनुभव सांगावेसे वाटतात. माझ्या जन्मगांवी सातारा येथे पारसनीसवाडा म्हणून मोठा वाडा होता. जुन्या जमान्यातला. त्यावेळचे रसिक कै. पारसनीस यांनी अनेक वर्षे विविध कलासंग्रह आयुष्यभर करुन ठेवला होता. त्यात अनेक दुर्मिळ चित्रे व वस्तू होत्या. त्यांचे हयात असलेले मोठे चिरंजीव चित्रकार पारसनीस वय ८० वर्षे यांनी वडिलांनी जतन केलेले हे सारे महाराष्ट्र शासनाने घ्यावे ते म्युझियममधे जतन करावे म्हणून अनेक वर्षे प्रयत्न केले. स्वतः चित्रकार असल्याने त्यांना वडिलांच्या कलासंग्रहाचे महत्त्व कळत होते. कुटुंबातील इतर भावंडाना मात्र ती अडगळ वाटत होती. जुना वाडा नव्या सोयीने बांधण्यांसाठी पाडण्याचे ठरले. मग त्या संग्रहाचे काय ? राज्यकर्ते व महाराष्ट्रभर एकही अशी संस्था अगर रसिक मंत्री मिळाला नाही. दुर्दैवाने त्यांनी अनेकांना ही व्यथा सांगितली. मग दक्षिणेकडील कुणा थोर धनिक रसिकाचे या संग्रहाकडे लक्ष गेले. व त्यानेच ट्रक भरभरुन हा सारा संग्रह साताऱ्याहून उचलून त्याच्या दक्षिणेकडील गांवी नेला. मला श्री. पारसनीस डोळ्यात पाणी आणून सांगत होते. पैसे मिळाले, भावंडानी वाटून घेतले. परंतु वडिलांचे स्मारक ठरणारा हा संग्रह मात्र परप्रातांत गेला. त्यांनी त्या गृहस्थास विनंती केली की तुझ्या संग्रहात हे सारे ठेवशील तेव्हा  त्यातील एकाद्या कपाटास तरी पारसनीसांच्या वडिलांचे नाव द्यावे. अशी ही केविलवाणी कलेची अवस्था.

आमच्या ठाणे शहरातील जुने नामवंत चित्रकार कै. तासकर हे जे.जे. स्कूल ऑफ आर्टमधे सालोमनच्या काळात प्राध्यापक होते. त्यांनी आयुष्यभर चित्रीत केलेली हजारो स्केचीस, भव्य मोठ मोठी पेंटींग्ज त्यांच्या जुन्या बंगल्यातील माडीवरच्या हॉलमधे छान संग्रहीत केली होती. त्यांचे चिरंजीव कै. तासकर हे परळच्या आर्.एम्. भट शाळेत चित्रकला शिक्षक होते. त्यांनीही ते हयात असेपर्यंत जुने घर व हा संग्रह जतन करुन ठेवला. नंतर ती इमारत पाडून मुलांनी प्रचंड कमर्शिअल वास्तू उभी केली. व चित्रे त्यांच्या घरात कुठेतरी नेवून ठेवली. मी याबाबत नगराध्यक्षांना वेळोवेळी हा संग्रह नगरपालिकेत वस्तु संग्रहापुरती जागा, नगरपालिकेच्या रंगायतन व आता ६०-७० लाखांची महापालिकेची इमारत यात जरी ठेवली नाही, तरी जुनी नगरपालिकेची इमारत आहे. त्यातील १-२ हॉल आम्हा चित्रकारांना आर्ट गॅलरीस व जुन्या कलासंग्रहासाठी देण्याबाबत वेळोवेळी सर्व आयुक्तांना मी विनंती केली होती. परंतु तरंगत्या आर्ट गॅलरीचे (६लाख खर्च) जिथे बार व हॉटेल केले जाते. त्या नगरपालिकेकडून चित्रकला व जुन्या वस्तूंच्या म्युझियमसाठी जागा मागणे किती वेडेपण ठरतो याचाही मी अनुभव घेतला आहे. नाहीतर कै. शंकर पळशीकर, कै. तासकर, कै. किर्तिकर व इतर जुन्या पिढीतील चित्रकारांच्या दुर्मिळ चित्रकृति  ठाण्यातील व बाहेरुन येणाऱ्यांना आवर्जून पहाता आल्या असत्या. पण हे झाले नाही खरे.

ज्ञानी माणसाचा राग क्षणिक असतो, मध्यम दर्जाच्या माणसाचा राग दोन घटका राहतो, अधमाचा राग अहोरात्र तर नीच माणसाचा मरेपर्यंत असतो.

सर्व भारतात महाराष्ट्राची ही कला परंपरा जुनी आणि मोठी आहे. बंगाल वगैरे नंतर आले. या दृष्टीने एक रसिक महाराष्ट्रात निघाला, तो म्हणजे श्री. केळकर. यांनी आयुष्यभर कष्टाने उभे केलेले पुण्याचे राजा केळकर म्युझियम आज जागतिक केंद्र बनले आहे. एक रसिक माणूस काय करु शकतो. तसेच शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदरे हे माझे भावे स्कूलपासून समकालीन आणि चित्रकार शिक्षक मो.ब. पुरंदरे यांचे चिरंजीव. त्यांनीही निदान शिवाजीच्या वेडापायी, भक्तिपायी त्यांचे इतिहासाचे व चित्रमय असे संग्रहालय उभे केले. ही व्यक्तिगत उदाहरणे का देतो आहे. मनात जिद्द, आवड व इतिहासाची, कलेची अभिरुची असावी लागते. एक व्यक्ति करु शकते मग हा लाखोंचा समाज (जे स्वत: रसिक म्हणतात) काहीच करीत नाही. अशा अनेक छंदिष्ट व्यक्ति महाराष्ट्रात आहेत. दाभोळचे समाजकार्यकर्ते श्री. अण्णा दाभोळकर यांनीही लाखमोलाचा संग्रह जतन केला होता. शेवटी त्यांनाही तो ठाण्याच्या एका संस्थेस देणगी म्हणून दिला. त्याही संस्थेला ठाण्यात अद्याप म्हणावे तसे संग्रहालय उभे करता आले नाही.

आजही खेडोपाडी पसरलेल्या शेंकडो मातीकामाच्या कला, खेळणी, जत्रेत ही खेळणी फार लोकप्रिय होती. प्राणी, मूर्ति, हत्ती, घोडे, बैलगाडी असे अनेक प्रकार त्यात असत. परंपरागत रंगकाम, कलाकुसर त्यात असे. सावंतवाडीची रंगीत रंध्याची व लाकडी खेळणी, फळे पक्षी तर जगभर आजही प्रसिद्ध होती. सावंतवाडीच्या श्री. शिवराम राजे यांच्या वाड्यात आजही गंजीफा बनविणारे वयोवृद्ध कलावंत आहेत. सर्व हातानेच गंजीफा तयार करून त्यावरील चित्रकलाही हातानेच केली जाते. इतकी सुंदर अशी ही दृक्‌कला आत्ताच्या प्लॅस्टिकच्या युगात व सर्वत्र प्लॅस्टिकचीच खेळणी, वस्तू, मूर्ती व खेळ मिळत असल्याने व लोकही तीच घेत असल्याने महाराष्ट्रातील या सर्व लोककला विशेषत: चित्रकला, मूर्तिकला नष्टप्राय अवस्थेत आहेत. हे सारे जतन कोण करणार आहे. शिवाय परंपरागत कला चालत आलेल्या आता नवीन पिढीला त्या शिकवून तयार कोण करणार आणि केलेले काम विकत घेणारे ग्राहकही असायला हवेत. तरच हे शक्य. सुज्ञ रसिकांनी, सरकारने व कला संचनालयाच्या डायरेक्टरांनी यात पुढाकार प्रकर्षाने घेतला पाहिजे.

मी गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्रभर खेडोपाडी लॅण्डस्केप पेंटिंगजसाठी, फोटोग्राफीसाठी फिरलो. अनेक जुने वाडे, देवळे जी माळावर कुठेही पडीक अवस्थेत होती. त्यांना कुणीच वाली दिसला नाही. अनेक मंदिरांच्या भिंतीवर सुंदर जुनी पेंटिंग होती. छतावर व इतरत्र सुंदर जुनी पेंटिंग होती. (मी काहींचे स्केच केले) सर्वांचे शक्य झाले नाही. ती देवळे रस्ता रुंदी अगर वादळात पडूनही गेली अगर गावकऱ्यांनी जिर्णोद्धाराच्या नावाखाली जुने नष्ट करून सिमेंटच्या भिंती बांधून ती सारी जुनी चित्रकलाच नष्ट केली. तसेच लाकडी व दगडी खांबांचीही अवस्था झाली. ते सारे कुणी कुठे टाकले तेच कळत नाही. असा हा सारा प्रकार महाराष्ट्रभर सर्वत्र पहावयास मिळतो. ही सारी जबाबदारी त्या गावातील शिक्षकांना, विद्यार्थ्यांना कलाशिक्षकांना समजावून देण्याची शिक्षणातून मागील अनेक वर्षात जर सोय असती तर त्यांना याचे महत्त्व नक्की कळले असते. व

अशी दुर्दैवी वासलात झाली नसती. आणि मग श्री. सडवेलकर म्हणतात त्याप्रमाणे दृक्कलांचा नष्ट होत गेलेला भाग इतरत्र थोडा तरी जतन करता आला असता. असे रसिक हो ! तुम्हालही वाटत नाही कां ?


आजची आमची शिक्षण पद्धती. कला शिक्षणाची व्यवस्था असणार स्कूल ऑफ आर्टस् यात आपल्याला इतिहासाबद्दल विशेषत: चित्रकलेच्या, शिल्पकलेच्या इतिहासाबाबतचा अभ्यास व विचार मुळीच करताना दिसत नाही. गेल्या दोन तीन पिढ्यात जे चित्रकार व चित्रकला शिक्षक निर्माण झाले त्यांनी चित्रे काढण्यापलीकडे व जरुर ते परीक्षेचे, चित्रकलेचे शिक्षण देण्यापलीकडे कांहीही केलेले नाही. तिथे वाडवाडलांच्या वेळचे कांही जतन करावे असे वाटणार तरी कसे. तरीही निदान विचारवंतांनी, रसिकांनी तरी कांही चर्चा उहापोह करुन या कलेच्या जपणूकीबाबत उपाय योजना ठरवावी म्हणून हा लेखन प्रपंच.

व्ही. सिन्नरकर
'सूर्यकिरण', हाऊ. सो. नौपाडा, ठाणे २
दूरध्वनी : ५४० ०२२२

•••



पुरातन वास्तू- वाडे मंदिरे यांतील ही भिंती चित्र.



वाड्याच्या दरवाजावरील हत्ती वैभव.

जुने वाडे, मंदिरे यातील भिंतीवरील ही दुर्मिळ चित्रे.



सेनापती



योद्धा

कपट करुन किंवा फसवून संपत्ती मिळवणे म्हणजे फुटलेल्या मडक्यात पाणी साचविण्याचा प्रयत्न करणे.

# श्री. नारायण काळे

**दीपाली ज. भाटकर**

*(प्रदीप वाचनालय चालविणारे श्री. नारायण काळे यांच्या वाचन प्रसाराच्या समाविष्ट सेवेच्या मुदतीला २५ वर्षे पूर्ण झाली. २५ वर्षे सातत्याने वाचनालय चालविण्याच्या श्री. काळे यांच्या भेटीतून तयार झालेला हा लेख - संपादक)*

स्वतःची वाचनाची आवड पूर्ण करताना इतरांमधेही वाचनाची आवड निर्माण करणे आवश्यक आहे. या एका छोट्याशा परंतु महत्त्वपूर्ण सामाजिक जाणीवेतून निर्माण झालेले एक छोटेखानी ग्रंथसंग्रहालय श्री. नारायण काळे यांच्या प्रयत्नातून साकार झाले त्याला १ ऑक्टोबर १९९९ ला २५ वर्षे पूर्ण झाली. त्याची ही छोटीशी कहाणी.



श्री. नारायण काळे

ठाण्याच्या पाचपाखाडी विभागातील प्रदीप सोसायटीत श्री. नारायण काळे यांचे गेल्या तीस वर्षापासूनचे वास्तव्य आहे. भाभा अॅटोमिक रिसर्च सेंटर मध्ये आर्किटेक्ट म्हणून नोकरीत असताना देखील वाचनाची त्यांना भरपूर आवड. परंतु ती पूर्ण करण्यासाठी त्याकाळी जवळ कोठेही ग्रंथालय नव्हते. त्यांचा स्वतःजवळील ग्रंथ संग्रह अपुरा पडू लागला. याबाबतीत त्यांनी सोसायटीतील इतर रहिवाशांपाशी चौकशी केली असता ते वाचनाबाबत तितकेसे हौशी आढळले नाहीत. तेव्हा वाचनाबद्दल लोकांची अनास्था दूर करण्यासाठी कांहीतरी मार्ग शोधावा या उद्देशाने त्यानी त्याकाळी प्रसिद्ध असलेली मासिके सोसायटीतील रहिवाशांच्या मदतीने विकत घेऊन ती दि. १ ऑक्टोबर १९७४ पासून सभासदांना उपलब्ध करुन दिली. कारण त्यांच्या मते जितके वाचले जाईल तितकी वाचनाची आवड वाढत जाते आणि खरोखरच त्याचा प्रत्यय आला कारण जवळ जवळ १ $^{1}/_{2}$ वर्षातच ही योजना रहिवाशांमध्ये आवडली. केवल रु. ३/- वर्गणी मधून रु. ३००/- शिल्लक राहिले. त्यामधे रु. १/-ची वाढ करून रु. ५००/- जमल्यास त्याची पुस्तके खरेदी करावी असा प्रस्ताव त्यांनी सभासदांपुढे ठेवला तो निश्चितच सर्वांना आवडला व मार्च १९७६ पासुन वाचकांसाठी पुस्तके देखील उपलब्ध झाली. सोसायटीने पुस्तकांसाठी एक स्टोअररूम उपलब्ध करून दिली व एक कपाटही देणगीदाखल दिले. यानंतर श्री. काळे यांनी रहिवाशांना ग्रंथालयासाठी पुस्तके देणगी दाखल देण्याचे आवाहन केले. यासही चांगला प्रतिसाद मिळाला. अनेकांनी वाढदिवस, शुभकार्य या निमित्ताने तर कोण पुण्यस्मरण म्हणून पुस्तक देणगी दाखल दिली. तसेच आपली मित्रमंडळे स्नेहीसंबंधी यांनाही आवाहन केल्यानंतर श्रीमती शांता शेळके, श्री. कुमार केतकर या सारख्या मान्यवर मंडळींनीही हा उपक्रम आवडल्याने पुस्तके देणगी स्वरूपात दिली. अशा रीतीने ग्रंथसंग्रह वाढू लागल्याने त्यांनी हे ग्रंथालय ८ वर्षांनी सर्वांसाठी खुले केले. आज २५ वर्षांनी जवळ जवळ ३५०० पुस्तकांचा संग्रह झाला आहे.

---

गुरु तेथे ज्ञान, ज्ञान तेथे आत्मदर्शन, आत्मदर्शन तेथे समाधान असते.

आठवड्यातून २ वेळा (सोमवार, गुरुवार) हे ग्रंथालय सायंकाळी ७.०० ते ८.३० पर्यंत खुले असते.

ग्रंथालयासंबंधी खास प्रशिक्षण नसूनही श्री. काळे ग्रंथालयाचा सर्व कारभार स्वतः पाहतात. सर्व हिशेब चोख ठेऊन पुस्तके खरेदी करणे, त्यांची नोंद करणे, कव्हर घालणे, पुस्तकांच्या सर्वसाधारण प्रकाराप्रमाणे रचना करणे, देवघेव करणे इ. सर्व जबाबदाऱ्या ते स्वतःच पार पाडतात.

ग्रंथालयासाठी ग्रंथ मिळवताना कोणते निकष वापरले जातात यावर त्यांचे म्हणणे असे की प्रथम वाचकांची आवड लक्षात घेऊन, पुस्तक परीक्षणे वाचून पुस्तके घेतली जातात. परंतु वाचकांचे वाचन केवळ कथा, कादंबऱ्या पुरते मर्यादित राहू नये यासाठी काही नवीन वैचारिक माहितीपर वैशिष्ट्यपूर्ण पुस्तकेही घेतली जातात. परंतु सर्व मराठीभाषेचीच पुस्तके घेतली जातात. इंग्रजी पुस्तके देखील ठेवावी असा सल्ला त्यांना दिला जातो. पण मराठीच्याच प्रसाराचे त्यांना जास्त महत्त्व वाटते.

वाचकांच्या प्रतिसादाबद्दल विचारले असता ते म्हणतात, 'प्रतिसाद चांगला आहे. अगदी वसंत विहार ते ग्लॅक्सो वसाहतीतील लोकही ग्रंथालयास भेट देतात. जास्त वाचक हे ४०-५० वयोगटातील आहेत. तरुण वर्गाची संख्या खूप कमी आहे. व ती कशी वाढवता येईल या दृष्टीने त्यांचे प्रयत्नही सुरू आहेत.

या ग्रंथालयाचे म्हणून खास असे वैशिष्ट्य म्हणजे वर्षाला फक्त रु. ११०/- वर्गणी भरून तुम्हाला सभासद होता येते व प्रत्येकाला अगदी सात-आठ (आठ-दहा) पुस्तके एका वेळी हवी असल्यास दिली जातात. उद्देश हाच की प्रत्येकाने वाचले पाहिजे. घरातल्या इतर सदस्यांनाही वाचायला मिळाले पाहिजे. श्री. काळे प्रत्येकाशी वाचन विषयावर चर्चा करतात. प्रत्येकाला मार्गदर्शन करतात. वाचनाचे महत्त्व पटवून देतात. इतकेच काय तर स्वतः देखील वाचकांना पुस्तके नेऊन देतात. वाचकांना पुस्तके परत करण्यासाठी वेळेचे दिवसाचे बंधन नाही पण यातून कोणाचे नुकसानही होत नाही कारण त्यांनी वाचकांचे दूरध्वनी रजिस्टरमधे टिपून ठेवलेले असतात. जर इतर कोणाल तेच पुस्तक तातडीने हवे असेल तर तसे श्री काळे स्वतः फोन करून कळवतात. त्याचा विश्वास असा की, ' ज्या व्यक्तीचे पुस्तकावर प्रेम आहे. त्या व्यक्ती इतर वाचकांची किंवा ग्रंथालयाची फसवणूक किंवा अडवणूक करत नाही.'' मला वाटते हा वाचक वर्ग काळे यांनी स्वतः निर्माण केला आहे. त्यांनीच वाचकांच्या मनात ही आवड निर्माण केली आहे. त्यामुळेच ते इतके विश्वासाने वाचकांना अशी सेवा पुरवू शकतात.

तसेच जर कोणा व्यक्तीला एका विशिष्ट पुस्तकाची गरज आहे व ते या ग्रंथालयात उपलब्ध आहे किंवा कोणी प्रबंध वगैरे लिहिणाऱ्या व्यक्ती मग त्या सभासद किंवा वर्गणीदार नसतील तरी त्यांना देखील ग्रंथालयातील पुस्तके दिली जातात. हेतू हाच की पुस्तकांचा उपयोग झाला पाहिजे. ती कपाटात पडून काय उपयोग ? आणि वाचकाचे ही पूर्ण समाधान झाले पाहिजे.

श्री. काळे म्हणतात आपण टी.व्ही. वगैरे पाहून जी माहिती मिळवतो त्या पेक्षा जे वाचतो ते वाचन आपल्या मेंदूत कायमस्वरूपी कोठेतरी नोंदले जाते.

ग्रंथालयाचे काम सांभाळत असतानाच त्यांनी एक नवीन उपक्रम सुरू केला आहे. तो म्हणजे 'वाचक चर्चा' या मध्ये ८/१० वाचनाची आवड असलेल्या व्यक्ती एकत्र जमतात. प्रत्येकाने आपण केलेल्या वाचनाबद्दल बोलायचे. काय आवडले काय आवडले नाही इ. कधी कधी एखादा लेखक व त्याची पुस्तके असे ठरवले जाते. चर्चा करायची त्यामुळे अनेकदा नवीन नवीन लेखांविषयी माहिती मिळते. इतरांची मते समजतात. त्यादृष्टीने विचारचक्र सुरु होते. आणखी महत्वाचे म्हणजे आपल्याला इतरांसमोर बोलायचे धाडस प्राप्त होते. यामधूनच वक्तृत्व सुधारता येते. कारण

समोरचा श्रोता ही आपल्यासारखाच वाचक असतो. हा उपक्रम सध्या कोणाही एकाच्या घरी आयोजित केला जातो. परंतु याचा विस्तार करून किंवा त्यात अजून काही सुधारणा करण्याचा श्री. काळे यांचा विचार आहे.

या ग्रंथालयाला १ ऑक्टोबर १९९९ रोजी २५ वर्षे पूर्ण झाली त्या निमित्ताने २ ऑक्टोबर रोजी एक कार्यक्रम आयोजित केला गेला. आधीच सांगितल्याप्रमाणे श्री. काळे यांचा मुख्य उद्देश तरुणवाचक वर्ग तयार करणे हा आहे. त्यांच्या मते याच पिढीवर वाचन संस्कार झाला तर तो पुढच्या पिढीपर्यंत टिकेल.

कोणताही वैयक्तिक स्वार्थ नसतांना 'वाचन संस्कार'' वाढला पाहिजे या एकाच ध्यासाने केलेले श्री. काळे यांचे कार्य खरोखरीच मोलाचे आहे. या कार्यासाठी सोसायटीने केलेल्या सहकार्याचा ते प्रामुख्याने उल्लेख करतात. सोसायटीने दिलेली जागा व रहिवाशांनी स्वतः घरातील नूतनीकरण करतांना नको असलेली कपाटे, मांडण्या याना कमी पैशात खरेदी करून त्यांची डागडुजी करून त्याचा खूप छान उपयोग पुस्तकांसाठी करून घेतला आहे.

प्रत्येक वाचन प्रेमी, ग्रंथ प्रेमीने आवर्जून या 'प्रदीप वाचनालयास' भेट दिली पाहिजे.

दीपाली ज. भाटकर
व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था,
ठाणे महाविद्यालय परिसर, ठाणे
दूरध्वनी : ५३६ ४४ १२

•••




'तु माझा मी तुझा' हे रक्ताच्या नात्याशिवाय अनुभवायला मिळत नाही.

# रायगड हेच सर्वस्व असणारे सुरेश वाडकर

श्री. यतिन औक

*डोंबिवलीतील एक दुर्गप्रेमी श्री. सुरेश वाडकर यांच्या रायगड प्रेमाची माहिती या लेखात संक्षिप्त स्वरूपात दिली आहे. गिर्यारोहक तरुणांना आदर्श वाटावा असा वसा वाडकरांनी जोपासला आहे. - संपादक*

श्रीमंतयोगी शिवाजीमहाराजांच्या व्यक्तिमत्वाची भुरळ आज महाराष्ट्रातल्या प्रत्येक माणसाला आहे. शिवाजीमहाराज आणि त्यांचे चरित्र, गड, किल्लेकोट आणि त्यांचे राजकारण ही महाराष्ट्राची अस्मिता आहे.

अशाच एका महाराष्ट्राच्या शिलेदाराची ही माहिती जो राजांच्या गडांच्या प्रेमात पडलाय आणि नुसताच प्रेमात पडलाय असे नाही तर त्याने १००० वेळा रायगडावर पदभ्रमण करण्याचा संकल्प सोडलेला आहे. असे ते शिलेदार आहेत श्री. सुरेश वाडकर त्यांची ही संक्षिप्त ओळख.

निसर्गमित्र, उत्कृष्ट छायाचित्रकार, कविताकार आणि गडांचा राजा रायगडाला आपल्या जवळचा सखा-सोबती मानणारे श्री. सुरेश वाडकर यांचा जन्म रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या कोंझर या गावी झाला. लहानपणापासून रायगडाविषयी कुतूहल असल्यामुळे त्यांनी वयाच्या ११व्या वर्षी रायगड प्रथम सर केला. नंतर पुढे एच्.एस्.सी. झाल्यानंतर क्लरकेम कंपनीत नोकरीला लागले. परंतु त्यांचे मन मात्र रायगडावरच फिरत होते.

१९९० साली रायगडावर जात असताना त्यांच्याबरोबर यवतमाळचे कुटुंब होते आणि रायगड चढल्यावर त्या कुटुंबातील सदस्यांना एवढे चढून आल्यावर फक्त मोठमोठे दगडधोंडे पाहिल्यासारखे वाटले. हे ऐकून श्री. सुरेश वाडकर यांना खूप दुःख झाले. हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडावर नुसते दगडधोंडे नसून ती एक पवित्र वास्तू आहे. रायगडाबद्दलची लोकांच्या मनात जागृती निर्माण करायचे त्यांनी ठरविले. त्यानुसार आतापर्यंत चारशे चार वेळा रायगडावर पदभ्रमण करताना अठरा हजार त्रेचाळीस दुर्गप्रेमींना रायगडाचे विनामूल्य आणि मार्मिक स्वरूपात त्यांनी दर्शन घडविले.

३१ डिसेंबर १९९५ साली श्री. बाबासाहेब पुरंदरे यांचे मानसपुत्र श्री. विद्याधर रायरीकर यांनी रायगडच्या बालेकिल्ल्यावर श्री. सुरेश वाडकर यांचे गुरु व महाराष्ट्राचे लाडके दैवत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्याशी श्री. सुरेश वाडकर यांचे गाठभेट घालून दिली. हा क्षण त्यांच्या आयुष्यातील मणिकांचन योगच होता. नंतर रायगडच्या प्रत्येक भेटीत येणाऱ्या शंकांचे तसेच अडचणींचे निरसन करण्यात त्यांना त्यांच्या गुरुंची म्हणजेच शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदरे, श्री. अप्पा परब यांची खूप मदत झाली.

आजवरच्या रायगड प्रवासात गडाच्या ऐतिहासिक मूल्यांचा अभ्यास करता करता वेगवेगळ्या मोसमातील रायगडाचे मनमोहक स्वरूप, तेथील विषारी औषधी वनस्पती तसेच वेगवेगळ्या प्रकारचे साप व प्राणी त्याचप्रमाणे सुंदर सुंदर पक्षी यांचा अभ्यास करून त्यांची तपशीलवार टिपणे त्यांनी ठेवली आहेत. त्यामुळेच वेगवेगळ्या पक्ष्यांचे आवाज काढून त्यांनी अनेक पक्ष्यांशी जवळीक साधली आहे. गोगीपक्ष्यासारखे सोबती त्यांना लाभल्यामुळे रायगडावर त्यांना कधीच एकटे वाटत नाही. या सर्व पक्षी, प्राणी, वनस्पती यांची माहिती स्वतःपुरती

सीमित न ठेवता महाराष्ट्राच्या विविध प्रांतातील दुर्गप्रेमींपर्यंत अव्याहत पोचविली.

वारसे चार रायगड भेटीत कुष्ठरोगी पिडीत संस्था, कल्याण यांच्याबरोबरची भेट त्यांच्या मते सर्वात अविस्मरणीय होती. समाजाने ज्या मुलांना दुर्लक्षित केले आहे अशा कुष्ठरोगी मुलांना रायगडदर्शन घडवून आणणे हा त्यांच्यासाठी एक आगळावेगळा अनुभव ठरला. दिनांक ७ जून ९८ हा शिवराज्याभिषेक दिन याच दिवशी ३२५ वे शिवराज शक प्रारंभ झाले. व हेच औचित्य साधून श्री. सुरेश वाडकर यांनी ३७५ वी विक्रमी भेट पूर्ण केली होती. व या भेटीच्या वेळी त्यांचा शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी रायगडावर छोटासा सत्कार केला होता. ही भेट सुद्धा त्यांच्या आयुष्यातील लक्षात रहाण्यासारखी भेट होती.

रायगडावर जिवापाड प्रेम करणारे श्री. सुरेश वाडकर वर्षातून ३० ते ३५ वेळा रायगडावर जातात. रायगडावर एवढे प्रेम करुनही त्यांना राजगड मनात खूप भावतो आणि म्हणूनच वर्षातून कमीत कमी ४-५ वेळा ते राजगडावर जाऊन येतात.

टकमक टोकाचे १००० फुटाचे प्रस्तरारोहण, हिरकणी बुरूज कोणताही आधार न घेता चढणे व उतरणे गडाच्या दक्षिण बाजूला असलेल्या वाघ दरवाजातून ३०० फुटांची दरी उतरणे. पैज लावून रायगड आठ (८) मिनिटात उतरणे हे त्यांचे काही आवडते छंद व हे छंद जोपासण्यासाठी स्थानिक धनगर समाजातील श्री. रामचंद्र आवकीरकर यांची खूप मदत त्यांना झाली.

रायगडावर जास्तीत जास्त सोयीसुविधा करता याव्यात तसेच रायगडाबद्दल व्याख्याने देता यावीत, रायगडावरच्या पुराण अवशेषांचे रक्षण करता यावे म्हणून डोंबिवलीतील श्री. सुरेंद्र वाजपेई, डॉ. अरुण पाटील, श्री. सुधीर जोगळेकर यांच्या मदतीने गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर १८ मार्च १९९९ रोजी त्यांनी "रायगड मित्र मंडळाची" स्थापना केली व त्यायोगे रायगडावर स्वच्छता मोहीम, हिंदू संस्कृतीची ओळख असे अनेक उपक्रम त्यांनी सुरु केले. श्री. सुनील वालावलकर यांच्या प्रयत्नांमुळे त्यांच्या १००० वेळा रायगड भेटीचा प्रचार कॅनडात झाला. आतापर्यंतच्या रायगडभेटीत ५०००हून अधिक छायाचित्र काढून त्यांची अनेक वेळा प्रदर्शने भरविली.

कुठल्याही प्रकारच्या अर्थसंस्थांशी निगडीत न रहाता केवळ रायगडावरच्या असलेल्या आपुलकीमुळेच जवळ जवळ २ लाख ९० हजार रुपये खर्च करणारा महाराष्ट्रात खरोखर एखादाच सुरेश वाडकर जन्माला येतो.

**यतीन ओक**
तृतीय वर्ष (विज्ञान), बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.

•••

*With Best Compliments from*

STEEL TUBE ENGINEERING CO.

&

SHREEJI INDUSTRIES

**Mumbai.**

# गझल गायन आणि मी

श्री. अनिरुद्ध जोशी

शब्दांकन : श्री. रवींद्र मांजरेकर

*(विद्याप्रसारक मंडळाच्या संस्थामधून सुरुवातीचे शिक्षण घेऊन, गझल गायक म्हणून आज सर्वज्ञात झालेले अनिरुद्ध जोशी यांची ओळख या व्यक्ती लेखात करून दिलेली आहे. गझल गायन या वेगळ्या क्षेत्रात आज त्यांनी जो लौकिक प्राप्त केला आहे त्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे - संपादक)*

दिल्ली स्थित ऑल इंडिया अचिव्हर्स कॉन्फरन्सने आपल्या मिलेनियम अचिव्हमेंट संगीत पुरस्कारासाठी गझल गायक श्री. अनिरुद्ध जोशी यांची निवड केली आहे ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात झालेल्या एका कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार समारंभपूर्वक देण्यात आला. सिव्हिल इंजिनिअर असणारे अनिरुद्ध जोशी भारत सहकारी बँकेचे एक संचालकही आहेत. या सारख्या अनेक जबाबदाऱ्या अंगावर असतानाही त्यांनी गझल गायनाकडे दुर्लक्ष केलेले नाही. 'गीत-गझल उत्सव' हा त्यांचा कार्यक्रम ५००व्या प्रयोगाकडे वेगाने वाटचाल करीत आहे. 'संगीत' हीच माझी सर्वात आवडती गोष्ट आहे. असे ते आवर्जून म्हणतात. या पुरस्काराच्या निमित्ताने त्यांच्याशी बातचीत करण्याचा योग आला.



श्री. अनिरुद्ध जोशी

गझल आणि इतर प्रकारची गाणी यातील फरक स्पष्ट करताना ते म्हणतात, गझल हा वेगळा काव्यप्रकार आहे, म्हणूनच त्याची काही पथ्ये आहेत. दोन ओळींचा 'शेर' या पद्धतीत गझलची मांडणी असते. भावगीत आणि गझल यांच्यात मुख्यत्वे दोन फरक आहेत. एकतर भावगीतातील विषय एकच असतो. गझल मध्ये तसे बंधन नसते. विषय एकच असेल तर तो सांगण्याची घाटणी वेगळी असते. अनेकदा एका शेरमध्येच विषय समाविष्ट असतो. दुसरे म्हणजे, भावगीतकार हा एकच असतो. गझलमध्ये एखाद्या शायराची कल्पना आवडली तर इतरही शायर त्यात आपल्या रचना जोडत असतात. त्यामुळे एखादी गझल ही ९०-९० अंतऱ्याची असू शकते. अर्थात एखादी गझल हे उत्तम भावगीत होऊ शकेल, पण भावगीत हे गझल असेलच असे नाही.

गझलकडे कसे वळलात ? या प्रश्नावर ते म्हणाले, 'साहित्य' हा माझा आवडता प्रांत आहे. त्यातही 'कविता' मला अधिक जवळच्या वाटतात. शिवाय गायक म्हणून गाताना काय 'सूट' होऊ शकेल याचा विचार केल्यावर मला गझल अधिक योग्य वाटली. गझल गाताना, ती संपूर्णपणे समजावून घ्यावी लागते, त्याचप्रमाणे आवाजात खर्ज (बेस) आणि गोडवा (सॉफ्टनेस) हवा. या दोन्ही कसोट्यांवर मी उतरलो आणि म्हणूनच गझलकडे वळलो.

सुरुवातीला मी मेंहदी हसन, जगजित सिंग, गुलाम

प्रार्थनेने अंतःकरणातील सूक्ष्म शक्ती जागृत होते.

अली ह्यांच्या रचना ऐकल्या. त्या मला आवडल्या आणि आपण गाऊ शकू असा विश्वास वाटला, म्हणून मग हा प्रकार शिकलो. दरम्यानच्या काळात एक घटना घडली. आंतर महाविद्यालयीन स्पर्धेमध्ये सुमारे दीडशे स्पर्धकांमधून मला प्रथम क्रमांक मिळाला. त्या स्पर्धेत संगीतकार श्रीकांत ठाकरे परीक्षक होते. त्यांनी माझी चौकशी केली. मी कुठे शिकत नाही हे समजल्यावर ते म्हणाले, मला तुम्हाला शिकवायला आवडेल. मी तात्काळ होकार दिला. तेव्हापासून मात्र माझे गझलचे पद्धतशीर शिक्षण सुरु झाले.

गझलचे कार्यक्रम करताना मला अनेक अनुभव मिळत गेले. मराठी गझल हा प्रकार रुजायला अजून वेळ आहे. सुगम संगीताच्या प्रमाणात गझलच्या मैफली कमी होतात. उर्दू गझल मध्ये मात्र विविध प्रकार आहेत. विषयांप्रमाणे त्यांची घाटणी वेगवेगळी असते. भावनांच्या आविष्कारा मध्ये हे वैविध्य गायकाला आणावे लागते. शायर हा काहीतरी सांगतच असतो. गायकाला ते रसिकांपर्यंत समर्थपणे पोहोचवता आले पाहिजे. गझल मध्ये केवळ 'प्रेम' हाच विषय असतो, हा गैरसमज आहे. वास्तविक ईश्वर, देश, आई या विषयांवरही अनेक चांगल्या गझला आहेत.

सुमारे ४७५ कार्यक्रम केल्यानंतर श्रोत्यांसंदर्भातलेही विविध अनुभव मला आले. अमराठी भाषिक श्रोत्यांसमोर गाताना त्यांना सतत नवीन हवे असते, हे जाणवू लागले आहे. उर्दू शब्दोच्चार, गझलची अनुभूती श्रोत्याला आणून देणे हे फार महत्त्वाचे मानले जाते.

हिंदी रसिक नवीन मागत असतो. 'मराठी' रसिक मात्र सहसा नवीन ऐकायला तयार होत नाहीत. लोकांना वेगळे हवे असते. कदाचित ते मिळत नाही म्हणूनच ते जुन्याची मागणी करत असावेत. अनेक श्रोते कार्यक्रमानंतर 'खजिना सापडला' अशा आशयाचा आनंद व्यक्त करतात. एका कार्यक्रमात माझी ओळख करून देताना, हिंदी गायक असूनही मराठी गाणी म्हणू शकतात असे म्हटले गेले. हा प्रतिसाद माझ्या अधिक स्मरणात राहिला आहे.

मराठी रसिकांमध्ये गझल अधिक मान्यताप्राप्त व्हावी म्हणून मी माझ्या कार्यक्रमात काही प्रयोग करीत असतो. मुळातच मी कार्यक्रमातून सादर करता येईल अशाच रचना निवडतो. त्या अधिक आकर्षक असतील. तर मराठी रसिकांना आवडतात. शिवाय गझलकार काय म्हणतो, त्याची चाल कशी आहे, मांडणी, विचार या मध्ये काही नावीन्य आहे का ? ह्या गोष्टींचा आधी आढावा घेतो. मराठी रसिकांसमोर गात असेल तर उर्दू शब्दांचा अर्थ, उदाहरण सांगतो. मला रेकॉर्डिंगपेक्षा कार्यक्रम अधिक आनंदित करतात. माझा ओढा कार्यक्रमांकडेच असल्याने मला त्यावर जास्त मेहनत करता येते.

भारतातल्या सर्वच प्रमुख शहरांबरोबर सिंगापूर येथेही माझे कार्यक्रम झाले आहेत. विशेष लक्षात राहिलेले कार्यक्रम म्हणजे गांधी जयंती निमित्त राजभवनावर 'भजनांचा' कार्यक्रम झाला होता. तसेच ठाण्यामध्ये लता मंगेशकरांचा नागरी सत्कार करण्यात आला. त्या कार्यक्रमात मी गायलो होतो.

रेकॉर्डिंगचे सांगायचे झाले तर अनुराधा पौडवाल यांच्याबरोबर मी 'शेजारी-शेजारी' या चित्रपटांकरता विश्वास पाटणकरांच्या संगीत दिग्दर्शनाखाली गायलो, ते गाणे लोकप्रिय झाले. दूरदर्शनवरील शब्दांच्या पलीकडले या कार्यक्रमासाठी दत्ता डावजेकरांच्या संगीत दिग्दर्शनाखाली मी सुधीर मोघेंचे 'मित्रा' हे गाणे मध्यरात्री 'दोन' वाजता रेकॉर्ड केले. असे काही प्रसंग विशेष स्मरणात राहिले आहेत.

माझे ५०० कार्यक्रम पूर्ण करून १००० कार्यक्रमांचे ध्येय गाठणे हा माझा ध्यास आहे. माझी गझलची पहिली कॅसेट 'दिलो जान से' व्हिनस ने प्रकाशित केली होती. त्याचे संगीत श्रीकांतजींचेच आहे. शिवाय सुभाष

सावरकरांच्या 'नास्तिक' या आगामी चित्रपटासाठी मी संगीतकार विश्वास पाटणकर यांच्याकरता गाणे रेकॉर्ड केले आहे.

पं. विनायकराव काळे यांच्याकडे मी गेली २४ वर्षे गायन शिकत आहे. हा कधीही न संपणारा अभ्यासक्रम आहे. 'शिक्षण' ही अनंत काळ चालणारी गोष्ट आहे आणि गाण्याच्या बाबतीत तर ते अधिक जाणवते. या शिक्षणाचे प्रकार मात्र कालमानाप्रमाणे आणि अनुभवाप्रमाणे बदलू शकतात. गायक नेहमी तीन टप्प्यात शिकत असतो. सर्वप्रथम तो इतरांचे ऐकून शिकतो, मग त्याचे गुरूच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण सुरु होते आणि अनुभवाने, थोडीफार जाण आल्यावर तो इतरांना शिकवत असताना शिकतो. माझ्या संदर्भात सांगायचे झाले तर मी नुकतेच मार्गदर्शन सुरु केले आहे. मला शिकवायची भरपूर इच्छा आहे, त्यातून भरपूर नवीन शिकता येते.

१९९५ मध्ये श्री. वसंत साठे यांच्या हस्ते प्रियदर्शनी पुरस्कार, शिवाय शाळा, महाविद्यालय, आंतरमहाविद्यालय स्तरावर ३०च्या वर पारितोषिके प्राप्त झालेले श्री. अनिरुद्ध जोशी आकाशवाणी, दूरदर्शनचे मान्यताप्राप्त गायक आहेत. 'दिलो जानसे ' या त्यांच्या कॅसेटमधील 'दूर कोई रातभर गाता रहा' ही गझल सतत लोकप्रियतेच्या शिखरावर राहिली आहे. मराठी सुगम संगीताबरोबरच, गझल प्रकारामध्येही रसिकांना आश्वासक वाटणारा आवाज म्हणून श्री. अनिरुद्ध जोशीकडे पाहिले जात आहे. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी 'दिशा'च्या मनःपूर्वक शुभेच्छा.

संपर्कासाठी त्यांचा पत्ता पुढीलप्रमाणे :

श्री. अनिरुद्ध जोशी, 'नारायण भुवन' ब्राह्मण सोसायटी, ठाणे ४०० ६०२.

**श्री.रवींद्र मांजरेकर**

'स्मृती' विष्णूनगर, नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

•••



"चार पैसे कमवायला गेले दरवर्षीप्रमाणे प्रश्नपत्रिका आगाऊ विकून. पण बोर्डानं ऐनवेळी प्रश्नपत्रिकाच बदलली, त्याला हे काय करणार ? पण गिऱ्हाईकं जी भडकली."

पाप असा सुंदर पोशाख घालून येते की, ते पाप आहे हे माहीत असूनही मनुष्य त्याला कवटाळतो.

# ''व्यक्तिमत्त्व -विकासासाठी कलेची उपासना''

डॉ. अशोक जी. जोशी

*(व्यक्तिमत्त्वाच्या विकासास अनेक बाबी कारणीभूत ठरतात. कला ही अशीच एक महत्त्वाची बाब आहे. तिचे व्यक्तिमत्त्व विकासात असणारे स्थान कोणते याचा वेध सदर लेखात घेतला आहे. - संपादक)*

मानवाच्या बहुतेक सर्व क्रिया स्वसंरक्षण आणि वंशवर्धन या जीवशास्त्रीय हेतूंशी संबंधित असतात. मात्र काही क्रिया या अगदी भिन्न असतात. या क्रियांमध्ये मानवाला एक अपूर्व असा आनंद मिळतो आणि येथेच मानवाचा कलाव्यवहार सुरु होतो. आपल्या जीवनामध्ये कलेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कला या शब्दाचा मूळ अर्थ कोणतीही कौशल्यपूर्ण क्रिया असा आहे. कला या शब्दाला समानार्थी असलेला इंग्रजी शब्द आर्ट, हा मूळचा ars या लॅटीन शब्दापासून तयार झाला आहे. या शब्दाचा अर्थ कौशल्यपूर्ण कृती असा होतो. या दृष्टीकोनातून पाहता जीवनातील कोणताही ज्ञानात्मक अथवा क्रियात्मक व्यवहार जर कौशल्यपूर्ण असेल तर त्याला कला असे म्हणावे लागते.

या दृष्टीने आपण आपल्या व्यक्तिमत्त्वामध्ये कोणत्या गोष्टींची भर घालू शकतो याचा आपण विचार केला पाहिजे. आपल्यामध्ये अनेक गुण असतात. त्यातील काही महत्त्वाचे गुण ओळखून एका विशिष्ट शिस्तीमध्ये पद्धतशीरपणे त्या गुणांचा विकास करण्यासाठी आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे.

निसर्गतः झाडे कशीही वाढतात. पण त्या झाडांची विशिष्ट पद्धतीने रचना करून आकर्षक उद्यान निर्माण करणे ही एका अर्थाने वनस्पतींची कलात्मक मांडणीच असते. कशाला, आपल्या डोक्यावरचे साधे केस हे सुद्धा वाढतील तसे वाढू देणे आपल्याला मान्य नसते. आपण त्यांची विशिष्ट रचना करतो व आकर्षक दिसण्याचा प्रयत्न करतो. कोणतीही कला ही सौंदर्य निर्माण करते. कलांमुळे आपले जीवन आनंदी व समाधानी बनते.

निसर्गतःच आपल्याला आवाज प्राप्त झालेला आहे. या आवाजाचा उपयोग आपण बोलण्यासाठी करत असतो. पण जेव्हा आपण हे बोलणे समुदायासमोर करतो व आपले म्हणणे इतरांना पटवून देण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा त्याला वक्तृत्वकला असे म्हटले जाते. व जो अधिक चांगल्या प्रकारे बोलू शकतो तेव्हा त्याला वक्तृत्वकला आत्मसात झाली आहे असे म्हटले जाते; बोलण्याचा सराव करुन पद्धतशीरपणे वक्तृत्वकला आत्मसात करता येऊ शकते.

आपल्यापैकी प्रत्येक जण केव्हाना केव्हा गाणे गुणगुणत असतो, पण जे आपल्या आवाजाला योग्य ती दिशा देऊन व गाण्याचा सराव करुन इतरांसमोर आपली गाणी सादर करतो तेव्हा त्या व्यक्तीने गायनकला आत्मसात केली आहे असे म्हटले जाते. याचाच अर्थ आपल्यातील नैसर्गिक गुणांना योग्य ते वळण लावून ते विकसित करणे याचा अर्थ ती कला आत्मसात करणे होय.

प्रत्येक कलेमुळे मनुष्याला मानसिक समाधान मिळत असते. मानसिकदृष्ट्या जर मनुष्य दुःखी, निराश, वैफल्यग्रस्त असेल तर त्याच्या व्यक्तिमत्त्वावर त्याचा फार विपरित परिणाम होतो. अविकसित व्यक्तिमत्त्वावर सुद्धा त्याचा फार विपरित परिणाम होतो. अविकसित व्यक्तीमत्त्व असे त्यास म्हणता येईल. कारण अशा स्थितीत तो आनंद

निर्माण करू शकत नाही किंवा पसरवू शकत नाही. मनुष्य जितका आनंदी प्रसन्न असेल तितका तो अधिक उत्साही बनतो. उत्साही असलेली व्यक्ती अधिक निर्मितीक्षम असते. निर्मितीक्षम व्यक्तींपासून सभोवतालच्या व्यक्तींना प्रेरणा मिळते व त्या प्रेरणेतून अनेक प्रसन्न, उत्साही व्यक्ती निर्माण करु शकतो. या सर्व गोष्टींचे मूळ म्हणजे मनुष्याचा कलात्मक विकास. यावरुन कलेचे किती महत्त्व आहे हे आपल्या लक्षात येईल. आता कला-विकास कसा करायचा? यासाठी सर्वप्रथम मनुष्याने आत्मपरीक्षण करुन स्वतःमधील गुणांना ओळखायला हवे. आपण मोठ मोठे चित्रकार वाद्यवादक किंवा संगीतकार बघतो किंवा एखादा चांगला वक्ता बघतो. या सर्वांनी चाणाक्षपणे स्वतःची क्षमता ओळखलेली असते व त्याची जिद्दीने कास धरुन तिला कलात्मक वळण दिलेले असते. देवाने प्रत्येकामध्येच काहीना काही वैशिष्ट्य दिलेले असते. ते ओळखून त्याचा विकास करणे म्हणजेच व्यक्तीमत्त्वविकास होय.

झाडांना जसे योग्य खतपाणी घातले असता त्यांची संपूर्ण वाढ होते, विकास होतो, त्याचप्रमाणे मानवाच्या विचारांना, गुणांना योग्य धार लावली असता ते तेजःपुंज दिसू लागतात. त्यांचा परिणाम व्यक्तिमत्त्वावर प्रभावीपणे होत असतो.

कलेमध्ये मनुष्य इतका रममाण होतो की त्याची दुःखे तो विसरुन जातो. जीवनात आनंद पसरतो. मन उल्हसित होते. आपल्या दैनंदिन जीवनातील खरा आनंद प्राप्त करु शकतो.

आज विविध क्षेत्रांमध्ये अनेक प्रकारच्या कला अस्तित्वात आहेत. मानवी जीवनात कलेचे स्थान किती मोठे आहे हे आपल्याला माहित आहे. मानवाला जर आपल्या व्यक्तिमत्वाचा खऱ्या अर्थाने विकास करायचा असेल तर एखादी तरी कला आत्मसात केलीच पाहिजे. एकापेक्षा अधिक कलादेखील आत्मसात करता येतात. कलाविष्कारामुळे मानवाचे व्यक्तिमत्त्व अधिक संपन्न व समर्थ होते. म्हणून आपण कोणती ना कोणती कला आत्मसात केले पाहिजे. काही महत्त्वाच्या कला पुढील प्रमाणे सांगता येतील.

नाट्यकला, नृत्यकला, गायनकला, वाद्यकला, चित्रकला, शिवणकला, रंगकला, वास्तूकला, शिल्पकला, लेखनकला, वक्तृत्वकला, वादविवादकला, संरक्षणकला भित्तिचित्रकला, मुद्रणकला, वाङ्मयकला, पाककला, केशरचनाकला, हस्तकला, वेशभूषाकला, भरतकामकला, विणकामकला, संगीतकला, व्यापार-वाणिज्यकला, आत्मसंरक्षणकला, उदा. ज्युडो, कराटे इत्यादी, पोहण्याची कला, धावण्याची कला, व्यायाम व मल्लविद्याकला, कीर्तन व प्रवचनकला.

वरील यादी खूप लांबवता येईल. मात्र नमुन्यादाखल काही कला येथे आपण लक्षात घेतल्या आहेत.

वरील विविध कलांपैकी आपण एखादी तरी कला आत्मसात करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. या बाबतीत आपण प्रथम आपली आवडनिवड लक्षात घ्यायला हवी व त्या बाबतीत विशेष प्रयत्न करावेत. उदा. आपल्याला वक्तृत्वकलेची आवड असल्यास आपण विविध मान्यवर वक्त्यांची भाषणे ऐकली पाहिजेत. तसेच जेव्हा संधी मिळेल तेव्हा चार लोकांसमोर आपले विचार व्यक्त केले पाहिजेत. वक्तृत्वकले संबंधी उपलब्ध असलेले वाङमय व पुस्तके वाचली पाहिजेत. कोणतीही कला ही नैसर्गिकरीत्या साध्य होत नाही. तर ती साध्य करण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतात.

जर आपल्याला काव्यकलेची आवड असेल म्हणजेच कविता रचण्याची आवड असेल तर त्या कलेत आपल्याला प्रगती कशी साधता येईल, याचा विचार केला पाहिजे. त्यासाठी आपल्या भाषेतील विविध मान्यवर

---

कोणतेही महान कार्य प्रथम दर्शनी अशक्य वाटते. सुरुवात करून, सातत्याने पाठपुरावा केल्यास ते पूर्ण होते.

कवींचे कविता संग्रह आपण मिळविले पाहिजे व त्यांचा तपशीलवारपणे अभ्यास केला पाहिजे. प्रत्येक कवीची काव्यशैली आपण लक्षात घेतली पाहिजे व अशा विविध शैलींचा तुलनात्मक अभ्यास करुन आपली शैली निश्चित केली पाहिजे. कवितेच्या क्षेत्रामध्ये सातत्याने अनेक घडामोडी घडत असतात. त्या सर्व घडामोडींकडे आपण बारकाईने लक्ष दिले पाहिजे.

आपल्याला जर चित्रकलेची आवड असेल व ती कला आपल्याला विकसित करायचे असेल तर चित्रकलेवर उपलब्ध असलेली विविध पुस्तके आपण वाचायला हवी. मुंबई पुण्यासारख्या शहरांमध्ये विविध प्रसिद्ध चित्रकारांची चित्रे प्रदर्शनामध्ये लावली जातात. ही प्रदर्शने आपण पहायला हवीत. तसेच चित्रकलेचे प्रशिक्षण देणारी जी शिबिरे भरतात त्या शिबिरामध्ये आपण सहभागी व्हायला हवे. काही मान्यवर चित्रकारांची ओळख करुन घेऊन त्यांच्या अनुभवांचा फायदा आपली चित्रकला विकसित करण्यासाठी कसा घेता येईल, याचा विचार करावा. अशा प्रकारे पद्धतशीर प्रयत्न केले तरच आपल्याला चित्रकला आत्मसात होऊ शकेल. अलीकडील काळात विविध कलांचे प्रशिक्षण देणारे खाजगी क्लासेस मोठ्या प्रमाणावर निघाले आहेत. यांपैकी एखादा क्लास करुन आपण आपल्याला हवी ती कला आत्मसात करुन विकसित केली तर आपल्या व्यक्तिमत्वविकासासाठी त्याचा नक्कीच फायदा होतो.

डॉ. अशोक जोशी
पर्सोनल मॅनेजर, जे के फाईल्स व टूल्स, जेके ग्राम,
ठाणे ४०० ६०६.
दूरध्वनीः ५३४ ११५८

• • •



# भाऊ पडसलगीकर -
# राष्ट्रीय बुद्धिबळ खेळाडू, शिक्षक व संघटक

*( बुद्धिबळ या खेळाचे जाणकार व शिक्षक भाऊ पडसलगीकर यांना आमचे विद्यार्थी भेटले. त्यांच्या या भेटीत झालेली मुलाखत येथे देत आहोत- संपादक )*

**प्रश्न :** ह्या खेळाची सुरुवात कुठे झाली ? व त्या मागचा हेतू काय ?

**उत्तर :** हा खेळ भारतात सुरु झाला. देवी मंदोदरी यांनी तो सुरु केला. अशी दंतकथा आहे. हा बैठा खेळ असून याला वयाचे व वेळेचे बंधन नसते. पटावर आपला राजा सुरक्षित स्थळी ठेवून प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्याचे समाधान बुद्धिबळ ह्या खेळाने मिळते.

**प्रश्न :** काळानुसार खेळाबद्दलच्या विचारात, पद्धतीत बदल झालाय का ?

**उत्तर :** होय, पूर्वी हा खेळ लहान मुलांना खेळायला देत नसत. हा खेळ अतिशय नादिष्ट असल्याने वेळ फार जातो. त्यामुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊ नये म्हणून मुलांना बुद्धिबळापासून दूरच ठेवत. पण आता परिस्थिती पूर्णतः वेगळी आहे.



श्री. भाऊ पडसलगीकर,
बुद्धिबळातील चाल खेळताना

आता खेळाच्या पद्धती बद्दल - पूर्वी बुद्धिबळात फक्त राजा, वजीर व दोन्ही हत्तींच्या पुढची प्यादी दोन पावले चालू शकत व उंट, घोडा यापुढची प्यादी फक्त एक घर चालत. आजचा डाव हा जागतिक पद्धतीचा आहे. तो F.I.D.E. नियमानुसार खेळला जातो.

**प्रश्न :** तुम्हाला ह्या खेळाची गोडी कशी लागली ? तसेच या खेळात आपल्याला कोणाचे मार्गदर्शन मिळाले ?

**उत्तर :** घरात बुदिधबळाचे वातावरण होतेच. वडिल, आजोबा हा खेळ खूप छान खेळत रोज संध्याकाळी घरात खेळाचा पट मांडला जात असे. तेंव्हा मला खेळ बघण्याची परवानगी नव्हती. पण रक्तात खेळ वंशपरंपरेने आल्याने मी डावचोरुन बघत असे, निरीक्षण करत असे आणि त्यातूनच ह्या खेळाचा चांगला पाया रचला गेला.

मार्गदर्शक म्हणाल तर पुस्तकच माझा मार्गदर्शक. कारण पूर्वी काही आतासारखे क्लास किंवा क्लब नसत. घरात खेळ बघायलाही बंदी होती. शिकवणार कोण ? मी खेळ बघून, निरीक्षण करून शिकलो. प्रत्यक्ष खेळून, म्हणजे माळ्यावर कोनाड्यात खेळाचा पट मांडून, त्याचा अभ्यास करत शिकलो. वडिलांची पुस्तक (खेळांवरची) त्यांच्या नकळत नेऊन त्यातील चालीनुसार शिकत गेलो. त्यामुळे खरा खेळ, विविध चाली पुस्तकातून शिकायला मिळाल्या. त्यातून आवडलेली काही पुस्तके -

1) My Best game of Chess-II 2) 1001 chess openings 3) Discovering chess theories 4) Starting chess 5) Simple chess tactics 6) Simple

---

जो शील सांभाळू शकत नाही, त्याच्या जवळ धर्म, सत्य, शक्ती व लक्ष्मी असू शकत नाही.

chess mates 7) Your first chess games 8) 1001 winning chess position.

प्रश्न : आपण किती जणांना बुद्धिबळ खेळ शिकवलात ? आपले खेळातील तत्त्व कोणते ?

उत्तर : जसजसे खेळात प्राविण्य प्राप्त केले, तसतसे मी मार्गदर्शन सुरु केले. खूप जणांना प्रशिक्षण दिले. संस्थेत जाऊन शिकवले तर कधी त्या मुलांच्याघरी जाऊनही शिकवले आहे. खेळातील माझी तीन तत्त्वे आहेत.

1) Safety of the King 2) Development of the Pieces 3) Progress of Pieces.

त्यांचे ठाम मत आहे के ज्याच्या मोहऱ्यांना हालचाल करण्यास जास्त जागा किंवा रिकामी घरे असतात तोच जिंकणार.

प्रश्न : खेळात आपले आदर्श कोण ?

१) श्री. विनायक खाडीलकर २) श्री. शास्त्रीबुवा फाटक

प्रश्न : आपल्याकडे शिकलेल्या काही नामांकित खेळाडूंची नावे सांगा ना.

१) भाग्यश्री साठे (ठिपसे)

२) स्वाती घाटे

३) पल्लवी शहा

४) जयश्री संकपाळ (कदम)

ह्या सर्वांनी परदेशात भारताचे प्रतिनिधित्व केले आहे.

प्रश्न : सर, बुद्धिबळ खेळात घड्याळाचे महत्त्व सांगाल का?

उत्तर : त्याचं काय आहे. ह्या खेळात पूर्वी वेळेचे बंधन नव्हते. कारण सर्व व्यवहार आरामात चालत. जग स्वस्थ-स्वस्थ होते. लोकांना खेळ खेळण्याकरता बराच वेळ मिळत असे. पण हल्लीचे जग धावपळीचे आहे. त्यामुळे तास न तास दिवस-दिवस वेळ खेळासाठी देणे आता शक्यच नाही. मग खेळातील संकल्पना पालटून पण दर्जा वाढवून खेळण्याच्या दृष्टीने घड्याळाचे महत्त्व वाढले. तुम्हांला माझ्या बाबतचा एक किस्सा सांगतो. माझी उत्कृष्ट कामगिरी काहींना रुचली नाही. ते म्हणू लागले की हे खूप वेळ लावतात खेळायला म्हणून ते जिंकतात. मला मात्र हे ऐकून वाईट वाटलं आणि मी ठरवलं की आपण घड्याळ बनवायच. आपल साध गजराच घड्याळ घेऊन, त्याचा अभ्यास करुन १९५० साली मी प्रथम देशी पद्धतीचे घड्याळ बनविले. कदाचित भारतातील ते पहिले बुद्धिबळासाठी घड्याळ असेल.

प्रश्न : सर, भारतातून पहिले कोण परदेशात जाऊन खेळले? तुम्ही कधी परदेशात खेळासंदर्भात गेलात का ?

उत्तर : भारतातून परदेशात गेलेला पहिला खेळाडू विनायक खाडिलकर. १९२४ मध्ये साऊथ पोल येथे स्पर्धेसाठी गेले होते. १९८७ साली मी सुद्धा काही मुलांना घेऊन रशियाला शिक्षक व व्यवस्थापक म्हणून होतो.

प्रश्न : आता संगणक आलाय, त्यावर खेळता येते तर संगणक खेळास खरच उपयोगी आहे का ?

उत्तर : हो. अतिशय उपयोगी पडेल. 'Chess Master 4000 Series' ही C.D. खेळ सुधारण्यास खूपच चांगली आहे. संगणक आपल्याला भारीच पडतो पण जर का त्यालाच विचारुन खेळत गेलात तर मग काहीच उपयोग नाही. बरेचदा संगणकालाच चाली विचारुन, माणूस विचार करण्याचे टाळतो. ते मात्र खेळास घातक आहे.

प्रश्न : सर, तुम्हांला पुरस्कार मिळालेले आहेत, त्याबद्दल सांगा.

उत्तर : उत्कृष्ट खेळ व प्रशिक्षण यामुळे खूप पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे.

१) शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार - १९९० - ९१

२) फाय फौंडेशन पुरस्कार - १९९१

३) दादोजी कोंडदेव पुरस्कार - १९९४-९५

प्रश्न : सर, आमच्या पिढीला तुम्ही काही मार्गदर्शन कराव.

उत्तर : हे पहा मुलांनो, हा खेळ गमतीचा खेळ नाही. खूप विचार व अभ्यास करायला लावणारा खेळ आहे. खेळ मग कोणताही असो प्रामाणिकपणा बाळगा व खेळा. मेहनत करा, खेळात एकाग्रता गरजेची आहे, ती वाढवा. मी एका वेळेला ३५ जणां बरोबर खेळू शकतो. प्रत्येकाबरोबरचा पट माझ्या डोक्यात असतो. ह्यास एकाग्रता हवी. ती तुमच्यात यायला हवी.

अमित पवार

वरुण लखन

वरुण टिपणीस

नचिकेत जोशी

अनिकेत गाडे

सुशांत खाडे

ए.के. जोशी हायस्कूल, ठाणे.

•••

## सन १९९८-९९ ची आदर्श शाळा
## सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्लिश मिडियम स्कूल, ठाणे

'रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ' ह्यांच्यातर्फे गेली तीन वर्षे आदर्श शाळेकरीता फिरता चषक सुरु करण्यात आला आहे. सन १९९८-९९ करीता सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्लिश मिडियम स्कूल ऑफ, ठाणे ह्या शाळेची निवड 'आदर्श शाळा' म्हणून निवड करण्यात आली आहे. निवड करताना खालील मुद्दे विचारात घेण्यात आले.

१) शैक्षणिक प्रगती २) विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास ३) स्वच्छता ४) एकंदर शिस्त

परीक्षकांनी शाळेला क्रिडांगण नसतानाही बैठ्या खेळांना (उदा. बुद्धीबळ, टेबल टेनिस, कॅरम इ.) प्राधान्य देऊन शालेय क्रीडा विभाग चालू ठेवल्याबद्दल विशेष कौतूक केले.

ह्यापूर्वी ठाण्याच्या सिंघानीया, हॉलीक्रॉस शाळेला हा चषक मिळाला होता.

दिनांक १ नोव्हेंबर १९९९ रोजी एका दर्जेदार समारंभात हा चषक देण्यात आला. ह्या यशामध्ये सिंहाचा वाटा मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांचा आहे. परंतु त्या मात्र याचे श्रेय आपल्या शिक्षिका व विद्यार्थी यांना देतात.

सौ. मनाली देवधर
सौ. ए.के.जोशी इंग्लिश मिडियम स्कूल, ठाणे.

# विधी शास्त्राचे शिक्षण - समस्या व उपाय

प्रा. स्मिता कर्वे

*(विधी शाखेतील शिक्षणाकडे पहाण्याचा उदासिन दृष्टिकोन या शाखेतील शिक्षणाचा दर्जा न उंचावल्याचे कारण आहे. त्या दृष्टिने लेखिका सौ. कर्वे यांनी येथे विचारमंथन केले आहे. - संपादक )*

शिक्षण ही संकल्पना व्यापक आहे. सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक, बौद्धिक, राजकीय व सांस्कृतिक अशा सर्व स्तरांवर सबळ बनविण्याच्या दृष्टीने शिक्षण हे उपयुक्त साधन आहे.

कायद्याचे अज्ञान ही सबब होऊ शकत नाही. (Ignorance of law is no excuse) हा सिद्धांत व्यवहार्य न्यायपद्धतीच्या दृष्टीकानातून भारतीय कायद्याचा व न्यायदानपद्धतीचा प्रमुख आधारस्तंभ आहे म्हणून इतर शिक्षणक्षेत्रांपेक्षा विधी शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे व आवश्यक असे आहे.

आजच्या सामाजिक जीवनात कायद्याचे महत्त्व वाढत आहे. कायदा सर्वस्पर्शी झाला आहे. प्रत्येक क्षेत्रात पदोपदी कायद्याशी संपर्क अपरिहार्य झाला आहे. एकेकाळी जे प्रश्न कायद्याच्या कक्षेबाहेर समजले जात होते ते प्रश्न आज न्यायालयासमोर उपस्थित केले जात आहेत. वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळविण्याबाबतचा प्रश्न असो, क्रिकेटच्या कसोटी संघातील निवडीचा असो, निवडणूकीतील प्रचारतंत्राचा असो अथवा अयोध्येतील राममंदिराचा प्रश्न असो हे प्रश्न न्यायालयीन प्रक्रियेद्वारे सोडविण्याकडे कल आढळतो. ग्राहक संरक्षण कायदा तर समाजातील सर्व स्तरातून मुक्त संचार करीत आहे.

विधीशिक्षण हे अत्यंत महत्वाचे असले तरी आज विधी शिक्षणाची एकंदर अवस्था उपेक्षितच आहे. विद्यापीठ आयोग, बार कौन्सिल, राज्यसरकार (आर्थिकदृष्ट्या) या सर्वांचीच भूमिका संदिग्ध आहे. विधी शिक्षणाचे दोन प्रमुख भाग १) प्राध्यापक २) विद्यार्थी जरी विचारात घेतले तरी बहुतांशी समस्यांचा विचार करता येईल.

प्राध्यापकांचा (विधी महाविद्यालयातील) विचार करताना सर्वप्रथम म्हणजे L.L.B. ही पदवी पदव्युत्तर असून विद्यापीठाच्या नियमात तशी धरली जाणार नाही म्हणून प्राध्यापकांच्या नेमणूकीसाठी L.L.M. आवश्यक आहे. पदवी तीन वर्षांची म्हणजेच इतर शिक्षणशाखेपेक्षा एक वर्ष अधिक आहे तसेच नंतर ही L.L.M. पदवी दोन वर्षाची म्हणजेच एकूण इतर शाखेपेक्षा ३ वर्षे अधिक शिक्षण घेऊन नेमणूक करताना इतर शाखेतील प्राध्यापकाच्या बरोबरीने नेमणूक करतात. त्यावर कळस म्हणजे नेट व सेट परीक्षा हे शुद्ध बौद्धिक पिळवणूक वाटते. वर उल्लेख केल्याप्रमाणे विधीशाखा ही विनाअनुदान असल्याने आम्हा प्राध्यापकांची अवस्था वेठबिगारीसारखी आहे. इथे असा प्रश्न उपस्थित होतो की प्राध्यापक अशा प्रतिकूल परिस्थितीत ज्ञानदानाचे कार्य प्रामाणिकपणे कसे करतात? यावर माझ्या एका मैत्रीणीची प्रतिक्रिया खूपच जळजळीत आहे. ती म्हणते, विधीमहाविद्यालय प्राध्यापकांवर चेटूक करते. अनुदानासाठी ९५साली सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय असूनसुद्धा मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत महाविद्यालयांच्या बाबतीत का अमंलात आणत नाहीत? हा एक प्रश्नच आहे. ते प्रकरण न्यायप्रविष्ट आहे असे म्हणतात. म्हणजे आम्ही आमच्या स्वत:च्याच आखाड्यात चारीमुंड्या चीत

---

महत्त्वाकांक्षाच्या लतेला पाणी घातल्याशिवाय यशाची मधुर फळे हाती लागत नाहीत. -रवींद्रनाथ टागोर

होण्यासारखे आहे. तसेच या L.L.M.पदवीला B+ (५५%) ग्रेड हवी ही अटही नक्की आहे का ? असा प्रश्न पडतो कारण काही महाविद्यालयात अशा नेमणूका होतात नेमणूका करताना शैक्षणिक पात्रता महत्त्वाची आहेच पण Trial lectures ची अट अत्यंत महत्त्वाची आहे. माझी नेमणूक याच पद्धतीने झाल्याने मला मनापासून पटली आहे. पण दुर्दैवाने आज अशा पद्धतीने नेमणूका होत नाहीत परिणामी विद्यार्थ्यांचे हाल होतात. म्हणून परत ती पद्धत सुरु करावी असे सुचवावेसे वाटते.

विद्यार्थ्यांच्या बाजूने विचार केल्यास पदवीपर्यंत परीक्षा ३ तासांची व प्रश्न ५ किंवा ६ सोडवावे लागतात. परंतु विधी शिक्षणात परीक्षा ३ तासांची पण प्रश्न ८ म्हणजे उपप्रश्न जास्तीचे म्हणून वेळेचा प्रश्न बऱ्याच विद्यार्थ्यांना पडतो. तसेच बऱ्याच ठिकाणी पदवी शिक्षणापर्यंत नोटस् विद्यार्थ्यांना मिळण्याची सवय झालेली असते. परंतु लगेच दुसऱ्या वर्षी (विधी शिक्षणाचे प्रथम वर्ष) ९० ते ९५% प्राध्यापक नोटस् देत नसल्याने विद्यार्थ्यांची कोंडी होते.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९९० या विधी अभ्यासक्रमानुसार (अहवाल) विधी शिक्षणाचे माध्यम हा त्रासदायक स्वरुपाचा प्रश्न आहे (खंड १ पृष्ठ५४) शिक्षणाचे माध्यम विचारात घेता विधीशिक्षणात अर्धवट प्रकार आढळतो. मुंबई विद्यापीठाने मराठीतून उत्तर पत्रिका लिहिण्यास मुभा दिली आहे. पण प्रश्नपत्रिका इंग्रजीतूनच मिळतात. तेव्हां हा धेडगुजरी प्रकार थांबवावा तसेच अशा उत्तरपत्रिका तपासनिस म्हणून मराठी भाषिकांचीच नेमणूक व्हावी. तसेच विद्यार्थ्यांना कायद्याचे प्रत्यक्ष शिक्षण मराठीतून द्यायला हवे. त्यासाठी महाविद्यालयात मराठी माध्यमाचा वेगळा वर्ग हवा. त्यासाठी वेगळा प्राध्यापक हवा. ग्रंथालयात त्यासाठी पुस्तकांची उपलब्धता करुन देण्यात यायला हवी. अनुवादित नको. मला असे वाटते की हे काम करण्यास अनेकजण उत्सुक आहेत तेंव्हा पुस्तकरुपी सामुग्री तयार करावयास अडचण येणार नाही. तसेच संस्कृतप्रचूर मराठी न वापरता मायबोलीच्या रुपात समावेश असावा.

आम्हा भारतीयांची अवस्था आज त्रिशंकुसारखी आहे. इंग्रजीवर प्रभुत्व नाही व मराठीवर स्वामित्व नाही. इंग्रजी बोलताना मराठी व मराठी बोलताना इंग्रजी शब्द आपण सर्रास वापरतो.

माणूस हा इतर प्राण्यापेक्षा एका बाबतीत वेगळा आहे ती बाब म्हणजे विचार करण्याची क्षमता. विचाराने आदान प्रदान करण्यास मातृभाषे इतका सोपा मार्ग नाही. इथे विज्ञान व कायदा यांचे शिक्षण, यांची गल्लत होऊ नये विज्ञानाला भौगोलिक मर्यादा नसतात गुरुत्वाकर्षण फक्त अमेरिकेतच सिद्ध होते असे नाही तर जगाच्या पाठीवर कुठेही तोच अनुभव येतो. म्हणून विज्ञानाचे शिक्षण इंग्रजीतून आवश्यक आहे. कायद्याला भौगोलिक चौकट आहे, विज्ञानाला नाही. कायद्याचे शिक्षण घेण्याची इच्छा असूनही बहुसंख्य तरुण केवळ भाषेच्या अडथळ्यामुळे त्याकडे पाठ फिरवतात असे मला आढळून आले आहे. मराठीतून उत्तरपत्रिका लिहिणाऱ्यांची सुमारे २०० हून अधिक विद्यार्थ्यांची विद्यापीठात नोंद आहे. प्रामुख्याने वाडा, जव्हार, मोखाडा या ठाणे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा त्यात समावेश होतो.

हे विद्यार्थी जर कायद्याचे शिक्षण घेऊ इच्छितात तर त्याना त्यांच्या हक्कांपासून वंचित करणे कितपत योग्य आहे ? याचा गंभीर विचार होणे आवश्यक आहे. शेवटी आईचे दूध व पावडरचे दूध यामध्ये फरक करण्याची आज निश्चित वेळ आलेली आहे. साहजिकच आईच्या दुधाला प्राधान्य द्याल अशी अपेक्षा करुन इथेच थांबणे पसंत करते.

**प्रा. स्मिता कर्वे**

विधी महाविद्यालय, ठाणे.

• • •

काम करताना खर्च झालेला वेळ कधीही वाया जात नाही - इमरसन

# " प्रिय बाबास........"

सौ. हर्षदा संजय बोरकर

ऐ.के. जोशी इंग्लिश मिडियम स्कूल (माध्यमिक विभाग) सहर्ष सादर करीत आहे...

नवीन स्वतंत्र एकांकिका-

" प्रिय बाबांस.... "

लेखिका - दिग्दर्शिका - सौ. हर्षदा संजय बोरकर

संगीत - सौ. वीणा जोशी

प्रकाश-योजना - श्री. निनाद काटीकर

नेपथ्य - श्री. संजय लक्ष्मण बोरकर

**कलाकार**

समर - कु. अजिंक्य काळे

आई - कु. प्रियांका नावर

प्रेरणाताई - कु. प्रिया मराठे

मैत्रेय - कु. सर्वेश परांजपे

इतर - १) कु. सौरभ सोमण

२) कु. तेजस नांदुर्डीकर

३) कु. रिमा खरे

४) कु. ऋचा वैद्य

(पडदा उघडतो तेव्हा स्टेजच्या कोपऱ्यात एक मुलगा काहीतरी लिहित बसला आहे. प्रकाश फक्त त्याच्यावरच)

समर : प्रिय बाबांस, आज १३ जुलै १९९९ आज शाळेत जातांना खूप पाऊस पडत होता. जवळ जवळ पूर्ण भिजलोच होतो. पण बरं झाल आज शाळेत गेलो. कारण आज शाळेत एक खासच गोष्ट घडली, तीच तुम्हाला सांगायची आहे. मधली सुट्टी संपवून आम्ही drawing period ची तयारी करत होतो. बाईंनी मैत्रेयला उभ रहायला सांगितल आणि अचानक माझही नाव घेतल, ''समर मोहिते''

(समरवरचा spot जाऊन सीन सुरु. ४/५ समरच्याच वयाची मुल बाईसमोर बसली आहेत. बाई त्यांच्याकडून फॉर्मस् घेतायत)

समर : बाई, येऊ ? (समर आणि मैत्रेय वर्गात येतात) बाई, हा माझा फॉर्म.

बाई : समर मोहिते ? (फॉर्म वाचून)

मैत्रेय : आणि हा माझा. (फॉर्म देतो)

बाई : मैत्रेय शानबाग ? (फॉर्म वाचून) बसा तुम्ही पण. आता तिन्ही तुकड्यांतील मुल जमली का ?

सर्वजण : (एकमेकांकडे बघून) हो, हो....

बाई : चला तर मग आता आपण ओळख कार्यक्रम करुया, पण पहिली गोष्ट म्हणजे तुम्ही मला तुमची शिक्षिका न समजता मोठी बहीण किंवा मैत्रीणच समजा. मी आपल्या ह्याच शाळेतून १० वर्षांपूर्वी S.S.C. परीक्षा पास झाले. पास झाले म्हणजे नुसती नाही हं, बोर्डात ७वी येऊन ! मला आपल्या जाधव सरांनी तुम्हा खास दहावीच्या निवडक मुलांना मार्गदर्शन करायला सांगितल. ही कल्पना मला खूपच आवडली आणि पटली सुद्धा. तर आता माझी योग्यता पटवून देण्याच काम तुमच्याकडे लागलं, काय ?

सौरभ : ताई म्हणजे तूच आम्हाला रोज शिकवणार ?

(सर्वजण कुजबुजतात)

बाई : अरे, अरे, अरे बरोबर त्याच. ठरलं तर! आता तुम्ही

---

सगळ्यांनी मला ताई म्हणायच नाही, तू म्हणालास तसं रोज नाही पण आठवड्यातून दोन दिवस तुमचा हा खास वर्ग घेणार.

रुचा : दोनच दिवस ? पण दोन दिवसांत तू सगळं कसं शिकवणार आम्हाला ?

बाई : दोन दिवस येऊन सुद्धा मी तुम्हाला शिकवणार काही नाहीच. एक दिवस येऊन मी तुम्हाला काय अभ्यास करायचा आणि कसा करायचा हे सांगणार.

सौरभ : आणि दुसऱ्या दिवशी ते बरोबर केलाय की नाही ते पहाणार !

बाई : अगदी बरोबर ! तर आता आधी आपण भाषा विषयाकडे वळूया, म्हणजे मराठी ! (नाव आठवत) समर ना. समर जा तुमच मराठीच पुस्तक आण वर्गातून.

समर : आणतो ताई.

(समर जाऊ लागताच लाईट फेड होत जातो पुन्हा पहिल्या spot वर समर वर लाईट) एकूण काय की प्रेरणाताईवर आम्ही सगळे बेहद्द खूप आहोत आणि प्रभावित सुद्धा... ती कशी आहे ते exact नाही सांगता येणार पण.... काही काही वेगळीच आहे एवढं नक्की. बाबा तुम्हाला सांगतो तिने पहिल्याच दिवशी आम्हाला असे काही प्रश्न विचारले, ज्यांनी आम्हाला अंतर्मुख केल. स्वतः बद्दल... स्वतः बद्दल seriously विचार करायला लावला. या अशा प्रकारच्या प्रश्नांचा आम्ही कधी विचारच केला नव्हता. कदाचित इतक्यात केलाही नसता. पण खर हं ताईने पहिल्याच दिवशी अख्या जगाचा विसर पाडून स्वतःच्याच मनात खोल वाकून बघायला शिकवले. Thank you ताई !

प्रवेश दुसरा - (समर घरात दप्तर भरत असतो आणि आई भाजी निवडत असते. तेवढ्यात मैत्रेय येतो.)

मैत्रेय : काय समर, झालास का तयार ?

आई : मैत्रेय, आत आलास तरी चालेल.

समर : ओहो, नवीन सॅन्डल्स वाटतं.

मैत्रेय : अरे नवीन म्हणजे, बाबाच्या आहेत. अरे, आज काय झाल, सकाळपासून खूप पाऊस पडत होता. मग बाबांनी मारली दांडी आणि मी मारला chance सॅन्डल घालायचा. मस्त आहेत ना !

समर : मस्तच आहेत रे ! बाबाच्या बरोबरीला आला म्हणजे तू. आई, मी पण बघू मला बाबांच्या चपला होतात का ते?

आई :-बघ, पणा मला नाही वाटत तुला होतील. आत माळ्यावर कोपऱ्यात आहेत बघ (समर लगबगीने आत जातो.)

आई : मग बाबांचा काय आराम चालला आहे का ?

मैत्रेय : छे हो काकू, आराम कसला हो ? एक दिवस सुट्टी म्हणून बाबा म्हणाले एखादा पिक्चर पाहू या, आई म्हणाली माळा आवरुया. दोघ बसले आहेत भांडत.

समर: (बाहेर येत चपला टाकतो) छे, मला नाही होत ह्या, मी घालतो माझ्याच.

आई: बरं जा आता. एस्टीची वेळ झाली आता. नीट जा अरे समर छत्री घेऊन जा. (चपला हातात घेऊन दाराकडे बघत) कधी येणार हो तुम्ही ?

प्रवेश तिसरा -(समर डायरी लिहीत आहे.)

समर : असा एकही दिवस जात नाही, की तुमची आठवण येत नाही. आई दाखवत नाही, पण ती तुम्हाला पदोपदी miss करते. बाबा, एक विचारू, तुम्ही खरच ही लष्करातली नोकडी सोडून दुसरी, आपल्या जवळपास नाही शोधू शकणार का ? रागवू नका, पण सहज एक विचार मनात आला. सरकार ही जी अनाथालय चालवतात नं, त्यातल्या पुरुषांना का नाही compulsory सैन्यात भरती करत ? निदान त्यांची वाट पाहणारं, त्यांच्या सहवासांची गरज असणारं कुणी नसतं नं ! बाबा मला तुम्ही मला खूप आवडतात, पण तुमचा uniform काढून, तुम्ही civil

dress घरात वावरताना, तेव्हा बाबा, तुम्ही या नं, दांडी मारून या नं please !

**प्रवेश तिसरा** - (खास वर्गासाठी मुल जमली आहेत)

सौरभ : ए, तुला कोणी सांगितल, ताईला बाबा नाही आहेत ते ?

रीमा : अरे, बाबा आईशी बोलत असताना मी ते ऐकलं.

तेजस : ए ए, पण कसे गेले रे तिचे बाबा ?

ऋचा : अरे सैन्यात होते ना, म्हणजे लढाईतच गेले असणार.

रीमा : अरे, आपल्या ह्या चौकात ते हुतात्मा स्मारक आहे ना, ते ताईच्या बाबांच आहे. माहिती नाही तुम्हाला ?

तेजस : ए ए, आपल्या समरचे बाबा, ते पण सैन्यातच आहेत ना ? (सगळे कुजबुजतात) अरे म्हणजे मला तसं नव्हतं म्हणायचं. पण मला काय वाटतं की म्हणूनच ताईचा soft corner त्याच्याकडे आहे, असं म्हणायच होत मला (सगळे कुजबुजतात.)

(समर व मैत्रेय येतात)

ताई : वा वा ! जमले वाटतं सगळे ? (सगळे कुजबुजतात) उशीरच झाला आहे. आपण पटकन विषयाकडे वळू. आज आपल्याला - निबंध घ्यायचा आहे, नाही का ?

तेजस : पण, कुठचा निबंध लिहू ?

ताई : आज आपण आत्मवृत्त हा प्रकार बघणार आहोत. आज पर्यंत तुम्ही कोणाकोणाचे आत्मवृत्त लिहिले सांगा बघू. (मुलं काही नाव सांगतात) बरं बरं, मग आज तुम्ही कुणाचं आत्मवृत्त लिहाल ? ..... हुतात्म्याच्या स्मारकांच. हं आज तुम्ही हुतात्म्याच्या स्मारकांच आत्मवृत्त लिहा कारण त्याच्याच अनुषंगाने तुम्हाला सैनिकाचं, सैनिकाच्या बंदुकीचं, तोफेचं, अशी अनेक आत्मवृत्त सहज लिहिता येतील. - (समर वाक्याला तोडून)

समर : ताई मी पाणी प्यायला जाऊ ? ताई मी पाणी पिऊन येतो.

ऋचा : पण ताई त्याच्याकडे water bagतर आहे.

**प्रवेश चौथा** -(समर डायरी लिहित आहे.)

समर : आता असं वाटतं न बाबा, टिव्ही आणि रेडिओवर चोवीस तास फक्त युद्धाच्याच बातम्या असाव्यात. युद्धाची, तुम्हा सर्व जवानांची इत्यंभूत बातमी त्यात असावा. पण ... पण ते काही शक्य दिसत नाही. पण बाबा मी तुम्हाला हे युद्ध सुरू व्हायच्या आधीच म्हणर होतो ना, तुम्ही परत या. आता तर तुम्हाला 'या' म्हणण्यात अर्थ नाही. आणि कधी यायला मिळेल अशी वाट पहाण्यालाही काही अर्थ नाही.

मैत्रेयला खूप interest आहे. military मध्ये तो म्हणतो तुला किंमत नाही बडिलांची. पण खरं सांगतो बाबा, तुमची खूप किंमत वाटते. तुमच्या नसण्यामुळे लोकांना काय जातय कौतुक वाटायला आपल्या family बद्दल. कौतुक करणारी, आदराने पहाणारी लोक आहेत हो, पण मला बाबा ....एकच आहेत. (रडवेला होऊन वहीवर डोळं ठेवतो.)

(सगळे जणं वर्गात बसून गप्पा मारत आहेत.)

ऋचा : झाला का अभ्यास. काल केवढा होता ?

सौरभ : ताईने दिलेल्या पद्धतीने अभ्यास केला तर अभ्यास, अभ्यास वाटत नाही.

रीमा : ए, पेपर वाचून आलात ना ?

तेजसः अरे हो ना. ताईची idea आहे ना, की रोज आपल्या वर्गात खास ठळक बातम्या सांगायच्या. आमच्या घरात खूप आवडली.

सौरभ : आमच्या पण !

ऋचा : आज कोणी सांगायच्या बातम्या (तेवढ्यात मैत्रेय व समर आत येतात )

मैत्रेय : अर्थात रोजच्या सारख्या मैत्रेय शानबाग.

रीमा : तुझ्याकडून रोज रोज बातम्या ऐकून आम्ही bore झालो आहोत.

मैत्रेय : ओ अरे, तुम्हाला असं bore होऊन चालणार नाही. मी युद्धावर असेन, तेव्हा माझ्या शौर्याच्या अशाच बातम्या तुम्हाला ऐकायच्या आहेत.

ऋचा : तू सैन्यात जाणार आहेस ?

मैत्रेय : येणार आह कां कोणी आमच्या बरोबर ?

(समरच्या खांद्यावर हात ठेवतो.)

समर : मुळीच नाही. (सगळेजण एकमेकांकडे बघतात.)

(तेवढ्यात ताई येते.)

प्रेरणा : ओ हो, माझे ताजे तवाने टवटवीत जवान काय म्हणताहेत ? (सगळे हसतात)

मैत्रेय : परीक्षे विरुद्ध अभ्यासाचा लढा लढण्याची तयारी करत आहेत. (सगळे हसतात)

प्रेरणा : अरे वा, मैत्रेय, तुझं वाक्य दिसतय. तुम्हाला आठवतय मी तुम्हाला सगळ्यांना सांगितल होत, आठवड्यातून निदान एकदा तरी, तुम्ही स्वतःच असे काही तरी लिहा. म्हणजे कविता, पाहिलेला सिनेमा, नाटकाबद्दल, कुणाला तरी सहज मनमोकळ पत्र, अगदीच नाही जमल तर वाचलेला, आवडलेला उतारा. कोणी कोणी काय काय लिहिल आहे ?

मैत्रेय : ताई मी आठवड्याच्या ठळक बातम्या माझ्या note-book मध्ये लिहून ठेवतो. पण newspaper आणि T.V. मधून बघून.

प्रेरणा : चांगली कल्पना आहे. पण आता प्रत्येक बातमीच्या खाली दोन-चार ओळीत तुझी प्रतिक्रिया लिहून ठेव.

मैत्रेय : हं चालेल. पण समरची idea सगळ्यात चांगली आहे.

समर : माझी कुठली idea ?

मैत्रेय : ताई समर आहे नं, त्याच्या बाबांना रोज पत्र लिहितो.

प्रेरणा : खरच समर, कशी काय सुचली ही कल्पना ?

समर : परीक्षेत पत्र लेखन दहा मार्काच आहे नं, त्याची म्हणून practise लिहितो.

प्रेरणा : वाचली पाहिजेत तुझी पत्र.दाखवं हं मला कधीतरी.

समर : नाही ती माझी personal पत्र आहेत.

प्रेरणा : अरे, युद्धावरच्या सैनिकाला त्याच्या मुलांना लिहिलेली पत्र म्हणजे वैशिष्ठ्यपूर्ण असणार ती. बर ते जाऊ दे. आपली शाळा सैनिकांसाठी एक खास कार्यक्रम आयोजित करणार आहेत.

मैत्रेय : हो ताई, लढाई जोरात सुरु झाली आहे.

तेजस : आपला एक वैमानिक parashute मधून उतरत असताना त्याला गोळ्या घातल्या. बऱ्याच सैनिकांना त्यांनी मारलं सुद्धा.

ऋचा : अग ताई, आपला एक सैनिक आपल्याच सीमा रेषेत होता, तरीही त्याला त्यांनी कैद केल.

मैत्रेय : आपल्या सैनिकांच्या मृतदेहाची विटंबना त्यांनी केली.

रीमा : ताई, तू त्या Gunjan Saxsena च वाचलस नं, किती शूर आहे ती.मी पण मोठी होऊन नं, तिच्या सारखीच एक शूर वैमानिक बनेन.

प्रेरणा : हो हो, नक्की होशील. पण युद्धावर नुसत्या गप्पा आणि चर्चा करून काय उपयोग आहे ? आपण काही तरी केलं पाहिजे.

तेजस : पण ताई, आम्ही मुलं काय करू शकतो ?

रीमा : ते ही इथे, या गावात ?

प्रेरणा : अरे का नाही, आपण ठरवलं तर बरच काही करू शकतो.

परमेश्वर प्रत्येक ठिकाणी असू शकत नाही, म्हणूनच त्याने 'माता' निर्माण केली.

ऋचा : पण काय?

प्रेरणा : आपण सैनिकांना पत्र लिहू शकतो, रक्तदान शिबीर भरवू शकतो किंवा मदत फेरी काढू शकतो.

तेजस : पण मदत फेरीमध्ये तर लोकं मदत करणार आम्ही काय करणार ?

प्रेरणा : अरे तुम्ही दहावीच्या अभ्यासाचा अमूल्य वेळ देताय, हे काय कमी आहे का ? मी जाधव सरांशी आपल्या मदतफेरीबद्दल बोललेच आहे. तो पर्यंत आपण मदतफेरीच्या कामाला सुरवात करूया. तो पर्यंत तुम्ही दोघींनी जाड पुठ्ठ्याचे फलक तयार करा. आणि तुम्ही दोघांनी प्रत्येक वर्गात जाऊन आपल्या मदतफेरीबद्दल सगळ्यांना कल्पना द्या. आणि मैत्रेय तू, मदतनिधीसाठी डब्बे तयार कर. आणि समर, तू आपल्या मदतफेरीसाठी ४-५ घोषणा लिहून दे.

समर : ताई आज जर अभ्यास होणार नसेल, तर घरी गेलो तर चालेल ?

प्रेरणा : म्हणजे तू घरी जाऊन लिहिशील ?

समर : मला लिहिता येत नाही आणि मी प्रयत्न सुद्धा करणार नाही.

प्रेरणा : समर तिकडे सीमेवर आपले हजारो सैनिक...

समर: ताई, मला बरं वाटत नाही, मी घरी जाऊ ?

प्रेरणा : बरं जा, पण उद्यापासून मदतफेरीच्या कामासाठी रोज...

समर: ताई, मला हे काम जमणार नाही. तुम्ही मला ह्या कामात धरूच नका.

मैत्रेय : अरे पण समर १ ¹/₂ तास बस नाही आहे.

समर : मी चालत जाणार आहे.

मैत्रेय : चालत, ताई पण त्याला बरं नाही आहे. १ ¹/₂ तास बस नाही आहे.

प्रेरणा : जाऊ दे त्याला.

प्रवेश पाचवा -(समर कोपऱ्यात उभा आहे. प्रेरणाताई जवळ आहे. ती डायरी वाचत आहे.)

ताई : समर, तुझ्याकडे लिहिण्याची कला छान आहे. लिहित रहा.

समर : हं ! ह्या युद्धकाळात काही बोलायला सुचत नाही. लिहायला काय सुचणार ?

आई : समर, तू प्रेरणाताईशी सुद्धा असाच बोलतोस ? सगळ्यांवर कसला राग आहे तुझा ?

समर : मी कुणावरही रागवलो नाही आहे.

आई : मग स्वतःवर रागावलास कां ?

समर : असेल कदाचित !

प्रेरणा : पण स्वतःवर रागवण्यासारखं तू काय केलयस ? तू हवंतर परिस्थितीवर राग व.

समर : मी परिस्थिती बदलू शकत नाही नं म्हणून मी माझ्यावर चिडलोय.

आई : समर तू मन कुठेतरी रमव. मनात सारखे तेच तेच युद्धाचे विचार आणि उद्देश, बस झालं आता !

समर : आपण 'बास झालं आता' म्हणून युद्ध सुद्धा बास करता आलं असतं तर बरं झालं असत आई.

प्रेरणा : नाही. युद्ध असं नाही थांबावयच, एकतर जिंकायचं किंवा ......(समर आत निघून जातो) काकू, तुम्हाला एक सांगू कां ? त्याला बाबांची खूप काळजी आहे. त्याला बाबांची असुरक्षितता नेहमी अस्वस्थ ठेवते.

आई : आता मला समजत का नाही हे ? पण ह्याला काय समजवणार. हा म्हणजे धड लहान ना मोठा !

समर : मी मैत्रेयकडे जातो आई. मला कंटाळा आला आहे.

आई : मैत्रेयकडे ?

---

समर : मैत्रेयकडे जाऊन तरी काय करणार म्हणा ? त्याच त्याच बातम्या, जिकडे जाऊ तिकडे त्याच त्याच चौकश्या.

प्रेरणा : हो नं, मग चल आपण दोघे बाहेर बसून गप्पा मारू.

आई : तुम्ही गप्पा मारा, तो पर्यंत मी तुमच्यासाठी चहा टाकते.

समर : मला नको.

आई : नाही कसं, शाळेत पण डबा न घेता, न जेवता गेला होता नं ? (आई आत जाते)

प्रेरणा : समर, तुझी पत्र वाचून मला माझ्या लहानपणाची आठवण झाली.

समर : प्रत्येक जवानांच्या मुलांची डायरी ही साधारण अशीच असणार.

प्रेरणा : नाही. मी लिहिली नाही म्हणून. नाही तर तुला नक्की दाखविली असती. तुझ्या आणि माझ्या विचारात खूप तफावत आहे. तू बाबांच्या कर्तृत्वावर खूष नाहीस, तू बाबांच्या बाबतीत स्वार्थी आहेस.

समर : मग हरकत काय आहे ? सगळे जणच स्वतःच्या बाबांच्या बाबतीत possessive असतात.

प्रेरणा : हो ! पण आपण साध्यासुध्या सामान्य बाबांची मुलं नाही आहोत. आपण तळहातावर प्राण घेऊन लढणाऱ्या जवानांची मुलं आहोत.

समर : हं, त्यांचे तळ हातावर प्राण घेतलेले आणि त्यामुळे आपले प्राण कंठाशी आलेले.

प्रेरणा : हं बरोबर आहे. ते जाऊ दे. समर, तू डायरीत लिहिल आहेस की दहावी-बारावी नंतर हव्या त्या side ला admission मिळाली नाही तर जवान व्हावं.

प्रेरणा : चुकतो आहेस तू समर. सैन्यात भरती होणं हे science, arts ला admission घेण्याइतक सोप वाटतं तुला ?

समर : त्याहून ही सोप.

प्रेरणा : समर माझ्या आता तुझ्याशी बोलून अस लक्षात यायला लागलं आहे की तुझे बाबा सैन्यात भरती झाले, तुला त्यांचा सहवास, त्यांच प्रेम कमी मिळालं म्हणून तुझा पूर्ण भारतीय त्रिदलीय सैन्यावर राग आहे.

समर : पण मी माझ्या बाबांवर मुळीच नाही रागवलो आहे. त्यांच्यातल्या सैनिकावर रागवलो आहे.

प्रेरणा : समर, बाबा आणि सैनिक असा वेगळा विचारच तू का करतोस ? बाबा भारताच्या सीमेवर स्वतःचे सगळे नाते संबंध विसरून प्राण पणाने लढत आहेत....

समर : पण हे असं प्राणपणानी लढणारे माझेच बाबा का ? दुसऱ्या कोणाचे का नाहीत ? (आई चहा घेऊन येते.)

प्रेरणा : नाहीत ना ! नाहीतच ! कारण जे आपल्या बाबांच्यात आहे, ते इतर बाबांच्यात नाही. समर विचार कर, doctor, engineer होण्याकरिता फक्त बुद्धी आणि चिकाटी लागते. पण लष्करातलं career निवडताना तुमच्याकडे लागते ती जिद्द, हिंमत, भरपूर आत्मविश्वास ! जो आपल्या बाबांच्यात होता, आहे. म्हणूनच ते प्रत्यक्ष लढाई करत आहेत आणि सामान्य नागरीक मदतफेऱ्या काढत आहेत. आपल्या बाबांच्यातल्या वेगळेपणाला ओळख समर.

समर : सैनिक होणं कठीण आहे कबूल. पण सैनिकाचा मुलगा होण हे काही सोपं नाही. आनंदात, दुःखात, मनात positive thinking ठेऊन बाबांची वाट पहावी लागते.

आई : बरोबर आहे, ज्यावेळी बाबा देशाच्या front ची काळजी घेत असतात तेव्हा घरच्या front वर बायको, मुलं, घर व्यवस्थित सांभाळणारच अशी खात्री आहे त्यांना.

समर : सैनिक आणि त्यांच घर या बद्दल मला खूप आदर आहे. पण मला त्या पैकी काहीही व्हायचं नाही. माझी एकच इच्छा आहे की बाबांनी ही नोकरी सोडून इकडे civil

---

संकट हा सत्याकडे जाण्याचा पहिला मार्ग आहे.

job शोधावा.

प्रेरणा : तुला माहित आहे किती किती गोष्टींची तयारी ठेवून त्यांनी हे career निवडलं असतं ? काय काय सहन करावं लागलं असत त्यांना ?

समर : त्यांना तर सहन करावच लागतं. पण त्यांच्या घरच्यांना काय काय सहन करावं लागतं हे सुद्धा बघतोय न मी ?

प्रेरणा : नाही. नाही, समर, तुला जर अस वाटत असेल की मला खूप सहन करावं लागतयं, मन मारावं लागतयं तर तसं मुळीच नाही. शेवटी शहीद झाले तरी ते माझे वडील होते. त्यामुळे त्यांच्या नंतर ती पोकळी तर आहेच. अरे पण घरातला एक कर्ता पुरुष गेला, तर आपण हतबल होतो, उघड्यावर पडतो. मग अख्खा देशच जर शत्रूच्या ताब्यात गेला तर मग आपण कोणाच्या तोंडाकडे बघणार? रस्त्यावर accident मध्ये आलेल्या मृत्यूपेक्षा शत्रूशी लढताना देशाचं रक्षण करताना आललं वीर मरण असतं, पण आपल्या मरणानी कुटुंबियाना दुःखात टाकतानाच आपण देशाच्या विजयाला हातभार लावू शकलो, हे समाधान केवढं आहे. आणि म्हणूनच मला अस अनाथांच जगणं अभिमानास्पद आहे.

समर : ताई तू great आहेस.

प्रेरणा : मी great नाही. civil life मधली सगळी प्रलोभन ऐषोआराम जाणीव पूर्वक टाकून देशासाठी मरणही पत्करायला तयार असलेले तुझ्या माझ्या बाबांसारखे हजारो जवान great आहेत.

समर : पण ताई, मला बाबांची खूप आठवण येते गं.

प्रेरणा : समर, तुला असं वाटतं की बाबा सैन्यात गेले आणि जाणून बुजून मरणाच्या आणखी जवळ गेले ?

समर : खरं सानगायचं तर अगदी अशीच भीती वाटते मला.

प्रेरणा : समर, तुला एक joke सांगू ? एक सैनिक जवान आणि एक सामान्य नागरिक दोघे बोलत असतात. सामान्य माणूस विचारतो, '' तुमचे वडिल कुठे मृत्यू पावले ?'' ''लढाईत'' जवान म्हणतो, ''आणि आजोबा '' ''लढाईत'' ''आणि पणजोबा'' ''लढाईत'' अरे बापरे मग तुम्हाला भीती नाही वाटत लढाईत जायला. जवान त्याला विचारतो, ''तुमचे वडिल कसे गेले ,'' ''झोपेतच'' ''आजोबा'' ''झोपेतच'' ''पणजोबा'' ''झोपेतच'' अरे बापरे, मग तुम्हाला भीती नाही वाटत झोपायला ?

(समर मोठ्यांदी हसायला लागतो. मग गंभीर होतो.)

प्रवेश सहावा - (समर डायरी लिहित आहे) 'प्रिय बाबांस,

समर: कडक salute ! बाबा आज माझा गौरव समारंभ आणि उद्या तुमचा. आज दुपारीच मी, आई आणि जमलं तर ताई दिल्ली करता निघणार. बाबा, गुणवत्ता यादीत आमच्या शाळेतून मी एकटाच आलो. मला आणि सगळ्यानाच आश्चर्य वाटले, त्याबद्दल शाळेतर्फे, खास वर्गातर्फे माझा आणि आईचा सत्कार आहे. उद्या तुम्हाला मरणोत्तर शोर्यपदक बहाल करण्याचा कार्यक्रम आहे.

बाबा आता तुम्ही कधीच परत येणार नाही, ही खरच वाटत नाही. बाबा तुम्ही गेलात आणि सगळच संपून गेल. बातम्यामधील उत्सुकता, फोनवरची अधीरता, दारातली प्रतीक्षा आणि आमच्या संयमाची क्षमता सद्धा. बाबा, मी आणि आई खूप रडलो. पण एकमेकांसमोर नाही. मी आता ठरवल आहे तुम्ही नसलात तरी आमच्या आठवणीत कायमच रहाणार म्हणून मी पूर्वी सारखाच तुम्हाला पत्र लिहित रहाणार. बाबा चालेल नं, तुम्ही जिथे असाल न, तिथेही पत्र नक्की पोचतील. पण बाबा आता तरी तुम्ही या, आपल्या घरातच रहा, आमच्या बरोबर.

प्रवेश सातवा -

प्रेरणा : ओ हो आलात का दिल्लीकर.

आई : ये ये प्रेरणा.

---

चुका केल्याशिवाय आतापर्यंत एकही मनुष्य मोठा झाला नाही.

प्रेरणा : कसा काय झाला कार्यक्रम ? समर पाहिलसं का सगळं, तिथली शिस्त, नेटकेपणा...

आई : समर, दाखव न ताईला शौर्यपदक.

मैत्रेय : हो, मला पण पहायचय.

आई : बघ, मैत्रेय तुझ्यासाठी बरीच माहितीपण घेऊन आला आहे समर. त्याच्या बाबांच्या मित्राला तुझ्याबद्दल सांगितल पण आहे. हो न रे समर.

मैत्रेय : समर येतोस का ? stand जवळ सगळ्याच खास वर्गातला group जमला आहे तुझी वाट पहात.

समर : ताई मी येऊ का जाऊन. आई मी येतो.

(बुट घालू लागतो)

मैत्रेय : अय्या, नवीन बूट, बक्षीस वाटतं

समर : नाही रे, बाबांचे आहेत.

प्रेरणा : बाबांचे बूट होतात तुला ? (समर हसतो)

आई : आता व्हायलाच पाहिजे त्याला बाबांचे बुट.

मैत्रेय : पेढे आणायचे विसरलो मी, माझ्या admission चे

प्रेरणा : कधी झाली admission पक्की ?

मैत्रेय : आजच पुण्याच्या S.P. College मध्ये, commerce ला

समर : commerce !

आई : पण ती तर सैन्यात....

मैत्रेय : जाणार होतो, पण मला नाही वाटत माझ्यात तेवढे गट्स आहेत.

प्रेरणा : अरे हो सांगायचच राहिले काकू. समरची Ratnagiri च्या college मध्ये admission fix झाली. तुम्ही फक्त admission fee भरा. scholorship च्या सदराखाली त्याला तर fee माफच आहे. समर, तू आता फक्त खूप शिकायच, बस.

आई : चला, आता आमच्या पुरता तरी सैनिक, युद्ध ह्या शब्दांना पूर्णविराम.

समर : ताई, तू फार मोठ काम केलस आमचं. पण आता मी सैनिकी प्रशिक्षण घेऊन सैन्यातच जायच ठरवल आहे.

आई : समर तू ?

प्रेरणा : अरे पण तू तर बाबांच्या सैनिकावर रागवलेला असायचास

समर : हो न ताई, पण एक योगायोग पाहिलास मी बाबांवर नाही तर त्यांच्यातल्या सैनिकावर रागावलो होतो. पण त्याच सैनिकाला मरणोत्तर मिळालेल शौर्यपदक स्वीकारायचा मान मला मिळाला. ज्या सैनिकाबद्दल मी कधीही आस्था,आदर बाळगला नाही, कायम बाबांनी सैनिकाच career सोडून द्याव अशी इच्छा मनात ठेवली. त्या सैनिकाचा मान स्वीकारताना माझे हात अक्षरशः थरथरत होते. खरच मी लायक होतो का हा मान स्विकारायला ? तिथे बसलेल्या बाबांच्या मित्रांच्या डोळ्यांत मी पाहिल, ते माझ्यात फक्त बाबांनाच पहात होते. त्यांनी दिलेला कडक salute मीच फक्त बाबांपर्यंत पोचवू शकेन अशी आशा त्यांना वाटत असेल. त्याच क्षणी मी निर्णय घेतला बाबांच्या शौर्यपदकाच ओझ उचलू शकेन, अशी निधडी छाती मी कमवीन.

मरणोत्तर शौर्यपदक प्राप्त झालेल्या लेफ्टनंट कर्नल यांना भावी फौजी जवान समर मोहितेचा कडक salute

(संगीताच्या लयीत पडदा लागतो.)

• • •

---

इतिहास घोकण्यापेक्षा इतिहास निर्माण करणे महत्त्वाचे.

## ॥ पसारा ॥

पसारा आवरत होतो तेव्हा
सारखं वाटत होतं,
किती किती साठवत रहातो आपण.....
लहानपण, मोठेपण या काळातल्या
चॉकलेटच्या वाद्यांपासून पेनच्या टोपणांपर्यंत
प्रेमपत्रापासून ते पिंपळपानापर्यंत....

आणि अचानकच
फोटो सापडला तुझा
पिंपळ पानाप्रमाणे जाळी पडली
नव्हती त्याला

हे फार महत्वाचं वाटलं मला....
कधीतरी येऊन तुला
भेटावं असं मनानं
ठरवंच घेतलयं बघ !

मोहन पाठक

काही उत्कृष्ट उतारे....

'या कुन्देन्दुतुषारहार धवला या शुभ्रवस्त्रावृता
............निः शेष जाड्या पहा ॥'

सरस्वतीच्या स्वरूप वर्णनातच खऱ्या उपासकासाठी मार्गदर्शन सामावलेले आहे. कुन्द-पुष्प सौरभ पसरविते, चंद्र शीतलता देतो, तुषार-बिन्दू सृष्टीचे सौंदय वाढवतात आणि मुक्ताहार व्यवस्थेचे वैभव प्रगट करतो. तसेच खऱ्या उपासकाच्या ज्ञानाचा सुवास चौफेर पसरावा त्यांच्या सहवासंत अनेकांना शीतलतेचा स्रोत अनुभवायला मिळावा, त्यांच्या जीवनाच्या शीतल चांदण्यात अनेक दुःखी जीवांना शान्ती लाभावी. वृक्षाच्या पानावर पडलेले दवबिंदू मोत्याची शोभा धारण करुन वृक्षाच्या सौंदर्यात भर टाकतात त्याप्रमाणे ह्या उपासकाच्या आस्तित्वाने संसारवृक्षाची शोभा वाढावी. एकट्या मोत्यापेक्षा मोत्याचा हार अधिक सुंदर वाटतो. तसेच सरस्वतीच्या उपासकानीही एकमेकांसह एका सूत्रात ओवून घेऊन काम करण्याची तयारी ठेवली पाहिजे. विद्वानांच्या सहशक्तीचा योग कोणत्याही महान कार्याला सुसह्य बनवतो.

(संस्कृती-पूजन' - लेखक-पांडुरंग शास्त्री आठवले.)

# उपक्रमांच्या गर्दीचे दिवस

विशाखा देशपांडे

**नेत्र दीपक यशाची झगमगती दिवाळी**

कोजागिरीच्या रात्री जरा थंड हवा खाण्यासाठी फेरफटका मारून येण्यासाठी बाहेर पडले. कुठेच कसली गडबड दिसत नव्हती. सर्वकाही सामसूम, शांत-शांत. विचार करू लागले आणि मन पूर्वीच्या दिवसांची आठवण करून देऊ लागले. पूर्वी कोजागिरीच्या रात्रीचा कार्यक्रम अगदी दहा-पंधरा दिवस आधीच आखलेला असायचा. सहामाही परीक्षांच्या दरम्यान आली तरी कोजागिरी दणक्यात व्हायची. विविध प्रकारचे खेळ, गाण्यांच्या भेंड्या, सुरेल वाद्यवृंद, ज्याच्या अभावी कोजिगिरीचा कार्यक्रम अधुरा राहील असा हमखास फिशपॉंडचा कार्यक्रम, आणि या रात्रीची लज्जत वाढवणारी झणझणीत भेळ, बटाटेवडे आणि मसाले दूध. वाजत गाजत जागवलेली ही रात्र अनुभवून, "को जागरती ?" असं विचारणारी कोजागिरी देवी अगदी तृप्त होत असे. परंतु आजची कोजागिरी पाहून कोजागिरी देवीला विचारीला कोणत्यातरी कोपऱ्यात चुकून माकून साजरी होणारी किंवा कोणत्यातरी शनिवारी रात्री (दुसऱ्या दिवशी सुट्टी असल्यामुळे) कशी तरी पार पाडून आटोपलेली कोजागिरी बघूनच समाधान मानावं लागत असेल.

या उलट नवरात्रीमधील रास-गरबा याला मात्र नको तेवढं उधाण आल्या मुळे रात्री बारा नंतर हा कार्यक्रम बंद करण्याचा पोलिसांना हुकुम द्यावा लागला. पारंपरिक रास क्रीडेच्या उत्सवाच्या नावाखाली भलभलतेच 'रास' व 'उत्सव' पार पाडले जातात. देवीच्या दर्शनाच्या नावाखाली वेगळ्याच देव्यांच्या दर्शनासाठी गर्दी करणारे तरुण आणि एरवी मोकळेपणा न मिळाल्याने गरब्याच्या निमित्ताने बेभान झालेल्या तरुणी यांचा, तो उत्सव साजरा करण्यासाठी उफाळून आलेला उत्साह नको ते टोक गाठतो.

अशा प्रकारे संस्कृतीची विकृती होत असतानाच आनंद आणि उत्साह घेऊन येणारी दिवाळी मात्र अल्हाददायक असते. सर्वत्र दिव्यांची रोषणाई, फटाक्यांचे दणके, रंगीबेरंगी सुंदर सुंदर वेशभूषा करून हिंडणारे स्त्री-पुरुष व बालगोपाळ, आणि तुडुंब गर्दीने ओसंडून जाणारी दुकाने व हॉटेल्स हे सगळं बघितल्यावर मन इतकं ताजं तवानं होऊन जातं की असं वाटतं , हा उत्साह व आनंद सतत वर्षभर असाच टिकावा.

आमच्या शाळा कॉलेजच्या परिसरामधे परीक्षेमुळे उपक्रमांचा वेग मंदावला असला तरी परीक्षेच्या नंतर दिवाळीच्या आगमनाची चाहूल लागली आहे.

मागील महिन्यात झालेल्या कार्यक्रमाचा व त्यांच्या यशाचा आढावा पुढे देत आहे.

**सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्लिश मिडियम स्कूल पूर्व प्राथमिक विभाग.**

☆ दि. १ ऑक्टोबर रोजी कुमार कला केंद्र, मुंबईच्या ३५व्या आंतर शालेय महोत्सवाअंतर्गत पूर्व-प्राथमिक विभागाने 'महाराजांचे नवीन कपडे' ही विशाखा देशपांडे लिखित -दिग्दर्शित एकांकिका सादर केली. या एकांकिकेला मुंबई-ठाणे एकत्रित, प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. सर्व २८ बालकलाकारांना अभिनयाची प्रशस्ती पत्र मिळाली. तेजस कोपरकर याला उत्कृष्ट अभिनेत्याचे पारितोषिक जाहीर झाले तर उत्कृष्ट लेखन-दिग्दर्शनाचे पारितोषिकही याच एकांकिकेला जाहीर झाले.

---

बडबड कमी व कर्तव्य अधिक या वृत्तीची माणसे जीवनात यशस्वी होतात.

☆ श्री कल्याण संघटना, ठाणे, यांनी आयोजित केलेल्या विविध स्पर्धांमधे विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली.

☆ कुमार कला केंद्राने आयोजित केलेल्या विविध गुणदर्शन स्पर्धेत खालील मुलांनी यश संपादन केले.

१) ओजस गुजरे -प्रथम क्रमांक-विविध वेशभूषा
२) प्रतीक कोल्हटकर-प्रथम क्रमांक-गीत गायन
३) ऐश्वर्या शेणोलीकर-द्वितीय क्रमांक-चित्रकला
४) ईषा पटवारी - प्रथम क्रमांक रेकॉर्ड डान्स
५) परिज्ञा सावले - प्रथम क्रमांक - भेट कार्ड
६) मधुरीमा सावले - द्वितीय क्रमांक -भेट कार्ड

**सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्लिश मिडियम स्कूल प्राथमिक विभाग.**

☆ दि. १ ऑक्टोबर रोजी कुमार कला केंद्राच्या महोत्सवामधे 'ब्रेक के बाद' ही एकांकिका सादर करण्यात आली. या नाटकाचे लेखन, हर्षदा बोरकर यांनी, तर दिग्दर्शन श्री. संजय बोरकर यांनी केल. या नाटकाला मुंबई-ठाणे-एकत्रित, उत्कृष्ट लेखनाचे पारितोषिक जाहीर झाले, तर रिचा टिपणीस, मिहीर देवधर, नंदिनी बोरकर, अभिलेष गोखले आणि रुषभ ठक्कर या बाल कलाकारांना अभिनयाची प्रशस्ती पत्रके देण्यात आली.

☆ श्री कल्याण संघटने तर्फे घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत खालील मुलांना पारितोषिके प्राप्त झाली-

१) अभिलेष गोखले-प्रथम क्रमांक (विभाग ३)

२) सुशांत सुळे-प्रथम क्रमांक (विभाग ९)

३) ओजस मुंगळे-द्वितीय क्रमांक (विभाग ८)

४) निहारिका मुंगळे-प्रशस्ती पत्रक (विभाग १)

५) तुरिया देशपांडे-द्वितीय क्रमांक (विभाग ४)

६) सोनिया कारापूरकर-द्वितीय क्रमांक (विभाग१०)

**सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्लिश माध्यम शाळा माध्यमिक विभाग.**

☆ दि. १ ऑक्टोबर रोजी कुमार कला केंद्राच्या महोत्सवामधे 'प्रिय बावांस....' ही हर्षदा बोरकर लिखित-दिग्दर्शित एकांकिका सादर करण्यात आली. ठाणे विभागात या एकांकिकेला प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. लेखन व दिग्दर्शनाचे पारितोषिकही याच एकांकिकेला मिळाले. खालील कलाकारांना अभिनयाची प्रशस्तिपत्रके देण्यात आली.

अजिंक्य काळे, प्रिया मराठे, प्रियांका नाबर

☆ श्री कल्याण संघटने तर्फे घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत खालील मुलांना पारितोषिके प्राप्त झाली-

१) कविता वेलणकर -प्रशस्ती पत्रक (विभाग १)

२) मिताली भेंडे-द्वितीय क्रमांक (विभाग २)

३) जुईली शुक्ल -तृतीय क्रमांक (विभाग ३)

४) केतकी चांदे -द्वितीय क्रमांक (विभाग ५)

५) राही सरनोबत-द्वितीय क्रमांक-(विभाग २-७वी८वी)

☆ ऑक्टोबर '९९ च्या अंकामध्ये दि. ५ सप्टेंबर रोजी सौ. ए.के. जोशी स्कूल व डॉ. बेडेकर विद्यामंदिर या दोन शाळांनी मिळून 'शिक्षक दिन' साजरा केल्याचा वृत्तांत दिला होता. या वृत्तांतामध्ये अनावधाने काही गोष्टींचा उल्लेख करण्याचे राहून गेलं. या समारंभाच्या वृत्तांताचा पुन्हा वेध घेत आहे.

दि. ५ सप्टेंबर रोजी 'शिक्षक दिन' दोन्हीं शाळांनी एकत्रित साजरा केला. या प्रसंगी महाराष्ट्र बाल शिक्षण परिषदेचे अध्यक्ष श्री. रमेश पानसे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष

---

आयुष्य बुद्धीचा खेळ नसून अंतःकरणाची पूजा आहे.

श्री. करंदीकर, कार्याध्यक्ष श्री. टिल्लू, कार्यवाह श्री. उत्तम जोशी, श्री. ल. ग. देव, श्री. मा.य. गोखले, दोन्ही शाळांचे सर्व विभागप्रमुख व शिक्षक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवनाने झाली. सौ. ए.के.जोशी शाळेच्या शिक्षिका सौ. सुमेधा कुलकर्णी यांनी रचलेल्या स्वागतगीताला, संगीत शिक्षिका सौ. वीणा जोशी यांनी स्वरसाज चढवून आपल्या सुरेल आवाजात, विद्यार्थी समूहा समवेत सादर केले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. रमेश पानसे म्हणाले, ''जो शोध घेतो व घेत असतो तो खरा शिक्षक. शिक्षक हा समाजाची निर्मिती करत असतो तेव्हा शिक्षक जेव्हा शिक्षकी पेशा स्वीकारतो तेव्हा दोन गोष्टी त्याने अंगिकाराव्या लागतात त्या म्हणजे समानतेची व ममतेची दृष्टी ठेवणे.''

या प्रसंगी यंदाचा कै. सुमतीबाई टिल्लू 'आदर्श शिक्षक' पुरस्कार, डॉ. बेडेकर विद्या मंदिरच्या सौ. सविता केळकर यांना जाहीर करण्यात आला. सौ. ए.के. जोशी शाळेच्या शिक्षिका सौ. मेघा लाड यांचा १० वर्षे सेवा झाल्या बद्दल व डॉ. बेडेकर विद्या मंदिरच्या सौ. उषा कळमकर व सौ. अंजली पंडित यांचा २० वर्षे सेवा झाल्याबद्दल प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सौ. ए.के.जोशी शाळेच्या शिक्षिका अपर्णा भोळे यांनी कार्यक्रमाचे सुंदर सूत्र-संचलन केले. कार्यक्रमाची सांगता सौ. वीणा जोशी यांच्या पसायदानाने झाली.

☆ दि. २६ सप्टेंबर रोजी 'चिल्ड्रेन थिएटर' पुरस्कृत व 'रंगमंच' आयोजित समूहगान स्पर्धेत सौ. ए.के.जोशी स्कूल तर्फे संघ गेले व माध्यमिक विभागाने दुसरे तर पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाने तिसरे पारितोषिक संपादन केले. या स्पर्धेत पूर्व प्राथमिक ते माध्यमिक असा एकच गट असूनही आमच्या पूर्व प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनी अपूर्व यश संपादन केले तेव्हा त्यांचे मनःपूर्वक कौतुक व अभिनंदन!

☆ गीता प्रतिष्ठान मुंबई तर्फे, गीताई पाठांतर स्पर्धा दि. २० सप्टेंबर ९९ ते ३० सप्टेंबर ९९ दरम्यान घेण्यात आल्या व त्यात सौ.ए.के. जोशीच्या १८६ विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला व उत्तम यश संपादन केले. या कार्यक्रमाच्या संचालिका सौ. कालिंदी कोल्हटकर होत्या तर सौ. वीणा जोशी व सौ. विनिता गोखले यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले.

### संस्कृत शिष्यवृत्ती

☆ दरवर्षी ब्राह्मण सेवा संघ -शिक्षण सहाय्यक समितीतर्फे घेण्यात येणाऱ्या 'संस्कृत शिष्यवृत्ती' परीक्षेस अनेक विद्यार्थी बसतात. बहुतेकांना चांगले गुण मिळतात. यंदा २२/८/९९ रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेस आपल्या शाळेतील ४९ विद्यार्थी परीक्षेस बसले. त्यातील खालील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली.

| अनु. क्र. | गुणवत्ता क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण (१००पैकी) |
|---|---|---|---|
| १ | २ | मानसी अ. बापट | ९२ |
| २ | ३ | सौरभ र. सरदेशपांडे | ९१ |
| ३ | ५ | अभिषेक वि. मंत्री | ८६ |

☆ धीरुभाई अंबानी फाऊंडेशन तर्फे दरवर्षी महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने घेतलेल्या १०वी च्या परीक्षेस प्रत्येक जिल्ह्यातून प्रथम तीन विद्यार्थ्यांना व केंद्रीय शिक्षण मंडळाने घेतलेल्या परीक्षेतील महाराष्ट्र राज्यातील पहिल्या दहा विद्यार्थ्यांना पारितोषिके व शिष्यवृत्त्या दिल्या जातात. या वर्षापासून शारीरिक अक्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी बोर्डाच्या अंपग श्रेणीतून प्रत्येक जिल्ह्यातून १०वी च्या परीक्षेस प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला

पारितोषिक व शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. कु. पूनम वाव्हळ (शारीरिक अक्षमता श्रेणी) ह्या सौ. ए.के. जोशी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थीनीला ठाणे जिल्ह्यातून माध्यमिक शालांत परीक्षेत प्रथम आल्याबद्दल निवड करण्यात आली आहे. ह्या मध्ये तिला रु. ४००० व फाऊंडेशन तर्फे गौरवपत्र दिले जाते.

**ठाणे भारत स्काऊट आणि गाईड संस्था, ठाणे.**

श्री. अशोक आहेर यांनी दिलेल्या माहितीनुसार- दिनांक २ व ३ ऑक्टोबर १९९९ रोजी ठाणे जिल्हा भारत स्काऊट गाईड संस्थेतर्फे राज्य पुरस्कार परीक्षेचे सराव शिबीर सौ. ए.के. जोशी येथे सकाळी १० ते सायंकाळी ५.३० पर्यंत आयोजित केले गेले. यामध्ये एकंदरीत ५ शाळांनी भाग घेतला होता. एकूण स्काऊट आणि गाईडची संख्या ५० होती. तसेच दहा स्काऊट मास्टर व गाईड कॅप्टन हजर होत्या. ह्या सराव शिबीराकरीता ठाणे जिल्हा स्काऊट ट्रेनिंग कमिशनर तसेच ठाणे जिल्हा कार्यालयाचे पदाधिकारी उपस्थित होते. ही सराव परीक्षक पार पाडण्याकरिता प्रशिक्षित परीक्षा बोलविण्यात आले होते.

ही परीक्षा लेखी, मौखिक तसेच प्रात्यक्षिकांवर आधारित असते. जास्त भर प्रात्यक्षिकांवर दिला जातो. प्रात्यक्षिकांमध्ये दोरीच्या गाठी बांधणे, प्रथोमचारातील बंधने बांधणे, तंबू बांधणे, स्वयंपाक चाचणी देणे इ. बाबींचा समावेश असतो. प्राविण्य पदकांची चाचणी देऊन त्यांना अहवाल सादर करावा लागतो. सौ. ए.के. जोशी शाळेतून ३ गाईडस् व ७ स्काऊटस् यांनी भाग घेतला होता. या सर्वांना शाळेच्या स्काऊट मास्तर व गाईड कॅप्टन यांनी मार्गदर्शन केले.

या सराव परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुणे येथे 'धोरला राज्ज पुरस्कार' चाचणी साठी पाठविण्यात येणार आहे.

**सौ. मनाली देवधर यांनी दिलेल्या माहिती नुसार -**

शनिवार दि. २५ सप्टेंबर १९९९ रोजी सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत ठाणे शहरातील शाळेच्या मुख्याध्यापकांची सभा झाली.

सन १९९८-९९ मध्ये घेतल्या गेलेल्या प्रज्ञा शोध परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विविध शाळांतील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी प्रमुख पाहुणे श्री. अशोक टिळक यांचा परिचय करून दिला. श्री. टिळक सरांनी मोलाचे चार शब्द सांगितले. या परीक्षेचे राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेच्या दृष्टीने असलेले महत्त्व व त्यामागची कारणे त्यांनी समजावून सांगितली. शालांत परीक्षेप्रमाणेच ही परीक्षा अतिशय महत्त्वाची, परंतु प्रसिद्धी माध्यमाच्या अजून ती प्रकाश झोतात आलेली नाही असे ते म्हणाले.

आभार प्रदर्शनाचा कार्यक्रम करून ह्या कार्यक्रमाचा पूर्वार्ध समाप्त करण्यात आला. कॉफीपानानंतर सुरु झालेल्या दुसऱ्या भागात पालक, विद्यार्थी त्यांचे शिक्षक यांच्याशी म.प्र.शोध परीक्षेचे संचालक श्री. कुलकर्णी यांनी चर्चा केली. या परीक्षेस बसणाऱ्या व उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची सन १९८१ ते १९९८ पर्यंतची आकडेवारी सांगितली.

अशा ह्या मेळाव्यामुळे ठाणे शहरातील शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती एकत्र झाल्या व ठाणे शहराचे नाव कसे मोठे करता येईल व विद्यार्थ्यांचे यश कसे वाढविता येईल यावर चांगली चर्चा झाली. ह्या चर्चेचा विद्यार्थी, पालक, शिक्षक यांना चांगलाच लाभ झाला.

**डॉ. बेडेकर विद्या मंदीर - पूर्व प्राथमिक विभाग.**

❖ नवरात्र सुरु झाल्यावर सर्व मुलांना हॉलमधे एकत्र करून घटस्थापना कशी करतात. हे प्रत्यक्ष दाखवले.

☆ दि. १५ ऑक्टोबर रोजी भोंडल्याचा कार्यक्रम झाला. या वेळी सर्व मुलां - मुलींना टिपऱ्यांवर गरबा नृत्यही सादर केले.

☆ नवीन सुरु केलेल्या उपक्रमामधे मुलांना शाळेतच छोट्या पडद्यावर निरनिराळ्या गोष्टी दाखविण्यात आल्या.

**डॉ. बेडेकर विद्या मंदीर - प्राथमिक विभाग.**

**सौ. विनिता राणे यांनी दिलेल्या माहितीनुसार-**

दरवर्षी प्रमाणे यंदाही शाळेतील 'विद्यालंकार' सभागृहामध्ये 'गणपती उत्सव' साजरा करण्यात आला. 'अवेळी सतत होणाऱ्या निवडणुका ' हा विषय घेऊन आकर्षक सजावट केलेली होती.

'कुमार कला केंद्र' या संस्थेतर्फे सप्टेंबर महिन्यात घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेत प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी जास्त संख्येने व उत्साहाने भाग घेतला. चित्रकला व हस्ताक्षर स्पर्धेत निवडक विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षिस म्हणून प्रशस्तिपत्रके देण्यात आली.

'भेटकार्ड' तयार करणे या स्पर्धेत इ. ३ री तील कुमारी राधिका विकास सासवडकर व इ. ४थी तील कुमारी अनुराधा गिरीश ओगले या विद्यार्थिनींना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

७ सप्टेंबर रोजी मुख्याध्यापिकाबाईंनी सर्व शिक्षिका, लिपीका व सेविका यांना गुलाब पुष्प, पेढा व मसालादूध नेऊन 'शिक्षक दिन' साजरा केला.

कुमार कला केंद्रातर्फे घेण्यात आलेल्या लोकनृत्य स्पर्धेत शाळेच्या प्राथमिक विभागाने 'बंजारा नृत्य' सादर केले. त्याचे दिग्दर्शन सौ. गितांजली गणेश अंबिके यांनी केले होते- या नृत्यातील सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रके देण्यात आली.

सोमवार दिनांक ४ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंती साजरी केली. विद्यार्थ्यांची बालसभा घेतली होती. त्यात कांही विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी यांच्या कार्यावर आधारित भाषणे केली. त्यानंतर शिक्षकांची मार्गदर्शनपर भाषणे झाली.

रविवार दिनांक १० ऑक्टोबर रोजी 'स्त्री कल्याण संघटना, ठाणे ' तर्फे वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत प्राथमिक विभागातील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. इयत्ता १ली व २री साठी माझा वाढदिवस व सहल तर इयत्ता ३री व ४थी साठी 'श्यामची आई' मधील एक गोष्ट व समर कथा हे विषय होते. या स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

इयत्ता १ली : सोनाली संजय दाबके

इयत्ता २री : श्रेयस श्रीधर केळकर, कमलेश नारायण वच्छाव, अजिंक्य प्रकाश कुंभार, वैभव विकास पाटील

इयत्ता ३री : श्रद्धा विश्वनाथ मोरे, श्वेता प्रमोद जोशी

इयत्ता ४ थी : सागर संजय चांदे

बुधवार दिनांक १३.१०.९९ रोजी भोंडला साजरा करण्यात आला. मुलींनी टिपरी नृत्य सादर केले. कार्यक्रमानंतर मुलांना खिरापत वाटली.

प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. सुलभा सुरेश दांडेकर ह्या 'महापौर आदर्श शिक्षिका' ठाणे पुरस्काराच्या मानकरी ठरल्या आहेत. शनिवार दिनांक १६.१०.९९ रोजी 'गडकरी रंगायन' येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार ठाण्याचे आयुक्त माननीय श्री. टी. चंद्रशेखर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

सौ. सुलभा सुरेश दांडेकर गेली ३३ वर्षे सेवेत आहेत. मुख्याध्यापिका पदावर १.३.९९ पासून नेमणूक झाली. किमान अध्ययन क्षमता (२१ दिवस) वाजीपूर,

---

वसई व राज्यव्यापी प्राथमिक शिक्षक भरीव प्रशिक्षण कार्यक्रम १९९८ (स्मार्ट पी.टी.) (१२ दिवस) ही दोन प्रशिक्षणे त्यांनी पूर्ण केली. वाचन, रांगोळी काढणे, विविध प्रकारचे हार बनविणे. श्लोक स्वतः मुखोद्गत करून मुलांकडून स्पष्ट उच्चाराहस पाठ करून घेणे हे त्यांचे छंद आहेत. त्यांनी डिसेंबर १९७१ मध्ये युद्धाच्यावेळी रक्तदान केले. महाराष्ट्र राज्य मान्यताप्राप्त खाजगी शिक्षक महासंघ कार्यकारिणी सदस्य सन १९९९-२००० करता.



सौ. सुलभा सुरेश दांडेकर 'महापौर आदंश शिक्षिका'

आदंश शिक्षिका पुरस्कार : विद्या प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष मा. श्री. मराठे यांच्या तर्फे देण्यात येणाऱ्या आदर्श शिक्षिका पुरस्काराच्या प्रथम मानकरी. सन १९९० ते सन १९९६ सात वर्षे इयत्ता ४थी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती चा वर्ग सलग घेतला. यात विद्यार्थ्यांना यश मिळाले.

**टि.म.वि. पुणे प्रवेश परीक्षा :-**

सन १९९० ते सन १९९८ सलग ९ वर्षे इ. ४थीच्या टि.म.वि. पुणे प्रवेश परीक्षेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या परीक्षेस १००% विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सन १९९०-एका विद्यार्थ्याने महाराष्ट्र राज्यात चौथा क्रमांक मिळविला. सन १९९३-एका विद्यार्थ्यांने महाराष्ट्र राज्यात द्वितीय क्रमांक मिळविला. सन १९९५-एका विद्यार्थ्याने महाराष्ट्र राज्यात तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला.

'दिशा' तर्फे सौ. सुलभा दांडेकर यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन !




**डॉ. बेडेकर विद्या मंदिर माध्यमिक विभाग :**

**सौ. मंजिरी दांडेकर यांनी दिलेल्या माहिती नुसार -**

☆ रोटरी क्लब ऑफ ठाणे तर्फे अपंग मुलांच्या चित्रकला स्पर्धा दि. १ऑक्टोबर रोजी घेण्यात आल्या. त्या स्पर्धांचे परीक्षक म्हणून आपल्या शाळेतील कलाशिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर यांनी काम पाहिले.

---

गरिबीत समाधानी असणे हे खऱ्या श्रीमंतीचे लक्षण आहे.

☆ शारदोत्सोवाच्या निमित्ताने आंतरवर्गीय समूहगीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यात पुढील वर्गांना पारितोषिके प्राप्त झाले. इ. ५अ, ६, ७, ८, ९क, १०ड. तसेच याच उत्सवाच्या निमित्ताने हस्ताक्षर स्पर्धाही घेण्यात आल्या. त्या स्पर्धेत ५अ-श्रद्धा कदम , ६अ-शलाका प्रधान , ७अ-स्वप्ना गोरे , ८अ-वृषाली पाचपांडे, ९ब-सुजाता धनावडे , १०अ-प्राची पराडकर या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्राप्त झाली.

☆ ब्राह्मण सेवा संघ शिक्षण सहाय्यक समितीतर्फे २२ ऑगस्ट ९९ रोजी संस्कृत शिष्यवृत्ती घेण्यात आली. या परिक्षेस विविध शाळांतून ४५५ विद्यार्थी बसले होते. त्याचा निकाल नुकताच जाहीर झाल. या परीक्षेत आपल्या शाळेतील पुढील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली.

कु. म्हात्रे हर्षदा प्रकाश २री, कु. शिंदे उर्मिला बाळासाहेब ३री (३री), कु. सुरपूर सिद्धी गणेश ३री, कु. वर्वे भूषण श्रीपाद ५वा, कु. अट्टल अभिनव ओमप्रकाश ६ वा , कु. फुटक उज्वला शांताराम ८वी, कु. बारी पंकजा पंडितराव ८वी,

यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षिका सौ. मिरा लिमये व श्री. दिपक घोंडे यांचे हार्दिक अभिनंदन !

☆ आपल्या शाळेतील विद्यार्थी विनायकप्रसाद सुरेश पाखरे यासही राष्ट्रीय प्रज्ञा शोध शिष्यवृत्ती प्राप्त झाली. या सुयशाबद्दल त्याचे सर्वांकडून हार्दिक अभिनंदन !

☆ जपान कराटे असोसिएशन संलग्न शोटोकॉन कराटे ॲकॅडमी आयोजित इंटर डोजो कराटे चँपियनशीप स्पर्धेत आपल्या शाळेतील कु. अभिषेक पेंडुरकर (१०ड) यास कुमिते प्रकारात सुवर्णपदक व काता प्रकारात रौप्यपदक प्राप्त झाले. त्याचे सर्वांतर्फे अभिनंदन !

☆ श्री कल्याण संघटना आयोजिक आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांना पारितोषिके प्राप्त झाली.

कु. दिपीका रोहिदास पाटील-५वी अ, कु. दीप्ती शरद साने-६वी, कु. सुधीर गणपत गायकवाड, कु. रोहन टिल्लू-९वी अ, कु. जयेश माधा जोशी-९ अ, नीता अनिल फाटक-९ अ, सिद्दी गणेश सुरपूर-९अ

☆ कुमार कला केंद्र आयोजित आंतरशालेय एकांकिका स्पर्धेत आपल्या शाळेने 'आत्मशोध' ही एकांकिका सादर केली. व लोकनृत्य स्पर्धेत शेतकरी नृत्य सादर केले.

एकांकिकेतील दुर्गेश देशपांडे (६अ) व राजेश धुरी (७अ) यांना उत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक मिळाले. या एकांकिकेला सौ. कल्पना बोरवणकर, कु. साधना कारंडे व पालक श्री. अनिल फाटक यांनी मार्गदर्शन केले.

शेतकरी नृत्यात आलाप भागवत (८अ) श्रुती पैसास (७अ) पार्वती निंबर्गी (७ब) सुरेखा गांधी (७अ) यांना नृत्याचे पारितोषिक मिळाले. लोकनृत्यास प्रथम पारितोषिक प्राप्त. या नृत्यास सौ. उज्वला घोत्रे व कु.साधना करंडे यांनी मार्गदर्शन केले.

☆ उमेश दाभाडे (७ई) यास इंटरनॅशनल चायनीज किकबॉक्सिंग स्पर्धेत ग्रीन बेल्ट II , ब्लू बेल्ट II या स्पर्धांमधे सर्वप्रथम येण्याचा मान मिळाला.

☆ ओंकार लिमये ७अ- बूस्टर क्लब ऑफ टेबलटेनीस या संस्थेच्या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

☆ प्राची देवकर ६अ- ठाणे महानगरपालिका ॲथलॅटिक प्रशिक्षण योजने अंतर्गत आयोजित १०० मीटर धावणे मधे द्वितीय क्रमांक मिळाला तर लांब उडी मध्ये सुद्धा द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

उत्साही पुरुष कोणत्याही परिस्थितीत खचून जात नाही.

❀ प्रचिता पाटणकर ७ ब - हिला पुढील प्रमाणे पारितोषिके प्राप्त झाली.

**कॅथलिक जिमखाना मुंबई आयोजित :**

१)१०० मीटर धावणे दुसरा क्रमांक, २) १०० मीटर रिले दुसरा क्रमांक, ३) २०० मीटर धावणे दुसरा क्रमांक

**बॉम्बे कॅथलिक सभा -**

१)१०० मीटर रिले दुसरा क्रमांक २)६०० मीटर धावणे पहिला क्रमांक, ३)१०० मीटर धावणे दुसरा क्रमांक.

**ठाणे मेट्रोपॉलिटिन जिमखाना -**

लांब उडी पहिला क्रमांक, २) ६०० मी धावणे पहिला क्रमांक ३) १०० मीटर धावणे दुसरा क्रमांक.

या सर्वांचे 'दिशा' तर्फे अभिनंदन !

**ठाणे विधी महाविद्यालयात विविध कार्यक्रमांची रेलचेल :**

ठाणे विधी महाविद्यालयात प्रथम सत्रात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धांमधून भावी वकीलांनी आपल्या कलेची, व्यासंगाची आणि अभ्यासाची चुणूक दाखवली. कॉलेजने अशाप्रकारे ज्ञानवर्धक कार्यक्रमांचे आयोजन करुन एकप्रकारे शैक्षणिक वातावरण अधिक पोषक करण्याचाच प्रयत्न केला. दिवाळीच्या सुट्ट्या लागण्यापूर्वी आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धांचा तपशील थोडक्यात -

**आगळा वेगळा शिक्षक दिन :**

विधी महाविद्यालयात शिक्षक दिन आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धेत भाग घेऊन आपले विचार मांडले.

कार्यक्रमाचा शुभारंभ प्राचार्य एस.एम. इंजिनियर आणि उपप्राचार्य जान्हवी नवरे यांनी दीपप्रज्वलन करुन केला. जनरल सेक्रेटरी जया यादव हिने प्राचार्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. उपस्थित प्राध्यापकांना देखील गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील त्यांच्या विषयीचा आदर व्यक्त केला.



**विधी महाविद्यालय ''शिक्षक दिन''**

**दीपप्रज्वलन करताना प्राचार्य एस.एम. इंजिनियर व उपप्राचार्य जान्हवी नवरे.**

चइयॅक्युलेट डिसूजा, जया पारवानी, अभय जोगळेकर, पुजारी, अशोक कुमार, दीपक सोनावणे आदींनी प्रसारमाध्यमे विरुद्ध समाज, नर्मदा धरण, आजच्या सामाजिक वातावरणात अर्थपूर्ण समाजाची निर्मिती कशी करता येईल, या विषयांवर आपले विचार मांडले. अशोक कुमार याने प्रथम पारितोषिक मिळवले तर इॅक्युलेट डिसूजा यांना द्वितीय तर अभय ओळेकर आणि बलदेव सिंग गिरानी यांना तिसरे बक्षीस मिळाले. परिक्षक म्हणून त्चार्य एस.एम. इंजिनियर, उपप्राचार्य जान्हवी नवरे आणि त्रीविधा जयकुमार यांनी काम पाहिले.

**वादविवाद स्पर्धा :**

वकीली करताना आपल्या पक्षकाराच्या बाजूने प्रभावीपणे युक्तीवाद करणे हे चांगल्या वकीलाचे लक्षण मानले जाते. हीच कला विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना देखील आत्मसात व्हावी म्हणून कॉलेजमध्ये ४ ऑक्टोबर रोजी वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. देहदंडाची शिक्षा असावी की असू नये ? , चित्रपट आणि दूरदर्शनच्या कार्यक्रमांवर सेन्सरशिप-असावी का ? हे विषय होते.

जया यादव, अभय जोगळेकर, दीपक सोनावणे, प्रशांत शिवलकर यांनी सेन्सरशिपच्या समर्थनार्थ तर इंदिरा, अशीष शाह, हरीश बी यांनी विरोधात जोरदारपणे आपली मते मांडली.

देहदंडाच्या विरोधात जया पारवानी, मिरदा एस., नितू एस., संगीता मेमन, हेमंत ससाणे तर बाजूने जया यादव, उषा किरण, रमेश राऊत आणि पुजरी यांनी मुद्दे मांडले. अशीष शाह प्रथम, अभय जोगळेकर आणि जया पारवानी द्वितीय क्रमांकाचे मानकरी ठरले. परिक्षक म्हणून प्राचार्य एस.एम. इंजिनियर , उपप्राचार्य जान्हवी नवरे , श्रीमती विद्या जयकुमार आणि श्री. गावकर यांनी काम पाहिले.

**मुट कोर्ट : रंगीत तालीम**

मुट कोर्ट स्पर्धा म्हणजे सर्व स्पर्धांमधील आकर्षण होते. स्पर्धकांनी एक केस घेवून विरोधात आणि बचावासाठी तर्कीवाद केला. भविष्यात करणाऱ्या वकीलीची जणू विद्यार्थ्यांनी रंगीत तालीम केली.

जनरल सेक्रेटरी जया यादव आणि अशोक कुमार यांनी इंडियन डिव्होर्स ॲक्टच्या कलम-१० वर युक्तीवाद केला. हेमंत ससाणे आणि रश्मी व्यास, इम्यॅक्युलेट डिसूजा आणि वीरदा एस., जया पारवानी, संगीता मेमन अशी इतर स्पर्धकांची नावे आहेत. न्यायाधिशाच्या भूमिकेत प्राध्यापक वर्ग होता.

**मैत्रीचे बंधन (फ्रेंडशिप डे ) :**

महाविद्यालयीन जीवनात 'मैत्री' ही एक अतूट भावना असते. त्याचेच प्रतिबिंब महाविद्यालयातर्फे साजरा करण्यात आलेल्या २३ ऑगस्टच्या 'फ्रेंडशिप डे' मध्ये दिसून आले. ज्येष्ठ आणि कनिष्ठ विद्यार्थ्यांमध्ये मैत्री वाढावी हा देखील या कार्यक्रमाचा उद्देश होता. विद्यार्थ्यांनी एकमेकांना मैत्रीचे प्रतीक, फ्रेंडशिप रिबन बांधल्या. प्राध्यापकांना देखील रिबन बांधण्यात आल्या.

**रोज, सारी आणि टाय डे :**

विद्यार्थ्यांचा सर्वात आवडता आणि ज्याची ते आतुरतेने वाट पहात असतात असा रोज-डे. १३ ऑक्टोबर रोजी कॉलेजच्या अभ्यासिकेत साजरा करण्यात आला. आपल्या मनातील भावना आपल्या प्रिय व्यक्तीपर्यंत गुलाबाच्या फुलांच्या माध्यमातून पोहचविण्यात आल्या. आदराचे प्रतीक म्हणून शिक्षक वर्गाला गुलाबपुष्प देण्यात आली. या गुलाबाला अनेक रंगाच्या छटा होत्या. तिखट, मिठ, गोड, मसालेदार अशा अनेक प्रेमसंदेशांना (फीश पॉंड) ना विद्यार्थ्यांनी मनमुरादपणे दाद दिली. अनहीता इराणी ही सुंदर विद्यार्थीनी रोज किन -झाली. सुजीतची निवड टाय-किंग म्हणून करण्यात आली. प्राध्यापक सलील बुटाला यांनी पक्षिसे प्रायोजित केली होती. जी.एस. जया यादव हिने अभार मानले.प्राचार्य एस.एम. इंजिनियर, उपप्राचार्य जान्हवी नवरे आणि इतर शिक्षक वर्ग कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होता.

एकंदरित विधी महाविद्यालयाचे प्रथम सत्र अभ्यासाबरोबरच इतर कार्यक्रमांचा अविस्मरणीय ठेवा देवून गेले.

---

लीनता व विनयशीलता या धार्मिकतेच्या दोन शाखा आहेत.

''जीवन जगण्याची कला''

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील ''इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम'' जा विभागाने २७.९.९९ रोजी ''जीवन जगण्याची कला'' या विषयावर आय्.एस्.टी.ई. ''स्टुडंस् चॅप्टर' तर्फे एक कार्यक्रम आयोजित केला होता. द्वितीय व तृतीय वर्ष ''इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम'' मधील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींनी या कार्यक्रमात उत्साहाने भाग घेतला.

वरील कार्यक्रम 'व्यक्ती विकास केंद्र' या संस्थेतर्फे घेण्यात आला. ह्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती सुषमा आगरकर व कु. प्रतिभा अय्यर उपस्थित होत्या. त्यांनी वरील विषयावर माहिती दिली.

या कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांतर्फे आभार प्रदर्शनाने झाली. सर्वांनी संस्थेच्या कार्याची प्रशंसा केली व हे कार्य असेच वृद्धिंगत होवो अशी कामना केली.

तंत्रनिकेतनात दसऱ्याच्या आदल्या दिवशी दि. १८.१०.९९ रोजी सर्व विभागात सरस्वतीपूजन केले. खंडेनवमीच्या निमित्ताने हत्यारे, मशीन यांचीही पूजा केली. याच दिवशी तंत्रनिकेतनाच्या ऑडिओ व्हिज्युअल हॉलचे उद्घाटन, मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर यांच्या हस्ते झाले. या वेळी मंडळाचे उपाध्यक्ष श्री. करंदीकर, श्री. टिल्लू व श्री. मराठे हे पदाधिकारी उपस्थित होते. प्रा. गोडसे यांच्या ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. डॉ. बेडेकर यांनी या प्रसंगी आपले विचार व्यक्त केले. प्रा. मुजुमदार सरांचेही यावेळी भाषण झाले.

कार्यक्रम यशस्वी करण्यात प्रा. सौ. आगाशे, सौ. राघवन, प्राचार्य मुजुमदार, उपप्राचार्य श्री. नायक यांचा हात होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. मोहिते-पाटील यांनी करून कार्यक्रमास सुसुत्रता आणली. प्रा. आगाशे यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

दिनांक १६-१०-९९ रोजी तृतीय वर्ष Industrial Electronics, Instrumenttation आणि Electrical System ह्या विद्यार्थ्यांसाठी संस्थेतर्फे Enterpreneurship Development" ह्या विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. ह्या प्रसंगी Labindia ह्या Electrionic Manufacturing Unit चे Director श्री. अजित परांजपे ह्यांनी Product & Product Services ह्या विषयाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच Advanced Biochemicals ह्या Enzyme Manufacturing Unit चे managing Director श्री. चंद्रकांत राठे ह्यांनी लघु उद्योजकाचे विशिष्ट गुण विद्यार्थी कसे विकसित करु शकतील ह्या बद्दल मार्गदर्शन केले. ह्या दोन ही व्याख्यांनाना सर्व विद्यार्थी हजर होते.

**विद्या प्रसारक मंडळाचे व्यवस्थापन महाविद्यालय :**

महाविद्यालयाचा पदविका प्रदान समारंभ दि. १५ ऑक्टोबर रोजी संपन्न झाला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे श्री. पी.एम. मंत्री हे उपस्थित होते. मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर, उपाध्यक्ष श्री. करंदीकर, कार्याध्यक्ष श्री. टिल्लू तसेच विविध संस्थांतील पर्सनल मॅनेजरस् उपस्थित होते. प्रा. लाड यांनी सर्वांचे स्वागत करून यशस्री विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्रा. वानोडकर यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली.

या नंतर श्री. पी.एम. मंत्री यांनी Challenges of Human Resource Development - Manager in 21st Century या विषयावर आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले की HRD मॅनेजरचा कर्मचाऱ्यांशी संबंध येतो. तेव्हा त्याला माणसांबद्दल प्रेम पाहिजे. पूर्वी HRD मॅनेजरना इतर क्षेत्रांपासून वेगळे पाडले जायचे. किंवा कमी महत्त्वाचे मानले जायचे. परंतु श्री. मंत्री यांच्या मते HRD / Personnel ही इतर क्षेत्रांइतकीच महत्त्वाची आहेत. जर तुम्ही २१व्या शतकासाठी इतर क्षेत्रात बदल करणार असाल तर

या क्षेत्रातील बदल करणे तितकेच आवश्यक आहे. तसेच मॅनेजरनी कर्मचाऱ्यांना फक्त कर्मचारी म्हणून वागणूक न देता एक माणूस म्हणून वागणूक ठेवली पाहिजे. त्यांच्याशी मोकळे पणाने बोलले पाहिजे. तसेच मॅनेजरसंनी नेहमी नवीन नवीन शिकत राहीले पाहिजे. ''

यानंतर यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाण पत्रे देण्यात आली. डॉ. वा.ना. बेडेकर यांनी विद्यार्थ्यांसाठी अभिनंदनपर भाषण केले व आभारप्रदर्शना नंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

### सहवेदना

आपल्या शाळेतील ज्येष्ठ व विद्यार्थीप्रिय शिक्षिका सौ. सुलभा कर्वे यांचे शुक्रवार दि. ८-१०-९९ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या मागे पति, एक मुलगी, व एक मुलगा असा परिवार आहे. शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर, मंडळाचे पदाधिकार कर्पे कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहेत.

• • •

With Best Compliments

From

PRAGATI PATH

*Image for next millennium*

India's first Prometric testing Centre for adobe

Training on both Mac and PC plarforms.

Direct Certifications from Autodesk and Quark

Personlised trainign on the state-of-the-art systems

Enroll today and give wings to your career !

**School of digital arts**

TIRUPATI COMPUTERS

(FRANCHISE DIVISION OF IMAGE MAC (ACADEMY)

901, Paradise Towers, Gokhale Road, Opp. Alok Hotel, Thane (W).

Phone : 5390997/539 1007

***Authorised Training Centre For :***

Adobe, Kintex 3d Studio Max, Ouark, Corel, Prometric Testing